सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. १० मार्च २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३४४ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# ‘सोशल मीडियातून टाळकी फिरवण्याचे काम सुरू’ : राज ठाकरे

पुणे : मनसेचा १९ वा वर्धापन दिन पुणे जिल्ह्यात साजरा झाला. याआधी वर्धापनदिनाच्या भाषणात बोलताना ‘सोशल मीडियातून टाळकी फिरवण्याचे काम सुरू आहे, एकमेकांमध्ये वाद लावण्याचे प्रयत्न सुरू आहेत’, असे राज ठाकरे म्हणाले. राजकारण्यांनी महाराष्ट्रात चिखल केला आहे. राज्यात राजकीय फेरीवाले आले आहेत. पण हे राजकीय फेरीवाले मनसेत नाहीत. यामुळे १९ वर्षात भरपूर अपयश पचवून मनसे हा पक्ष टिकून आहे, असे अभिमानाने राज यांनी सांगितले. संघटना मजबूत करणे गरजेचे आहे. पक्षातील प्रत्येकाचे काम दर १५ दिवसांनंतर तपासले जाणार. कामात जर दिरंगाई केली तर पदावर ठेवणार नाही; असे राज ठाकरे यांनी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना सुनावले. कामचुकार असलेल्यांना पदावर ठेवणार नाही, असा इशारा राज यांनी दिला. नवी व्यवस्था राबवण्यासाठी ११ मार्च रोजी कामांचे वाटप करणार असल्याचे राज यांनी जाहीर केले.

यावेळी बोलताना मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी प्रयागराज येथे १४४ वर्षांनंतर झालेल्या महाकुंभमेळ्यातील पवित्र स्नानाबाबत वादग्रस्त वक्तव्य केले. ‘देशातील एकही नदी स्वच्छ नाही. परदेशातील नद्या बघा. गंगा स्वच्छ होणार हे मी राजीव गांधी यांच्यापासून ऐकत आलो आहे. बाळा नांदगावकर यांनी कुंभमेळ्यातून गंगेचे पाणी माझ्यासाठी आणले होते. मी त्यांना म्हटले, हड मी ते पिणार नाही या शब्दात राज ठाकरे यांनी पवित्र स्नानाची खिल्ली उडवली.

‘महिला दिन हाच सर्वात मोठा दिवस आहे. महिला दिन हा जिजाऊंच्या नावाने ओळखला पाहिजे’; असेही राज ठाकरे म्हणाले. गुढीपाडव्याच्या दिवशी सभा घेणार आणि सगळ्यांवर दांडपट्टा फिरवणार असेही मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी जाहीर केले.

मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या वर्धापनदिनाच्या भाषणातील महत्त्वाचे मुद्दे

१) महाराष्ट्र सैनिकांना वर्धापनदिनाच्या शुभेच्छा. मी आज तुम्हाला शुभेच्छा द्यायला आलो आहे. बाकी मला जो दांडपट्टा फिरवायचा आहे तो मी आपल्या गुढीपाडव्याच्या मेळाव्यात फिरवणार आहे.

२) आज महाराष्ट्रात जे काही सुरु आहे, जो महाराष्ट्राच्या राजकारणाचा चिखल झाला आहे त्यात फक्त मतं, त्यातून सत्ता मिळवणे आणि ही दोन्ही मिळवण्यासाठी तुमची आपापसात भांडणं लागली पाहिजेत, तुम्ही एकमेकांची डोकी फोडली पाहिजेत जेणेकरून तुम्ही



विभागलेले रहाल आणि यांना यांचा स्वार्थ साध्य करून घेता येईल यासाठीच सगळं सुरु आहे.

३) कालच जागतिक महिला दिन साजरा झाला. शुभेच्छा दिल्या गेल्या. पण माझ्या मते महिला दिन हा जिजाऊ साहेबांच्या नावाने ओळखला गेला पाहिजे. जिजाऊ साहेब लहान असताना त्यांचे वडील मुघलांकडे चाकरी करत आहेत हे त्यांना पाहवलं नाही, लग्न झाल्यावर आपला पती मुघलांकडे चाकरी करतोय हे त्यांना पाहवलं नाही, त्यांनी आपल्या पतीला बंड करायला लावलं. त्यांच्या मनात स्वराज्य नावाची कल्पना अगदी पहिल्यापासून होती आणि ती कल्पना त्यांनी आपल्या मुलाकडून म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराजांकडून ती वास्तवात आणून घेतली. या सगळ्याच्या मागे एका स्त्रीची प्रेरणा होती. हे आपण विसरतो. महाराष्ट्राला कर्तृत्ववान स्त्रियांची एक मोठी परंपरा आहे पण हे आपण आज विसरलो आहे.

४) पक्षाला १९ वर्ष पूर्ण झाली. आज असंख्य पक्षांना, प्रश्न पडतो की महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने जय पाहिला पराजय पाहिला पण तरी या पक्षातील माणसं एकत्र कशी राहतात ? याला दृष्ट लागू नको दे

५) सध्या जे राजकीय फेरीवाले आलेत की जे आज या फुटपाथवर, कोणी डोळे मारले की त्या फुटपाथवर. असले फेरीवाले मला पक्षात नको आहेत. आपली संघटना आजसुद्धा राज्यभर पसरली आहे त्याची अजून बांधणी करायला हवी. पक्षातील गटाध्यक्षाला त्याच्या घरच्यांना वाटलं पाहिजे की त्याची काळजी पक्षातील लोकं घेत आहेत. त्याच्याशी कोणीतरी बोलतंय. म्हणून पुढच्या २ दिवसांत पक्षातील नेत्यांपासून ते गटाध्यक्षांपर्यंत प्रत्येकाची कामं, त्याची आचारसंहिता हे घेऊन येत आहे. आणि हो माझी आचारसंहिता पण त्यात असणार आहे. दर १५ दिवसाला प्रत्येकाचं काम तपासलं जाणार आहे आणि त्याची यंत्रणा पण लावली आहे. आणि कोणी कामचुकारपणा करत असेल तर त्याला पदावर ठेवणार नाही.

६) मध्यंतरी मुंबईतल्या मेळाव्यात काही पदाधिकारी हजर नव्हते. त्या गैरहजर पदाधिकाऱ्यांची झाडाझडती घेतली. त्यातल्या काहींनी कारणं सांगितली की कुंभ मेळ्याला गेलो होतो. मी त्यांना म्हणलं इतकी पापं करता कशाला की जी धुवायला गंगेत जावं लागतं. आमचे बाळा नांदगावकर कमंडलूमधून गंगेचं पाणी घेऊन आले. इतक्या लोकांनी अंघोळ केल्यावर गंगा कशी स्वच्छ राहील. असलं पाणी कोण पिणार ? श्रद्धा समजू शकतो पण या देशातील एक नदी स्वच्छ नाही, नदीला आपण माता म्हणतो पण त्या नदीला आपण स्वच्छ ठेवत नाही. राजीव गांधी असल्यापासून गंगा साफ होणार असं ऐकतोय पण पुढे काय झालं ? अंधश्रद्धेतून माझ्या महाराष्ट्र सैनिकांनी बाहेर यावं.

७) पुढच्या काही दिवसांत प्रत्येकाला त्याच्या जबाबदाऱ्या दिल्या जातील, त्याचं नीट पालन झालंच पाहिजे. आणि येत्या ३० मार्चला गुढीपाडव्याच्या दिवशी वाजतगाजत गुलाल उधळत शिवतीर्थावर या.

# विदर्भातील संत्रा उत्पादन वाढवण्याची आवश्यकता : नितीन गडकरी

नागपूर, ९ मार्च : पतंजलीतर्फे दररोज ८०० टन संत्र्यावर प्रक्रिया होणार आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर संत्रा पुरविण्यासाठी विदर्भात संत्र्याचे एकरी उत्पादन वाढवण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज केले.

मिहान येथे पतंजली फूड अँड हर्बल पार्कचे उद्घाटन गडकरी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी गडकरी बोलत होते. या कार्यक्रमाला योगगुरू बाबा रामदेव, पतंजली आयुर्वेदचे व्यवस्थापकीय संचालक आचार्य बालकृष्ण, राज्यमंत्री आशीष जयस्वाल, आमदार आशीष देशमुख, आमदार सागर मेघे यांची उपस्थिती होती.

पतंजलीच्या मिहान स्थित फूड आणि हर्बल प्रकल्पासाठी दिवसाला जवळपास ८०० टन संत्र्यांची आवश्यकता लागणार आहे. त्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या मालाला आपसूकच बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. तसेच या प्रकल्पामुळे स्थानिकांना रोजगारही उपलब्ध होणार



असल्याचेही गडकरी म्हणाले. या प्रकल्पास शेतकऱ्याचे पूर्ण सहकार्य लाभेल व लिंबुवर्गीय फळांचा पुरवठाही करण्यात येईल. या प्रकल्पाद्वारे शेतकरी समृद्ध होण्यास मदत होईल, असा विश्वासही गडकरी यांनी व्यक्त केला.

गडकरी म्हणाले, ‘स्पेनमध्ये सुद्धा संत्र्यांचे उत्पादन घेण्यात येते. एका एकरात ३०० झाडे असतात. तर विदर्भात केवळ १०० झाडे असतात. त्याठिकाणी प्रति एकरातून ३० ते ३५ टन उत्पादन घेतले जाते. विदर्भात मात्र केवळ ४ ते ५ टन संत्र्याचे उत्पादन घेतले जाते.’ यासाठी विदर्भातील शेतकऱ्यांनी नवे तंत्रज्ञान आत्मसात करण्याची आवश्यकता आहे. हे लक्ष्य विदर्भातील संत्रा उत्पादकांना नवे तंत्रज्ञान आत्मसात करून गाठणे शक्य आहे. यासाठी राज्य सरकार व ॲग्रो व्हीजनच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येईल, असेही गडकरी म्हणाले.

कलमांची निवड, जमिनीचे परीक्षण व झाडांची निगा राखण्याच्या तंत्रात बदल करण्याची आवश्यकता आहे. गुणवत्ता असलेल्या कलमांची निर्मिती महाराष्ट्रात झाली पाहिजे. यासाठी नव्या नर्सरी उभारण्याचे काम महाराष्ट्रात होईल, असा विश्वास गडकरी यांनी व्यक्त केला.

### पतंजलीचा प्रकल्प शेतकऱ्यांसाठी वरदान : मुख्यमंत्री फडणवीस

पतंजली फुड व हर्बल पार्कच्या माध्यमातून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या मालावर प्रक्रिया करून तो बाजारपेठेत जाणार आहे. संत्र्याची ग्रेडींग, साठवणही येथे होणार असून हा प्रकल्प संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. या प्रकल्पाला राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करणार आहे.

## पान मसाल्याच्या जाहिरातीमुळे शाहरुख, अजय देवगण, टायगर श्रॉफ यांना नोटीस

जयपूर , ९ मार्च : बॉलीवूड स्टार शाहरुख खान, अजय देवगण आणि टायगर श्रॉफ यांना पान मसाल्याच्या जाहिरातीमुळे नोटीस जारी करण्यात आली आहे. जयपूर ग्राहक वाद निवारण मंचाने या तिन्ही अभिनेत्यांना नोटीस बजावली आहे. पान मसाल्याच्या जाहिरातीबाबत ही सूचना जारी करण्यात आली आहे.पान



मसाल्याच्या जाहिरातीसाठी या कलाकारांवर आधीच बरीच टीका झाली आहे. आता हे तिघेही या प्रकरणाबाबत कायदेशीर अडचणीत अडकले आहेत. जयपूरचे रहिवासी योगेंद्र सिंह यांच्या तक्रारीवरून आयोगाचे अध्यक्ष ग्यारसीलाल मीणा आणि सदस्या हेमलता अग्रवाल यांनी नोटीस बजावण्याचे आदेश दिले आहेत. या तिघांनी ’विमल पान मसाल्या’ची जाहिरात केली आहे जी ’बोलो जुबा केसरी’ या टॅगलाइनसह येते.

# कोल्हापूर जिल्ह्यात ‘२० मार्च’ या तारखेपर्यंत बंदी आदेश लागू

कोल्हापूर : जिल्ह्यात विविध पक्ष, संघटना यांच्याकडुन त्यांच्या विविध मागण्यांकरीता आंदोलन, उपोषण, मोर्चा इ. प्रकारची आंदोलने करण्यात येत असून विविध पक्षाकडून रॅली, सभेचे आयोजन करण्यात येत आहे. तसेच जिल्ह्यात यात्रा, सण, उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे होणार आहेत. यामुळे जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (अ) ते (फ) आणि कलम ३७ (३) अन्वये अपर जिल्हादंडाधिकारी संजय तेली यांनी संपूर्ण जिल्ह्यात २० मार्च रोजी रात्री २४ वा. पर्यंत बंदी आदेश जारी केला आहे.



हा हुकूम ज्या सरकारी अधिकारी, कर्मचारी यांना त्यांची कर्तव्य, अधिकार बजावण्यासंदर्भात कामकाज करताना उपनिर्दिष्ट वस्तू हाताळाव्या लागतात आणि एकत्र जमावे लागते व ज्या व्यक्तींनी पोलीस अधीक्षक अगर संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी अगर संबंधित विभागाचे पोलीस निरीक्षक किंवा सक्षम प्राधिकारी यांची परवानगी घेतलेली आहे, अशा व्यक्तींना तसेच सर्व जाती धर्माचे सण/उत्सव/जयंती/यात्रा, इ. हे शांततामय मार्गाने साजरे करण्याकरीता जमा होणारा जनसमुदाय यांना व लग्न, इतर धार्मिक समारंभ, सण, यात्रा, प्रेतयात्रा इत्यादी यांना लागू असणार नाही.

### उपराष्ट्रपती जगदीप धनकर दिल्लीच्या एम्समध्ये दाखल



नवी दिल्ली : उपराष्ट्रपती जगदीप धनकर (७३) दिल्लीच्या एम्समध्ये दाखल झाले आहेत. छातीत वेदना होत असल्याच्या तक्रारी केल्यानंतर उपराष्ट्रपतींना एम्समध्ये दाखल करण्यात आले. तातडीने उपचार सुरू करण्यात आल्यामुळे आता त्यांची प्रकृती स्थिर आहे. एम्सचे हृदयरोग तज्ज्ञ डॉ. राजीव नारंग यांच्या मार्गदर्शनात एक वैद्यकीय पथक उपराष्ट्रपती जगदीप धनकर यांच्यावर उपचार करत आहे. सध्या उपराष्ट्रपती जगदीप धनकर एम्सच्या क्रिटिकल केअर युनिट अर्थात सीसीयूमध्ये उपचार घेत आहेत. देशाचे आरोग्यमंत्री आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा यांनी उपराष्ट्रपतींच्या तब्येतीची विचारपूस करण्यासाठी रविवारी तातडीने एम्सचा दौरा केला.

### राज्यातील ५ जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा येलो अलर्ट

मुंबई , ९ मार्च : राज्यात होळीआधीच दुसरी उष्णतेची लाट आली आहे.फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात मुंबई व कोकणपट्ट्यात उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला होता. राज्यात सध्या प्रचंड उष्ण तापमानाने नागरिक हैराण झाले आहेत. ११ मार्चपर्यंत कोकणपट्ट्यासह मुंबई, ठाणे, पालघर जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. राज्यात येत्या पाच दिवसांत तापमानाचा उच्चांक वाढल्याचा पहायला मिळणार आहे.तापमानाचा पारा २-४ अंशांनी वाढणार आहे. कोकण व गोवा भागात उष्णतेच्या लाटेचा अंदाज देण्यात आलाय तर मध्य महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यांत उष्णतेचा येला अलर्ट देण्यात आला आहे.मुंबई, ठाणे, पालघर जिल्ह्यातही ही लाट राहणार असल्याचे भारतीय हवामानशास्त्र विभागाने सांगितले आहे.पुढील पाच दिवस मुंबई व उपनगर तसेच कोकणपट्ट्यात उष्णतेचा येलो अलर्ट देण्यात आला आहे.

# उपमुख्यमंत्री सोमवारी सादर करणार राज्याचा वर्ष २०२५-२६ चा अर्थसंकल्प



मुंबई, ९ मार्च : उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार हे उद्या सोमवार दि. १० मार्च २०२५ रोजी राज्याचा वर्ष २०२५-२६ चा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. नव्याने सत्तेवर आलेल्या महायुती सरकारचा हा पहिला अर्थसंकल्प असून अर्थमंत्री म्हणून अजित पवार यांचा हा अकरावा अर्थसंकल्प असणार आहे.

अजित पवार हे आर्थिक शिस्तीचे कठोर प्रशासक म्हणून ओळखले जातात. जनमताची नाडी ओळखून अर्थसंकल्पात लोकाभिमुख निर्णय जाहीर करताना राज्याच्या विकासप्रक्रियेला धक्का बसणार नाही याची काळजी ते घेत असतात. विकासयोजनांना निधी उपलब्ध करुन देण्यात तसेच पायाभूत विकासाची प्रक्रिया गतिमान ठेवण्यात ते सातत्याने यशस्वी ठरले आहेत. कोविडच्या संकटकाळात अनेक राज्यांची अर्थव्यवस्था अडचणीत असताना अजित पवार यांनी महाराष्ट्राची आर्थिक शिस्त बिघडू दिली नव्हती, त्याबद्दल त्यांच्या कार्याचा केंद्रीय पातळीवर गौरव झाला आहे. शेतकरी, कष्टकरी, महिला, दलित, आदिवासी, विद्यार्थी, युवक हे घटक त्यांच्या अर्थसंकल्पाच्या केंद्रस्थानी राहिले आहेत. २०२१ चा अर्थसंकल्प ८ मार्च जागतिक महिला दिनी जाहीर करताना त्यांनी तो राज्यातील महिला शक्तीला समर्पित केला होता. २०२२ चा अर्थसंकल्प स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मृतीदिनी ११ मार्च रोजी सादर केला होता. तो छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य, त्याग, समर्पण, स्वराज्यनिष्ठेला समर्पित होता. कृषी, उद्योग, दळणवळण, आरोग्य, मनुष्यबळ विकास या पंचसूत्रीवर आधारीत अर्थसंकल्पही त्यांनी सादर केला आहे. मागील वर्षीचा निवडणूकपूर्व अर्थसंकल्प सर्वसमावेशक, क्रांतीकारी अर्थसंकल्प होता. महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेवर आणण्यात त्या अर्थसंकल्पातील लोकोपयोगी, लोकप्रिय निर्णयांचा महत्वाचा वाटा होता. उद्या सादर होणाऱ्या अर्थसंकल्पाकडून राज्यातील जनतेला अनेक अपेक्षा असून अजित पवार त्या अपेक्षांवर खरे उतरतील, हा विश्वासही जनतेच्या मनात आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार हे उद्या त्यांचा अकरावा अर्थसंकल्प सादर करतील. त्यानंतर ते श्री. शेषराव वानखेडे यांच्यानंतर (१३ वेळा) दुसरे सर्वाधिक (११) वेळा अर्थसंकल्प सादर करणारे अर्थमंत्री ठरतील.

शेषराव वानखेडे यांनी १३ वेळा, अजित पवार यांनी उद्याचा अर्थसंकल्प धरून ११ वेळा, त्यांच्यानंतर सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प सादर करण्याचा मान श्री. जयंत पाटील (१० वेळा) आणि श्री. सुशीलकुमार शिंदे (९ वेळा) यांना जातो.



## लीव्हर इव्हॅल्युएशन क्लिनिक आणि जीआय मोटिलिटी लॅबची सुरुवात

पुणे – पुण्यातील बाणेर येथील मणिपाल हॉस्पिटल तर्फे गॅस्ट्रोन्ट्रोलॉजी केअर क्षेत्रात मोठी झेप घेत आता लीव्हर इव्हॅल्युएशन क्लिनिक आणि जीआय मोटिलिटी लॅबची सुरुवात केली आहे. या विशेष केंद्रांच्या माध्यमातून आता सर्वसमावेशक तपासणीसह, विश्वसनीय सेकंड ओपिनीयन्स आणि अत्याधुनिक निदान सेवा यकृत आणि पोटाशी संबंधित समस्यांनी त्रस्त असलेल्या रुग्णांसाठी उपलब्ध होणार आहेत. लीव्हर इव्हॅल्युएशन क्लिनिक मध्ये तज्ञांचा सल्ला प्राप्त होऊन रुग्णांना यकृत प्रत्यारोपणासह योग्य पध्दतीने निर्णय घेणे शक्य होणार आहे, तर जीआय मोटिलिटी लॅब मध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाने युक्त उपकरणे असून यामुळे गॅस्ट्राइंटरस्टायनल मोटिलिटी शी संबंधित निदान करणे सोपे जाणार आहे.

## अनेक नावांचा देव: लीजेंड्स ऑफ शिवा विद अमीश ’

पुणे : वार्नर ब्रदर्स डिस्कवरी , जो नॉन-फिक्शन प्रकारात आघाडीवर आहे, अभिमानाने लीजेंड्स ऑफ शिवा विद अमीश या नवीन मालिकेची घोषणा करत आहे. प्रसिद्ध लीजेंड्स मालिकेतील ही नवी भर आहे. लीजेंड्स ऑफ़ रामायण च्या जबरदस्त यशानंतर येत असलेली ही तीन भागांची मालिका प्रेक्षकांना भारताच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक प्रवासावर घेऊन जाणार आहे. सुप्रसिद्ध लेखक अमीश त्रिपाठी यांच्या सूत्रसंचालनाखाली ही मालिका ३ मार्च २०२५ पासून दर सोमवारी रात्री ९ वाजता डिस्कवरी चैनल आणि डिस्कवरी वर प्रदर्शित होणार आहे. महाराष्ट्र, जिथे भगवान शिवाची काही पवित्र मंदिरे आहेत, हे या कथेत एक विशेष स्थान तयार करणार आहे. जिथे भक्ती आणि परंपरा अशा प्रकारे एकत्र येतात, जे इतर कोणत्याही ठिकाणी पाहायला मिळत नाही.अमीश यांचा शिवाच्या प्रतीकात्मकतेचा, वारशाचा आणि काळाच्या ओघातही कायम असलेल्या प्रभावाचा शोध त्यांना महाराष्ट्रातील थक्क करणाऱ्या एलोऱ्याच्या कैलास मंदिरा पर्यंत घेऊन जातो. हे मंदिर बांधलेलं नाही, तर एका अखंड दगडातून वरून खाली कोरलेलं आश्चर्य आहे. या मालिकेत या अद्वितीय वास्तुशिल्प कलेच्या निर्मितीचा वेध घेतला जातो. यानंतर, महाराष्ट्रातील जेजुरी येथे भक्तीचा एक अनोखा पैलू दिसतो-इथे खंडोबा यांची पूजा लिंगस्वरूपात केली जाते आणि त्यांना हिंदू-मुस्लिम दोघेही मोठ्या श्रद्धेने पूजतात. काहींना ते मल्लू खान नावानेही ओळखले जातात. त्यांचे मंदिर हे धार्मिक एकात्मतेचे दुर्मिळ उदाहरण आहे. प्राचीन मंदिरे, सामायिक लोककथा आणि श्रद्धेच्या गूढ गोष्टी उलगडत लीजेंड्स ऑफ शिवा विद अमीश ही मालिका भक्ती, काळ आणि विश्वास यांचे रहस्य उलगडते.

## ‘दि वन अँड ओनली’ अनुभव

मुंबई: गुरुग्राम आणि चंदीगडमधील ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूरच्या भरघोस यशानंतर, या टूरने आता पुढचे त्याचे प्रदर्शन मुंबईला दाखवण्याचे ठरवले आहे, ज्यामुळे भारताची ग्लॅमर राजधानी एका आकर्षक नवकल्पक उपक्रमाच्या यशामध्ये रूपांतरित झाली. या प्रदर्शनाने अत्याधुनिक कलेची क्रिएटिव्हीटी, धाडसी कलात्मक विधाने आणि समकालीन सौंदर्यशास्त्राच्या कुशलतेने तयार केलेल्या सिम्फनीद्वारे पुन्ही प्रतिष्ठा प्राप्त केली आहे. माझगाव येथील बेव्हिव लॉन्समधील जादुई फ्लोटिंग रनवेमुळे तरूण ताहलियानीच्या आकर्षक डिझाइनसाठी मनमोहक वातावरण तयार झाले आहे, जो रनवे मुंबईच्या किनारपट्टीच्या मोहक विस्तारासमोर करण्यात आला आहे.

## एडलवाइज लाईफच्या अभ्यासातून निष्कर्ष समोर

छत्रपती संभाजीनगर : आपले पालक आणि मुलांना सर्वोत्तम जीवन उपलब्ध करून देण्यावर लक्ष केंद्रित केल्याने, भारतातील सँडविच पिढी स्वतःच्या भविष्यासाठी तयार नाही असे वाटते. मी कितीही बचत केली किंवा गुंतवणूक केली तरी ती भविष्यासाठी पुरेशी नाही, असे मत ६०% लोकांनी व्यक्त केले आहे. सँडविच जनरेशनची व्याख्या ३५-५४ वर्षे वयोगटातील व्यक्ती म्हणून केली जाते. ही पिढी त्यांचे वृद्ध पालक आणि वाढत्या वयांची मुले अशा दोन पिढ्यांना आर्थिक संरक्षण उपलब्ध करून देतात. जीवन विमा कंपनीने यूगोव्ह च्या सहकार्याने १२ शहरांमधील या पिढीतील ४,००५ प्रतिसादकर्त्यांचे दृष्टिकोन, विश्वास आणि आर्थिक सज्जतेची पातळी समजून घेण्यासाठी सर्वेक्षण केले.

## सँडविच जनरेशनला भविष्यात आर्थिक सुरक्षेची चिंता

मुंबई, – सँडविच जनरेशनची व्याख्या ३५-५४ वर्षे वयोगटातील व्यक्ती म्हणून केली जाते. ही पिढी त्यांचे वृद्ध पालक आणि वाढत्या वयांची मुले अशा दोन पिढ्यांना आर्थिक संरक्षण उपलब्ध करून देतात. जीवन विमा कंपनीने यूगोव्ह च्या सहकार्याने १२ शहरांमधील या पिढीतील ४,००५ प्रतिसादकर्त्यांचे दृष्टिकोन, विश्वास आणि आर्थिक सज्जतेची पातळी समजून घेण्यासाठी सर्वेक्षण केले.एडलवाइज लाइफ इन्शुरन्सचे एमडी आणि सीईओ सुमित राय म्हणाले, गेल्या काही वर्षांत आमच्या ग्राहकांशी झालेल्या संवादातून, सँडविच जनरेशन त्यांचे पालक आणि मुलांची देखभाल करण्याच्या चक्रात कसे जीवन जगत आहेत हे आम्ही बारकाईने पाहिले. ’गरजा’ इच्छांच्या मोबदल्यात येत नाहीत असे महत्त्वाकांक्षी जीवन उपलब्ध करताना त्यांना आरोग्यसेवा आणि शिक्षणासारख्या आवश्यक गोष्टी सक्षम करायच्या आहेत. हे प्रामुख्याने त्यांच्या आर्थिक निर्णय घेण्याच्या प्रक्रियेला चालना देते आहे. या प्रक्रियेत, ही सँडविच जनरेशन अनेकदा त्यांची स्वतःची स्वप्नं मागे ढकलते. ज्यामुळे आपण भविष्यासाठी तयार नाही अशी त्यांची धारणा होते.

## गोल्डन ॲबोड्स पुण्यात नवीन विस्तारासह प्रीमियम रेसिडेन्सेस आणत आहे

पुणे, : लक्झरी रिअल इस्टेटमधील आघाडीचे नाव असलेल्या गोल्डन ॲबोड्सने पुण्यातील आपल्या नवीनतम विस्ताराची घोषणा केली आहे, ज्यामुळे प्रीमियम निवासी आणि व्यावसायिक विकासासाठीची त्यांची वचनबद्धता पुन्हा स्पष्ट झाली आहे. उच्च दर्जाचे प्रकल्प देण्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या कंपनीचे उद्दिष्ट शहरातील आधुनिक राहणीमान आणि व्यवसायिक जागांची पुनर्परिभाषा करणे आहे.

## ''टोयोटा किर्लोस्कर मोटर'' साजरा करणार आंतरराष्ट्रीय महिला दिन

बंगळुरू, ७ मार्च-महिला सबलीकरणाला बळकटी देत टोयोटा किर्लोस्कर मोटर २०२५ चा आंतरराष्ट्रीय महिला दिन मोठ्या थाटामाटात साजरा करणार आहे. ऑटोमोटिव्ह उद्योगात महिलांचे सबलीकरण आणि पुरुषांप्रमाणेच महिला कर्मचाऱ्यांना देखील समान संधी देण्याची आपली वचनबद्धता त्यांनी यानिमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे. उद्योगातील लिंगआधारित कर्मचारी समतोल साधताना निर्माण होणारे अडथळे दूर करण्याच्या आपल्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून, टोयोटा किर्लोस्कर मोटर उत्पादन, तंत्रज्ञान क्षेत्रासह आघाडीच्या पदांमध्ये महिलांना प्राधान्य देणाऱ्या धोरणांना आणि सुविधांना प्राधान्य देत आहे. २०३० पर्यंत ३०% महिला प्रतिनिधित्व साध्य करण्याच्या उद्देशाने, टीकेएम संस्थेतील महिलांना प्रोत्साहित करण्यासाठी आणि उन्नतीसाठी अनेक उपक्रम राबवत आहे.

## आनारसा स्टुडिओज प्रस्तुत, योगेश पांडुरंग भोसले दिग्दर्शित आणि निर्मित चंडिका चित्रपटाचा पोस्टर !

छत्रपती संभाजीनगर – महिलांना प्रेरणा देण्याचे कार्य समाजात केले जाते, यापैकीच महत्वाचे योगदान देतात ते म्हणजे चित्रपट. सध्या मराठी सिनेश्रुष्टीत महिलाप्रधान सिनेमांकडे प्रेक्षकांचं लक्ष वेधलं गेलंय. स्त्रीकेंद्री चित्रपटांना सिनेप्रेमींचं प्रेम सुद्धा मिळतंय. असाच एक नवा मराठी चित्रपट येत्या नवीन वर्षी आपल्या भेटीस येणार आहे. आनारसा स्टुडिओज प्रस्तुत, योगेश पांडुरंग भोसले दिग्दर्शित आणि निर्मित चंडिका ह्या सिनेमाचं आज पोस्टर खास महिला दिनानिमित्त रिलीझ करण्यात आलंय. वन फोर थ्री (१४३) आणि आम्ही जरांगे सारखा दमदार आणि सर्वाधिक चर्चेत आलेल्या चित्रपटाचे दिग्दर्शक योगेश भोसले पुन्हा एकदा प्रेक्षकांचं मनोरंजन करायला सज्ज झालेत. पोस्टर वर असलेल्या महिलेच्या कपड्यांवर व अंगावर सर्वत्र रक्त आहे, मागे सध्याचं जग आपण पाहू शकतो पण विशेष म्हणजे या महिलेच्या उजव्या हातात शस्त्र आहे ज्याला आपण त्रिशूल म्हणतो. या दमदार पोस्टर वरूनच हा सिनेमा किती ताकदीचा असणार आहे ह्याचा अंदाज पटतो.

# विधी सेवा महाशिबीर; शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा

## वाचा फोडा; अन्याय दूर करा, हक्क-अधिकार जाणून घ्या- न्या. रविंद्र घुगे



छत्रपती संभाजीनगर, दि.९(जिमाका):- महिलांनो आपल्यावर होत असलेल्या अन्यायाला निर्भयपणे वाचा फोडा. अन्यायाविरुद्ध वाचा फोडल्यावरच अन्याय दूर करता येईल. महिलांनी सक्षम व्हावे आणि आपले हक्क अधिकार जाणून घ्यावे,असे आवाहन मुंबई उच्च न्यायालयाचे प्रशासकीय न्यायमूर्ती तथा औरंगाबाद खंडपीठाचे वरिष्ठ पालक न्यायमुर्ती रविंद्र घुगे यांनी आज फुलंब्री येथे केले.

फुलंब्री येथे जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात विधी सेवा महाशिबिरांतर्गत शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा आयोजीत करण्यात आला होता. यामेळाव्याचे उद्घाटन न्या. घुगे यांच्या हस्ते एका रोपट्याला पाणी देऊन करण्यात आले. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती व पालक न्यायमूर्ती संजय देशमुख, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण विभा इंगळे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव वैशाली फडणीस, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, उपविभागीय अधिकारी नीलम बाफना, उपविभागीय पोलीस अधिकारी पुजा नागरे, तहसिलदार डॉ. कृष्णा कानुगले तसेच सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

न्या. घुगे म्हणाले की, विविध दिवस आपण साजरे करतो. त्या आधी त्या दिवसांच्या मागील संकल्पना समजून घ्या. महिलांच्या व मुलींच्या संरक्षणासाठी असलेले कायदे जाणून घ्या. महिलांनी आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडा. आपले नाव, माहिती गुपित ठेवली जाते. त्यामुळे बदनामीची भिती बाळगू नका. वाचा फोडल्याशिवाय अन्याय दूर होत नाही. मुलगा किंवा मुलगी जन्माला येणे यास केवळ पुरुष जबाबदार असतो याची वैद्यकीय माहिती देणारे स्टॉल्स लावा. लोकांना माहिती द्या. स्त्रियांनी सक्षम व्हावे. सज्ञान व्हावे. आपले हक्क आणि अधिकार जाणून घ्यावे,असे आवाहन त्यांनी केले.

### एकमेकांशी चांगले वागणे हाच खरा न्याय- न्या. देशमुख

सर्व माणसांनी एकमेकांशी चांगले वागणे हाच खरा न्याय आहे,असे प्रतिपादन न्यायमूर्ती संजय देशमुख यांनी केले. ते म्हणाले की, एकमेकांना मान सन्मान देणे, चांगले वागणे यातून अनेक वाद संपुष्टात येतात. एकमेकांना त्यांचे न्याय हक्क मिळवून देणे हे सुद्धा न्यायदानच आहे. शासकीय अधिकाऱ्यांना मिळालेले पद हे ऐटीसाठी नसून लोकांना न्याय देण्यासाठी आहे,असे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी जिल्हा प्रशासनाने सामान्य नागरिकांना त्यांचे न्याय व हक्क लाभ देण्यासाठी राबविलेल्या उपक्रमांची माहिती दिली.शासकीय सेवा, योजना यांची अंमलबजावणीचे निरीक्षण करण्यासाठी न्यायमूर्ती आले आहे. जिल्हाप्रशासनाने बालविवाह, कुपोषण निर्मूलन, माता बालमृत्यू, महिला सुरक्षा, महिलांचे आर्थिक सक्षमीकरण दिव्यांगांची नोंदणी करण्यासाठी घरोघरी जाऊन मोहिम राबविणे असे विविध उपक्रम राबवून अधिकाधिक घटकांना लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासन प्रयत्न करीत आहे,अशी माहिती जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिली. पोलीस अधीक्षक राठोड यांनी महिलांनी सायबर संबंधित गुन्ह्यांबाबत सावध रहावे. फसवणूकीपासून स्वतःचा बचाव करावा. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यास १९३० या क्रमांकावर किंवा छउउठ पोर्टलवर तक्रार नोंदवून आपण दाद मागू शकता,असे सांगितले. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांनी सांगितले की, जिल्ह्यातील ३५० शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्यात आले आहेत. तसेच तक्रार पेटी ठेवण्यात आली आहे. शालेय विद्यार्थी आपल्यावरील अन्यायाबाबत त्यात तक्रार नोंदवू शकतात. जिल्ह्यात सर्व शासकीय कार्यालयामध्ये अंतर्गत तक्रार निवारण समित्या तयार करण्यात आल्या आहेत.

या कार्यक्रम प्रसंगी प्रातिनिधीक स्वरुपात लाभार्थ्यांना लाभ वितरण करण्यात आले. त्यानंतर सर्व न्यायमूर्तींनी शिबिरात लावण्यात आलेले माहिती व सेवेच्या स्टॉल्सना भेट देऊन पाहणी केली. प्रास्ताविकात प्रमुख जिल्हा सत्र न्यायाधीश विभा इंगळे यांनी विधी सेवा प्राधिकरणाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. आपण विधी सेवा प्राधिकरणामध्ये वैयक्तिक वाद, समस्या, मानसिक समस्या याबाबतही मार्गदर्शन घेऊ शकता, असेही त्यांनी सांगितले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव वैशाली फडणीस यांनी आभार मानले.

### स्वतःचे चित्र पाहून न्यायमूर्ती अचंबित

या कार्यक्रम प्रसंगी चिंचोली बाबरा येथील इयत्ता ९ वी चा विद्यार्थी असणाऱ्या पियुष समाधान जंगले या विद्यार्थ्याने न्या. रविंद्र घुगे, न्या. संजय देशमुख यांचे चित्र काढून त्यांना भेट दिले. या लहान चित्रकाराने काढलेले स्वतःचे हुबेहुब चित्र पाहून न्यायमूर्ती अचंबित झाले. त्यांनी या मुलाचे कौतुक केले व त्यास बक्षीसही दिले. हा विद्यार्थी चिंचोली बाबऱ्याला स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालयात शिकतो.

# एमजीएममध्ये आयटी करिअरची तयारी: कौशल्ये आणि मानसिकता विषयावरील मार्गदर्शनपर सत्र संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि.९ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या डॉ.जी.वाय. पाथ्रीकर संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी माजी विद्यार्थी पुष्कर देशपांडे यांच्या ’आयटी करिअरची तयारी : कौशल्ये आणि मानसिकता’ या विषयावरील मार्गदर्शनपर सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास डॉ.संजय आझादे, डॉ.सतीश संकाये, प्रा.अपूर्वा ढवळे, प्राध्यापक व सर्व संबंधित उपस्थित होते.

यावेळी बोलताना पुष्कर देशपांडे म्हणाले, या काही वर्षांमध्ये उच्च-कार्यक्षमता असलेल्या तंत्रज्ञानाचे महत्त्व वाढले आहे. संगणक दृष्टी ही अनेक नवीन आर्टिफिशियल इंटेलिजियन्स नवकल्पनांपैकी एक आहे, जी सध्याच्या मशीन लर्निंग जॉब ट्रेंडला चालना देत आहे. इंटरनेट ऑफ थिंग्जसह आर्टिफिशियल इंटेलिजियन्स या क्षेत्रात करियर करण्याची मोठी संधी आहे. एआय आणि मशीन लर्निंग अभियांत्रिकीच्या क्षेत्रातील तज्ञांचे कठोर परिश्रम या वाढीला चालना देत आहेत.

दूरदृष्टी असलेल्या तंत्रज्ञान व्यावसायिकांसाठी समकालीन काळामध्ये करिअरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी पदवी सोबतच कौशल्य प्रशिक्षण आधारित प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिकणे आवश्यक असल्याचे पुष्कर देशपांडे यांनी यावेळी सांगितले.

या कार्यक्रमास विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.प्रतिभा भिसे यांनी केले.

# जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी जि.प.प्रा.शा. जंगलातांडा ता.सोयगाव येथे भेट देऊन विद्यार्थ्यांशी गुणवत्तेबाबत साधला संवाद



तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.९ मार्च

छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सोयगाव तालुक्यातील मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा उपक्रमात पहीला क्रमांक मिळावलेली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जंगलातांडा ता.सोयगाव येथे भेट देऊन इयत्ता पहिली,दुसरी,आठवी तसेच नावीन्यपूर्ण प्रयोगशाळा या वर्गानं भेट देऊन विद्यार्थ्यांशी गुणवत्तेबाबत संवाद साधला इयत्ता दुसरीतील राधिका या विद्यार्थीने जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांना उत्तरे दिली.त्यामुळे जिल्हाधिकारी तिचे उत्तर ऐकून खुश झाले.या प्रसंगी त्यांनी शाळाप्रगती विषयी समाधान व्यक्त करून गटशिक्षणाधिकारी,केंद्रप्रमुख,मुख्याध्यापक,शिक्षक,सहशिक्षिका,यांच्या कामाचे कौतुक केले.याप्रसंगी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी शाळेत दससूत्री कार्यक्रम,वर्ग भेट, गुणवत्ता बाबत विज्ञान प्रयोगशाळा,संगणक लॅब,शालेय परिसर भौतिक सुविधा,लोकसहभाग इत्यादी कार्यक्रमाबद्दल शाळेचे कौतुक करून मुख्याध्यापक रामदास फुसे यांचा सत्कार केला व एकूण शालेय वातावरणाबद्दल समाधान व्यक्त केले आहे.जिल्हाधिकारी दिलीप स्वामी,उपविभागीय अधिकारी लतिप पठाण. तहसीलदार मनीषा मेने,गटविकासाधिकारी दादाराव अहिरराव,गटशिक्षणाधिकारी रंगनाथ आढाव,केंद्रप्रमुख फिरोज तडवी,मुख्याध्यापक रामदास फुसे,गजानन कोळी,रघुनाथ राठोड,विनोद जाधव,प्रवीण इंगळे,राहुल सोनार,अनिल दामधर प्र.शिक्षक,अश्विनी पवार,पुष्पा सोनार, राजश्री काकडे,तलाठी,ग्रामसेवक,गावातील नागरिक वसंत राठोड,विशाल चव्हाण,शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामपंचायत सरपंच सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आदर्श पिता तथा माजी शिक्षक यांचा सोयगाव नाट्यपंढरी मध्ये सत्कार संपन्न



तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.९ मार्च

आदर्श पिता तथा माजी शिक्षक यांचा सोयगाव नाट्यपंढरी मध्ये सत्कार संपन्न रघुनाथ सोनजी बोरसे रा.लोंढरी तालुका जामनेर जिल्हा जळगाव यांचा यांचा सोयगाव नाट्य पंढरी मध्ये नुकताच समाज प्रबोधनकार विष्णू मापारी आणि आरोग्य धूत दिगंबर कृष्णा वाघ सोयगावकर यांनी शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.यावेळी उपसरपंच नेरी माधवराव इधाटे उपस्थित होते.यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला रघुनाथ बोरसे यांनी अत्यंत गरीब परिस्थितीत मुलांना लहानचे मोठे केले. शिक्षण दिले मोठा मुलगा अविनाश रघुनाथ बोरसे यांना इंजिनियर केले.तर दिनेश रघुनाथ बोरसे यांना प्राध्यापक केले व मुलगी सुवर्णा मुख्याध्यापिका आहे आता काय अत्यंत गरीब परिस्थितीत त्यांनी मुलांना शिक्षणाची गंगा मोकळी करून दिली अल्पभूधारक असलेले रघुनाथ बोरसे हे बाबा हे बाबा स्वतः सुशिक्षित असून त्यांनी मुलामुलींवर चांगले संस्कार केले त्याबद्दल त्यांचा सर्वांना अभिमान वाटतो अशी व्यक्ती ३२ वर्षानंतर सोयगावला आरोग्य धूत दिगंबर वाघ यांच्या निवासस्थानी आल्यानंतर समाज प्रबोधनकार विष्णू मापारी यांनी बाबांची व मामांची सदिच्छा भेट घेऊन त्यांचा सत्कार केला.यावेळी बाबांना बाबांचे डोळे भरून आले उपस्थितीत नाही आपले अश्रू आवरता आले नाही बाबांचा आदर्श इतरांनी घ्यावा ही अपेक्षा व्यक्त होत आहे तसेच कृषीभुषण अरूण सोहणी यांनी कौतूक करून पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.

## आज अंधानेर गावात छावा चित्रपट प्रदर्शन; प्रसिद्ध छायाचित्रकार प्रशांत वाघ यांच्या अभिष्टचिंतनाचे औचित्य




तभा वृत्तसेवा

कन्नड दि.०९ मार्च – आज संध्याकाळी अंधानेर गावात छत्रपती संभाजी महाराज यांची यशोगाथा असलेला छावा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

अंधानेर गावातील प्रसिद्ध छायाचित्रकार प्रशांत वाघ यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याचे औचित्य साधत दि.१० रोजी सायंकाळी ०७ वाजेच्या सुमारास अंधानेर गावातील संत सावता मंगल कार्यालयात हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे,तसेच विविध सामाजिक उपक्रम राबविले जाणार आहेत

या चित्रपट प्रदर्शनासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन प्रशांत वाघ फोटोग्राफी व अंधानेर मित्र मंडळाने केले आहे.

## ग्रामपंचायत कार्यालय फारोळा येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा



बिडकीन दि.९ मार्च : पैठण तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय फारोळा सरपंच श्री.सलीम महंमद पठाण ग्रामपंचायत अधिकारी आशाताईं तुपे यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून व आशाताई तुपे,मीनाक्षी धुमाळ,अनिता पठारे अंगणवाडी मदतनीस,कांचन बिडकर,मीना पवार,कोमल निकम,यांचा शाल व पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला यावेळी उपस्थित उपसरपंच शितल चाव्हरे,कमल गोरे,पल्लवी गोरे,सरला पोपळघट,विष्णू पोपळघट,तमिजाबी पठाण,इलियास पठाण,रेखा इंदापुरे,मीरा हाडे,गायत्री तुपे,भागुबाई धरपळे,मंगल पवार,फरीन शेख,पुजा वाघुतकर, विजयाबाई धरपळे,संदिप चाव्हरे,रविंद्र गोरे,अहेमद पठाण,अशोक गोरे, शिवाजीराव गोरे,तेजस जाधव दिलीप गोरे,गणेश गायकवाड,संजय धुमाळ,रविंद्र पवार,मंगेश धुमाळ मोठ्या संख्येने महिला व गावकरी आदींची उपस्थित होते.

## जागतिक महिला दिनानिमित्त मुलींना मोफत प्रशिक्षण

बिडकीन दि ९ मार्च – जागतिक महिला दिनानिमित्त मुलींसाठी मोफत सेल्फ डिफेन्सचे प्रशिक्षण देण्यात येत आहे, बिडकीन, चितेगाव कांचनवाडी या परिसरामध्ये खास करून मुलींसाठी व महिलांसाठी स्व-संरक्षणाचे प्रशिक्षण शिबिर मिशन मार्शल आर्ट्स अँड वुशु कुंग-फू स्पोर्ट्स कराटे असोसिएशनचे प्रमुख पवन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या अनेक वर्षांपासून महिलांना कराटे प्रशिक्षण देण्यात येत आहे. महिला खेळाडू अधिक भक्कम झाल्या पाहिजेत या हेतूने पवन घुगे हे नियमितपणे मुलींसाठी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करत असतात. तसेच त्यांच्या पुढाकाराने आता राधा घुगे, नंदा घुगे, आरती वाघ, कोमल राठोड, ऋतुजा रणवाळकर, ऋतुजा भालेराव, धनश्री शिदवडकर या महिला प्रशिक्षिका मुलींना कराटे प्रशिक्षण देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. जागतिक महिला दिनानिमित्त महिलांसाठी, महाविद्यालयीन तरुणींसाठी दि ८ मार्च ते १४ मार्च पर्यंत मोफत प्रशिक्षण देणार आहेत. या प्रशिक्षणाचा परिसरातील सर्व मुली महिलांनी तरुणींनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले



## बिडकीन येथील ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूल व ब्लू माउंटन प्री स्कूल मध्ये जागतिक महिला दिन उत्साहात साजरा



बिडकीन दि ८ मार्च जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून बिडकीन येथील सेठ मोतीलाल तोतला शैक्षणिक संस्था संचलित ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूल व ब्लू माउंटन प्री स्कूल मध्ये शनिवार, दि. ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी शाळेच्या मुख्यध्यापीका सविता तोतला होत्या. शाळेच्या मुख्यध्यापीका आणि इतर महिला शिक्षिकांच्या उपस्थित सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. शाळेच्या शिक्षिका भारती जाधव यांच्या मार्गदर्शना खाली विद्यार्थीनींनी नाटक सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. शाळेतील विद्यार्थीनींनी पुढाकार घेऊन शिक्षकांच्या मदतीने महिला दिन उत्साहात साजरा केला. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी शाळेतील शिक्षिका वर्षा चव्हाण, भारती जाधव, काजल देशमुख, सोनाली खोंड, अनिता धर्मे, अवनी चव्हाण, मनिषा जाधव, प्रतिक्षा पोटे, रेखा चव्हाण, नंदीनी चव्हाण, ज्योती राठोड, नीता तायडे. विद्यार्थी शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परीश्रम घेतले.

## जिल्हा माहिती कार्यालयाचा चित्ररथ न्या.रविंद्र घुगे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रवाना

छत्रपती संभाजीनगर, दि.९ : सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांचा प्रचार प्रसार व्हावा यासाठी जिल्हा माहिती कार्यालयामार्फत तयार करण्यात आलेल्या चित्ररथास आज मुंबई उच्च न्यायालयाचे प्रशासकीय न्यायमूर्ती तथा औरंगाबाद खंडपीठाचे वरिष्ठ पालक न्यायमुर्ती रविंद्र घुगे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून फुलंब्री येथून रवाना करण्यात आले. फुलंब्री येथे जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात विधी सेवा महाशिबिरांतर्गत शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा आयोजीत करण्यात आला होता. त्या मेळाव्यात हा चित्ररथ नेऊन जनजागृती करण्यात आली. चित्ररथावर बसविण्यात आलेल्या एलईडी स्क्रीनचे विमोचन फित कापून करण्यात आले. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती व पालक न्यायमूर्ती संजय देशमुख, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण विभा इंगळे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव वैशाली फडणीस, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, उपविभागीय अधिकारी नीलम बाफना, उपविभागीय पोलीस अधिकारी पुजा नागरे, तहसिलदार डॉ. कृष्णा कानुगले आदी यावेळी उपस्थित होते. जिल्हा वार्षिक योजनेच्या विशेष घटक योजनेतून हा चित्ररथ तयार करण्यात आला असून जिल्ह्यात १६१ गावांमध्ये सामाजिक न्याय विभागाच्या योजनांची जनजागृती करणार आहे.

# छत्रपती संभाजीनगर

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## 'सुशीला-सुजीत'च्या प्रोमोशनल साँग चे शानदार प्रकाशन

मुंबई - 'सुशीला-सुजीत या १८ एप्रिल २०२५ रोजी प्रदर्शित होणाऱ्या बहुप्रतिक्षित चित्रपटाचे प्रसारगीत अर्थात प्रोमोशनल साँग आज एका शानदार समारंभात प्रकाशित करण्यात आले. यावेळी गश्मीर महाजनी आणि अमृता खानविलकर यांनी या गाण्यावर नृत्य सादर केले. पोस्टर, मोशन पोस्टर आणि आता प्रसारगीताचे प्रकाशन झाल्यावर चित्रपटाबद्दलची उत्कंठा वाढली आहे.माटुंगा येथील रुईया महाविद्यालयात झालेल्या या सोहळ्यात चित्रपटाचे निर्माते स्वप्नील जोशी, मंजिरी ओक, प्रसाद ओक, निलेश राठी तसेच चित्रपटाचे संगीत दिग्दर्शक वरूण लिखते, गायक प्रवीण कुंवर आणि कविता राम, गीतकार मंदार चोळकर, पटकथा-संवाद लेखक अजय कांबळे, नृत्यदिग्दर्शक मेहुल गदानी आणि इतर कलाकार/तंत्रज्ञ उपस्थित होते. लागेना नंबर, अडचण कशी मी सांगु, घरट्याच्या बाहेर, अजुन किती मी थांबू...कोणीतरी फिरवलंय लिंबू, लागलेत नशिबाचे बांबू, ओढून ताणून हेंडल मोडून, पाहीले मारुन चार दगड, लचांड झालया, चिऊ ताई चिऊ ताई दार उघड, अंगाशी आलया... असे हे धमाल प्रोमोशनल साँग आहे.

## सॅमको म्युच्युअल फंडसादर करणार लार्ज कॅप एनएफओ

मुंबई -सॅमको ॲसेट मॅनेजमेंटप्रायव्हेट लिमिटेडने सॅमको लार्ज कॅप फंडसाठी न्यूफंड ऑफर (एनएफओ) सादर केली आहे. ही एक ओपन-एंडेड इक्विटी योजना असुनती लार्ज-कॅप स्टॉक्समध्ये गुंतवणूक करण्यावर केंद्रित असेल. हा एनएफओ ५ मार्च २०२५ ते १९ मार्च २०२५ या कालावधीत सबस्क्रिप्शनसाठी उपलब्ध असेल.या फंडाचा उद्देशभारताच्या अग्रणी १०० लार्ज-कॅप कंपन्यांच्याविविधपूर्ण पोर्टफोलिओ उभारून दीर्घकालीन भांडवली वृद्धी साध्य करणे हा आहे. सॅमकोची सी.ए.आर.ई.. मोमेंटम स्ट्रॅटेजीवापरून उच्च-गुणवत्तेच्या आणिवाढीच्या संधी शोधल्या जातील.

## 'हर नारगी पॅक टाटा नमक नहीं होता' मोहिम सुरु

मुंबई - टाटा सॉल्ट या १९८३ पासून भारतातील आयोडीनयुक्त मीठ श्रेणीमधील अग्रणी व बाजारपेठ लीडर कंपनीने 'हर नारंगी पॅक टाटा नमक नहीं होता' या साहसी संदेशासह बनावटी मीठ पॅक्सविरोधात लढा सुरू केला आहे. या घोषणेमधून उच्च दर्जाचे मीठ देण्याप्रती टाटा सॉल्टची दृढ कटिबद्धता दिसून येते, जेथे कंपनी विशेषत: महाराष्ट्रामध्ये बनावटी मीठ पॅक्सचे प्रमाण जास्त असलेल्या असंघटित मीठ बाजारपेठेच्या पार्श्वभूमीवर प्रांतात शुद्धता आणि विश्वासासाठी नवीन मानक स्थापित करत आहे.

## जॉन्सन अँड जॉन्सनच्या इंट्राओक्युलर लेन्स टेकनिस प्युअरसी लॉन्च

मुंबई - जॉन्सन अँड जॉन्सन, नेत्रआरोग्यात जगातील मोठी कंपनी, ने आज घोषणा केली की प्रेसबायोपिया असलेल्या लोकांसाठी टेकनिस प्युअरसी पूर्णपणे फ्रिक्टिव इंट्राओक्युलर लेन्स (आयओएल) आता भारतात उपलब्ध आहे. टेकनिस प्युअरसी आयओएल मध्ये पूर्णपणे फ्रिक्टिव डिझाइन आहे, जे सतत, उच्च दर्जाची दृष्टी देते, त्यात उच्च वर्गातील कॉंट्रास्ट आणि कमी प्रकाशात उत्तम कामगिरी आहे, जी मोनोफोकल आयओएल सोबत तुलनीय आहे.कॅटॅरॅक्ट सर्जरी ही जगातील सर्वात सामान्य सर्जरी आहे, दरवर्षी २८ मिलियन सर्जरी होतात. परंतु केवळ १०-१५% रुग्णांना ॲडव्हान्स्ड ऑप्टिकल आयओएल मिळतात जे विशेषत: ॲस्टीगमॅटिझम++ आणि प्रेस्बायोपिया** च्या समस्यांसाठी बनवलेले असतात,६ असे सर्जिकल व्हिजन इंडिया आणि साउथ एशियाचे कंट्री मॅनेजर बर्झिन शहाना म्हणाले, जॉन्सन अँड जॉन्सन मेडटेक. आम्हाला टेकनिस प्युअरसी आयओएल लॉन्च करताना अभिमान वाटतो, ज्यामुळे भारतातील सर्जन आणि वाढत्या रुग्णांना प्रीमियम आयओएलची निवड मिळते जी दृष्टीची स्पष्टता आणि दृश्याच्या लक्षणांना कमी करेल.

## डेसिमलने सीड फंडिंग उभारला

मुंबई : अग्रगण्य राउंड-अप गुंतवणूक प्लॅटफॉर्म डेसिमलने घोषणा केली की त्यांनी मध्ये डॉलर३ दशलक्ष सीड फंडिंग यशस्वीरित्या उभारले आहेत. या निधी फेरीचे नेतृत्व जैनम ब्रोकिंग लिमिटेडने केले होते, जे स्टार्टअप गुंतवणुकीतील त्यांचे पहिले उपक्रम होते. ही धोरणात्मक भागीदारी जैनमच्या व्यापक आर्थिक कौशल्याला डेसिमलच्या सूक्ष्म-गुंतवणुकीच्या नाविन्यपूर्ण दृष्टिकोनाशी जोडते. ही गुंतवणूक भारताच्या फिनटेक वाढीच्या एका महत्त्वाच्या वेळी आली आहे, २०२५ मध्ये बाजारपेठेचा आकार १४५.०९ अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे आणि २०३० पर्यंत ३०.५५टक्के च्या सीएजीआरने ५५०.२१ अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. ही स्फोटक वाढ डेसिमलच्या राउंड-अप गुंतवणूक प्लॅटफॉर्मसारख्या नाविन्यपूर्ण आर्थिक उपायांसाठी एक महत्त्वपूर्ण संधी सादर करते.

## आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त, 'विवो कन्याज्ञान' प्रकल्प

नवी दिल्ली - आजच्या काळात तंत्रज्ञान खूप वेगाने प्रगती करत आहे आणि त्याचबरोबर एसटीईएम(विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, गणित) क्षेत्रातील कुशल लोकांची मागणी वाढत आहे. परंतु या क्षेत्रात महिलांची संख्या अजूनही खूप कमी आहे, विशेषत: ज्या मुली आर्थिकदृष्ट्या कमकुवत कुटुंबातून येतात आणि त्यांना योग्य संधी आणि आधार मिळत नाही. ही समस्या लक्षात घेऊन, विवो इंडियाने 'विवो कन्याज्ञान' प्रकल्प सुरू केला आहे. भारतीय महिलांना एसटीईएम क्षेत्रात करिअर करण्यासाठी प्रोत्साहित करणे आणि सक्षम करणे हा एक राष्ट्रीय उपक्रम आहे. हा कार्यक्रम केवळ शिष्यवृत्तीपुरता मर्यादित नाही तर गरजू मुलींना मार्गदर्शन मिळविण्याची, नवीन कौशल्ये शिकण्याची आणि उद्योग अनुभव मिळविण्याची संधी देखील प्रदान करतो. आतापर्यंत, १५० मुलींना याचा फायदा झाला आहे, त्यापैकी ६०% पेक्षा जास्त मुली अशा आहेत ज्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १ लाखापेक्षा कमी आहे आणि १५% मुलींचे संगोपन एका पालकाने केले आहे. हा उपक्रम केवळ आर्थिक आणि सामाजिक अडथळे दूर करत नाही तर पहिल्यांदाच शिक्षण घेणाऱ्या मुलींना पुढे जाण्याची संधी देऊन त्यांचे जीवन बदलत आहे.

## ट्रांजिशन्स ने लॉन्च केले जेन एसडायनॅमिक लेन्स

मुंबई - एस्सिलोरलक्सोटिका इंडिया ने अधिकृतपणे ट्रांजिशन्स जेन एस , लाँच केले आहे, जे ऑप्टिकल तंत्रज्ञानातील एक महत्त्वपूर्ण प्रगती दर्शवते आणि अनेक परिधानकर्त्यांसाठी दृष्टी सुधारण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे. गती, शैली आणि स्मार्ट दृष्टी यावर लक्ष केंद्रित करून, ट्रांजिशन्स जेन एस आधुनिक परिधानकर्त्यांच्या गतिशील जीवनशैलीशी सुसंगत असून विविध प्रकाश परिस्थितींशी सहजपणे जुळवून घेतात.स्पष्ट-ते-गडद फोटोक्रोमिक श्रेणीत सर्वात वेगाने गडद होणारे हे लेन्स व्यापक संशोधन आणि परिधानकर्त्यांच्या सहभागातून विकसित करण्यात आले आहे.

## विवोटी४एक्स ५जी: पॉवर आणि परफॉर्मन्सचा एक नवीन आयाम

नवी दिल्ली, ५ मार्च २०२५: जागतिक स्मार्टफोन ब्रँड विवोने त्यांच्या नवीन टी४ मालिकेतील पहिला स्मार्टफोन विवो टी४एक्स ५जी लॉंच केला आहे. हे विशेषत: मल्टीटास्किंग आणि उच्च-कार्यक्षमता वापरकर्त्यांसाठी डिझाइन केलेले आहे. विवोटी४एक्स ५जी मध्ये ६५००एमएएच बॅटरी आहे जी दीर्घकाळ बॅकअप देते आणि अखंड वापर सुनिश्चित करते. हा स्मार्टफोन मीडियाटेक डायमेन्सिटी ७३०० प्रोसेसरने सुसज्ज आहे उत्कृष्ट फोटोग्राफीसाठी, यात ५० एमपी एआय कॅमेरा आहे, ज्यामुळे प्रत्येक खास क्षण उत्तम तपशीलांसह टिपता येतो.

## एथरची आता महाराष्ट्रात ८ नवीन रिटेल आउटलेट

मुंबई - भारतातील इलेक्ट्रिक दुचाकी उत्पादक एथर एनर्जी लिमिटेडने अलीकडेच महाराष्ट्रात ८ नवी एक्सपिरियंस सेंटर्स एथर स्पेसेस उघडली आहेत. ही सेंटर्स अलिबाग, भिवंडी, अकलूज, जालना, इचलकरंजी, खामगाव, बीड आणि माजलगांव येथे असून त्यांच्यामुळे महाराष्ट्रातील एथरचे नेटवर्क अधिक मजबूत होत आहे. या एक्सपिरियंस सेंटर्समध्ये ग्राहक टेस्ट राइड घेऊ शकतात तसेच एथर ४५० च्या परफॉर्मन्स-केंद्रित स्कूटर्स आणि रिझ्टा ही एथरची फॅमिली स्कूटर खरेदी करू शकतात. महाराष्ट्रात सध्या एथरची २५पेक्षा जास्त एक्सपिरियंस सेंटर्स आहेत आणि ३१ डिसेंबर २०२४ रोजी ३०१ एथर ग्रिड फास्ट चार्जर्स होती.

# साधुसंत महंतांच्या आश्रमांना दान धर्म करा : स्वामी अरुणा गिरीजी महाराज



खुलताबाद प्रतिनिधी : वेरूळ येथील नाथ आश्रम येथे दि ८ मार्च शनिवार रोजी सकाळी १०ते १२ या वेळेत काल्याचे , किर्तन रुपी सेवेत अडबंगनाथ संस्थान प्रमुख भामाठाण सद्गुरु अरुणा गिरीमहाराष्ट्रभरजी महाराज यांनी या ठिकाणी आलेल्या भाविकांना हिंदू संस्कृती टिकवण्यासाठी महाराष्ट्रभर चालू असलेल्या विद्यार्थ्यांची गुरुकुल व आक्काताई महाराज यांनी वेरूळ या ठिकाणी नाथ आश्रम मध्ये विविध विकासात्मक कामांची सुरुवात येणाऱ्या भक्तांसाठी केलेली असून त्यासाठी प्रत्येक भक्तांनी या कामासाठी आर्थिक मदत करा असे आपल्या कीर्तनातून , स्वामी अरुणात गिरीजी महाराज यांनी आलेल्या सर्व भाविकांना भावनिक होऊन आवाहन केले.

या ठिकाणी गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत बंब यांच्या विशेष सहकार्यातून चालू असलेल्या मदत कार्याबद्दल व शेवटच्या दिवशीच्या काल्याचा महाप्रसाद या ठिकाणी भाविकांसाठी दिल्याबद्दल नाथ आश्रमाच्या वतीने सद्गुरु आक्काताई जी महाराज व सर्व नाथ भक्त मंडळींच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले. जालना लोकसभा खासदार डॉक्टर कल्याणराव काळे छत्रपती संभाजी नगरचे माजी खासदार चंद्रकांत खैरे छत्रपती संभाजी नगर जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष एल जी गायकवाड, छत्रपती संभाजीनगर बांधकाम माजी सभापती किशोर भाऊ बलांडे वेरूळ गावचे सरपंच कुसुमताई प्रकाश पाटील मिसाळ, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, छत्रपती संभाजीनगर कृषी उत्पन्न बाजार समिती अध्यक्ष राधाकिसन बापू पठाडे, माजी सभापती अर्चना दिनेश अंभोरे, भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील नलावडे ,माजी सभापती भीमराव खंडागळे , माजी उपसभापती दिनेश अंभोरे, शहराध्यक्ष परसराम बारगळ,फुलंब्री पंचायत समिती माजी सभापती विवेक बापू चव्हाण ह भ प नारायण महाराज भांबर्डे संतोष पांडव,अरुण आघाडे, सोमीनाथ जाधव, संदिप अधाने, रेखा चव्हाण,तालुका सरचिटणीस सतीश दांडेकर, बाळु नलावडे ,संतोष गायकवाड, अनिल करपे, गणेश सावजी,इंदापूर ग्रामपंचायत चे सरपंच संदीप पाटील निकम ,माजी नगरसेवक परसराम बारगळ , संजय खंडागळे, सुखदेव ठेंगडे,कैलास मिसाळ, आचारी सेवा बाबासाहेब भाऊ घुगे, मंडप सेवा विजय मंडप बोरसे दामू गवळी अण्णा, अरुण कदम पुंजाराम धोत्रे गणेश गायके मते मामा विठ्ठल गोम लाडू . सुनील मनगरे बापू मंठा.

पहिल्या दिवसापासून ते शेवटच्या दिवसापर्यंत हातनूर या ठिकाण च्या वारकरी शिक्षण संस्थेच्या गुरुवर्य व विद्यार्थ्यांचे, हरिपाठ सेवा उत्कृष्ट पद्धतीने केल्याबद्दल मनापासून अभिनंदन केले . या ठिकाणी छत्रपती संभाजी नगर येथून आलेल्या प्रसिद्ध भारुडकार ज्येष्ठ पत्रकार ह भ प नारायण महाराज भांबर्डे यांच्यासह अनेक मान्यवरांनी भारुडात भाग घेतला.( नाथ आश्रम वेरूळ येथे दि १ मार्च ७ मार्च दरम्यान संगीतमय भागवत कथेचा भव्य प्रकारे सद्गुरु आक्काताई महाराज व, सर्व नाथ भक्त यांच्या पुढाकारातून कथा प्रवक्ते अशोक महाराज घुंमरे सावंगी नाशिक यांच्या माध्यमातून सात दिवसाची सेवा मोठ्या उत्साहात पार पडली ज्या भाविकांनी भागवत कथा श्रवण केली त्या भाविकांचे कल्याण झाल्याशिवाय राहणार नाही असे प्रतिपादन घुमरे महाराज म्हणाले) काल्याचे किर्तन अरूणाथगिरिजी महाराज यांच्या अमृत वाणीतून संपन्न झाले.

# उद्योजक मनोज पवार राष्ट्रवादीच्या वाटेवर !



तभा वृत्तसेवा

कन्नड :- शहरातील उद्योजक तथा समाजसेवक असलेले मनोज पवार यांनी दि.०९ रोजी राष्ट्रवादी भवन येथे प्रवेश केला आहे

मुंबई येथे राष्ट्रवादी भवन येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते हा प्रवेश सोहळा संपन्न झाला यावेळी प्रदेश अध्यक्ष सुनील तटकरे, प्रदेश सरचिटणीस आमदार शिवाजी गर्जे, प्रदेश प्रवक्ते सूरज चव्हाण,जिल्हाध्यक्ष कैलास पाटील गंगापूरकर आदींची उपस्थिती होती. नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत मनोन पवार यांना स्वाभिमानी शेतकरी संघटनेने पाठींबा दिला होता पण त्यांना पराभव पत्करावा लागला होता,आगामी नगरपरिषद,जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीच्या अनुषंगाने राष्ट्रवादी कांग्रेस पक्षात प्रवेश केल्याने तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसची फळी मजबूत झाली आहे, आता पक्षश्रेष्ठी कोणती जबाबदारी उद्योजक मनोज पवार यांच्या खांद्यावर देतात हे बघणे आता उत्सुकतेचे आहे.

# पत्रकार संघाच्या वतीने कष्टकरी महिलांचा सन्मान



तभा वृत्तसेवा


पैठण दि ०९:- महिला दिनानिमित्त पैठण तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला.

जागतिक महिला दिनाचे अवचित्त साधून पैठण तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार भवनातपाच कष्टकरी व स्वावलंबन महिलांना डॉ.उर्मिला चाकूरकर,शालिवाहन नागरी पतसंस्थेचे चेअरमन किशोर चव्हाण, प्रसिद्ध समाजसेवक रामशेठ अहुजा पत्रकार संघाचे अध्यक्ष रमेश लिंबोरे यांच्या हस्ते साडीचोळी व गृह उपयोगी वस्तू भेट देऊन गौरव करण्यात आला. पैठण शहरात गेल्या ४० वर्षापासून फळ विकून आपला व आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या कौसाबाई दारूनकर ,नाथ सागर जलाशयात स्वतःचे जीव धोक्यात घालून आपल्या कुटुंबाच्या उदारहनिर्वासाठी चप्पू वर बसून मासेमारी करणाऱ्या छाया सुभाष कुचे,स्वतःच्या कर्तुत्वावर सात वीट भट्ट्या चालवणाऱ्या संगीता पंजा वाले,पैठण येथील अण्णछत्रालयात स्वयंपाकी म्हणून काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या राजश्री एकनाथ मोरे , गाई,म्हशींचे पालन करून स्वतः गायी ,म्हशींच्या धारा काढून दूध व्यवसाय करणाऱ्या कविता पवार यांना समाजसेवक रामशेठ आहुजा यांच्या तर्फे साडी चोळी देऊन तसेच शालिवाहन नागरि पतसंस्थेचे वतीने मोठा फॅन हि भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी आपला अनुभव सांगताना महिलांना गहिवरून आले व त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले.

यावेळी चेअरमन किशोर चव्हाण यांनी सांगितले की महिलांनी आपल्या कर्तुत्वावर उच्च शिखर गाठलेले आपल्यासमोर अनेक उदाहरण आहेत पैठण तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने सन्मानासाठी ज्या महिलांची निवड केली आहे ते कौतुकास्पद असल्याचे सांगितले.,राम अहुजा, यांनीही आपले मनोगत करताना सांगितले की अशा चांगल्या सामाजिक उपक्रमासाठी आपण सदैव मदत करणारअसल्याचे सांगितले.तर डॉ. उर्मिला चाकूरकर यांनी सांगितले की मराठवाड्यात सगळ्यात कमी स्त्रियांचे जनन दर पैठण तालुक्यात असल्याचे सांगितले.याला एकटा पुरुष कारणीभूत नाहीतर स्त्रीया सुद्धा तितक्याच कारणीभूत असल्याचे त्यांनी सांगितले. पुरुषांना मुलगी हवी असते तर स्त्रियांना आपल्या वंशाचा दिवा म्हणून मुलगाच हवा असतो.यामुळे मुलींची संख्या कमी झाल्याने मुलांना लग्नासाठी मुलगी मिळणे कठीण झाले असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत तारू, बद्रीनाथ खंडागळे,रमेश शेळके,नंदकुमार चव्हाण,गौतम बनकर,मोहन ठाकूर,शिवाजी गाडे,मनोज खूटेकर,सुरेश वायभट, राहुल पगारे,दादा घोडके,ज्ञानेश्वर बावणे,विनोद लोहिया,शालिवाहन पतसंस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मण गायके,शिवाजी घोडसे,नरेश चिकसी,गणेश पवार,अमोल धस योगेश भुजबळ आदी उपस्थित होते.

# देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशीच्या शिक्षेसाठी पैठण कडकडीत बंद



तभा वृत्तसेवा

पैठण दि ०९ : सरपंच स्व. संतोष (आण्णा) देशमुख, मसाजोग यांच्या निर्दयी हत्येच्या तीव्र निषेधार्थ व वाल्मीक कराडसाह सर्व आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी व धनंजय मुंडे यांना सहआरोपी करावे या मागण्यासाठी सर्व धर्मीय समाज बांधव सर्व सामाजिक संघटना व सर्व पक्षीय पदाधिकारी यांच्या तर्फे पैठण बंदची हाक देण्यात आली होती. यावर समस्त पैठणकरांच्या वतीने कडकडीत बंद पाळण्यात आले.

सरपंच देशमुख अमानुष हत्येचा जनमानसात तीव्र संताप आहे. तसेच प्रशासनाकडे दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी सर्व सामान्य जनतेकडून होत आहे. न्याय मिळेपर्यंत हा लढा सुरूच राहील. गुन्हेगारांना कठोर शिक्षा झालीच पाहिजे अशी भूमिका यावेळी आंदोलकांनी घेतली. या बंदमध्ये सर्व नागरिक, व्यापारी संघटना आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी सहभागी होऊन आपला न्यायासाठीचा लढा अधिक बळकट केला.

संतोष (आण्णा) देशमुख यांच्या कुटुंबाला न्याय मिळावा या साठी पैठणच्या जनतेने मोठ्या संख्येने बंदमध्ये सहभागी होऊन आपला निषेध नोंदवला.

# एमजीएमच्या विद्यार्थ्यांचे इंडूरवर्स हॅकेथॉन स्पर्धेत विशेष यश




छत्रपती संभाजीनगर, दि.९ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या सौरव मडके, हरीश सोनवळे आणि विवेक इंगळे या विद्यार्थ्यांनी जगप्रसिद्ध इंडूरन्स टेक्नॉलॉजीस कंपनीच्या इंडूरवर्स २५ हॅकेथॉन या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत विशेष यश संपादन केले आहे. या विशेष यशाबद्दल कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, संचालिका डॉ.परमिंदर कौर, विभागप्रमुख प्रा.सारिका राठी व सर्व संबंधितांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

वाळूज येथे असलेल्या इंडूरन्स कंपनीच्या मुख्यालयात ७२ तासांची 'नॉन-स्टॉप कोडिंग स्पर्धा' आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत देशभरातील विविध महाविद्यालयातून विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी एक राष्ट्रीय स्तरावरील अप्टिट्यूड टेस्ट घेण्यात आली होती. या परीक्षेत सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या ३० सर्वोत्तम विद्यार्थ्यांची निवड या स्पर्धेसाठी करण्यात आली होती.

विद्यार्थ्यांना 'डेव्हलपिंग अ लो - कॉस्ट टेलीमॅटिक्स डोंगल अँड डॅशबोर्ड' या समस्येवर 'फोकस्ड ऑन ऑटोमोटिव्ह इलेक्ट्रॉनिक्स अँड टू व्हीलर टेक्नॉलॉजी' या तंत्रज्ञानावर आधारित उपाय शोधायचा होता. एमजीएम एसओईटीच्या विद्यार्थ्यांनी फ्लटर आधारित क्रॉस-प्लॅटफॉर्म प्लिकेशन विकसित केले ज्या माध्यमातून सेन्सरच्या मदतीने जायरोस्कोप आणि ॲक्सेलेरोमीटर डेटाचे विश्लेषण करणे शक्य होईल. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या या प्रकल्पाला स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

या स्पर्धेच्या आयोजनासाठी प्रा.हर्षवर्धन,प्रा.सुब्रतो मित्रा,प्रा. राहुल चंद्रशेखर आणि प्रा.दिनेश कलानी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (६१) जागे व्हा

डॉक्टरजी नेहमी म्हणायचे 'हिंदू मुस्लिम भाई भाई' हा नारा फक्त हिंदूच लावतात; प्रतिपक्ष लावत नाही. इतिहासात सुद्धा प्रतिपक्षाने असहिष्णु-असंस्कृत-अमानुष वृत्तीनेच आपल्या विरुद्ध अखंड कारस्थाने रचली होती. भारतीय मंदिरांचा विध्वंस व भारतीय विचारांची छी-थू केली होती. इतिहासात थेट दाहिरापासून अगदी आपल्या स्वराज्याचा अस्त होईपर्यंत कधी पृथ्वीराजाने तर कधी राणा प्रतापाने, कधी हक्क- बुक्क या द्वयाने तर कधी कृष्णदेवरायाने, कधी गुरुबंदाने तर कधी गुरुगोविंदाने, कधी छत्रपती शिवरायांनी तर कधी संताजीने, कधी थोरल्या बाजीरावाने तर कधी महादजी शिंदेने- त्यांची कारस्थाने धुळीला मिळवली आहेत. डॉक्टरजी म्हणत ही भयसूचक घंटा ऐका व खडबडून जागे व्हा. व या जागेपणीच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा जन्म झाला. कारण या असामान्य मंथनातून एक अमृतकुंभ डॉक्टरजींच्या हाती पडला होता. व तो म्हणजे हिंदूराष्ट्रवाद. क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## महिला दिन संघटित नारीशक्तीचा विजय दिन म्हणून साजरा केला जावा : प्रा.ज्योती स्वामी



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.९ मार्च : शतकापूर्वी न्यूयॉर्क शहरामध्ये वस्त्रउद्योगातील हजारो महिला कामगारांनी रूट गर्ल्स चौकात जमून प्रचंड मोठी ऐतिहासिक निदर्शने केली.त्याचे फलित म्हणून कोपनहेगन येथे झालेल्या परिषदेमध्ये ठराव पास करण्यात आला आणि ८ मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून साजरा करण्यात येऊ लागला. हा दिवस म्हणजे संघटित नारीशक्तीचा विजय आहे. असे उद्गार मराठी भाषा अभ्यासक व निवेदक प्रा.ज्योती स्वामी यांनी काढले. त्या अजिंठा शिक्षण संस्था संचलित,संत ज्ञानेश्वर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत आयोजित जागतिक महिला दिनानिमित्त बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार व मराठी विभागप्रमुख डॉ.दिलीप बिरुटे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी डॉ. संतोष तांदळे,डॉ.साईराज तडवी, डॉ.विक्रम भुतेकर,डॉ.उल्हास पाटील,प्रा.रवींद्र जाधव, डॉ. एस.एल.पाटील, प्रा.मानकर,डॉ. गणेश मिसाळ, प्रा.कल्याणकर आदी प्राध्यापक उपस्थित होते.या कार्यक्रमाची प्रस्तावना राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.पंकज गावित यांनी तर सूत्रसंचालन डॉ.निलेश गावडे यांनी केले.शेवटी आभार डॉ.प्रदीप गोल्हार यांनी मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## समाजसेवक संजय शहापूरकर यांच्यातर्फे जागतिक महिला दिनानिमित्त आरोग्य व शिक्षण क्षेत्रातील महिलांचा गौरव



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.९ मार्च : जागतिक महिला दिनी आरोग्य व शिक्षण क्षेत्रातील महिलांचा गौरव जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आरोग्य सेविका,आशा,अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचा गौरव उपकेंद्र आमखेडा येथे करण्यात आला. आमखेडा येथील उपकेंद्रात महिला आरोग्य तपासणी शिबिरात समाजसेवक संजय शहापूरकर यांच्या हस्ते या महिलांचा गौरव करण्यात आला. त्यामुळे जागतिक महिला दिनानिमित्त त्यांचा गौरव होत आहे.यानंतर झालेल्या महिला आरोग्य तपासणी शिबिरात ३२ महिलांचे आरोग्य तपासणी करून त्यांना संजय शहापूरकर यांच्या हस्ते मोफत औषधी वाटप करण्यात आली. यावेळी आरोग्य सेविका अश्विनी हिवाळे,आशा सेविका सविता बडोदे,बेबीताई सूर्यवंशी,संगीता चौधरी,दीपा नवगिरे, आशा बैरागी,अंगणवाडी सेविका मंगला ठाकरे,संगीता बोडखे,संगीता चौतमल,साळुंकाबाई वागले,मनीषा मोहारे, ज्योती बारी,वैशाली खलसे,सुनीता रोकडे,मनीषा ढगे व कल्पना बागुल यांच्यासह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सोयगाव पोलीस स्टेशनचे येथे जागतिक महिला दिन साजरा



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.९ मार्च : जागतिक महिला दिननिमित्त सोयगाव पोलीस ठाण्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांनी सोयगाव शहरातील समाजसेविका लता कांबळे,संत ज्ञानेश्वर महाविद्यालय येथील विद्यार्थिनी यांचा गौरव करून,तसेच सोयगाव पोलीस ठाणे अंतर्गत पुरुष पोलीस कर्मचाऱ्याप्रमाणे आपले कर्तव्य पार पाडणाऱ्या महिला पोलीस कर्मचारी सोनाली बिंडे,व महिला होमगार्ड कर्मचारी आरती न्हावी यांचा गौरव उपस्थित मान्यवराच्या हस्ते करण्यात आला.सदरील सोहळा यशस्वी करण्यासाठी सोयगाव पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी चद्राकांत दौड,नारायण जिरी,रवींद्र तायडे,अजय कोळी,राजू सुके,सह होमगार्ड कर्मचारी विजय चौधरी,लोकेश जाधव,विशाल वराडे,सचिन इंगळे,अरुण वाघ,राहुल जाधव,बापू लव्हाळे,योगेश बोखारे,अश्फाक शेख,यांनी परिश्रम घेतले आहे.

## आयडियल इंग्लिश स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न




कन्नड दि.०९ मार्च - तालुक्यातील साखरवेल येथील आयडियल इंग्लिश स्कूलचा ०९ वा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा शनिवारी रोजी उत्साहात पार पडला. भारतीय संस्कृती, विविधतामध्ये एकता भारतीय लोकनृत्य कलेचे विविध कार्यक्रम सादर करण्यात आले, कार्यक्रमाचे उद्घाटन शुभांगी केतन काजे, रूपा पवार, सीमा जाधव यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले, वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे अध्यक्ष गणेश घुगे यांनी केले, यावेळी शाळेच्या वर्षभर राबवलेल्या शैक्षणिक विविध कार्यक्रमाचा आढावा घेतला व पालकांशी संवाद साधला, विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर कौशल्यपूर्ण, कलागुन विकसितपूर्ण शिक्षण देणे महत्त्वाचे आहे असे आपले मनोगत आपल्या भाषणातून संतोष कोल्हे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर व्यक्त केले, यावेळी राजु मोकासे, गणेश घुगे, भगवान गित्ते, विलास पवार, गजानन घुगे, संतोष घुगे, हरीभाऊ थोटे, संजय घुगे, योगेश राजपूत आदीं सह पालक विद्यार्थी उपस्थित होते

## रोखठोक

**दिनेश गुणे**

# अस्वस्थतेकडून आश्वस्ततेकडे...!

घरातील स्थान, आर्थिक स्थैर्य, जीवनशैली आणि कुटुंबातील सदस्यांशी, विशेषत मुलांशी असलेले नाते या असंख्य विषयांभोवती स्त्रियांच्या समस्या वर्षांनुवर्षे गुरफटून राहिल्या. चार-पाच दशकांपूर्वीपर्यंत, जेव्हा कौटुंबिक रूढींचा प्रभाव स्त्रीवर सर्वाधिक होता, तेव्हाची स्त्री म्हणजे पुरुषप्रधान संस्कृतीने रंगविलेले केवळ एक सुबक चित्र होते. म्हणजे, स्त्रीचे रूप, शालीनता, प्रेमळपणा, वात्सल्य आणि स्वयंपाकघरातील जबाबदारी पार पाडण्यातील समर्थपणा किंवा खंबीरपणा या गुणांच्या रंगांनीच स्त्रीचे हे चित्र रंगविले जात असे. पत्नी, आई, सासू, सून, जाऊ-नणंद अशा वेगवेगळ्या कौटुंबिक भूमिकांमध्ये वावरतानाची तिची वागणूक हाच स्त्रीच्या गुणवत्तेचा आणि क्षमतेचा कस ठरविण्याचा निकष होता. काळ बदलत चालला, स्त्रियांनादेखील शिक्षणाच्या आणि करीयरच्या संधींची क्षितिजे खुणावू लागली, तेव्हा स्त्रियांचे उंबरठ्याआड अडकलेले विश्व मोकळे झाले. कुटुंबातील प्रथांच्या पलीकडे जाऊन 'ब्र'देखील काढण्याची हिंमत नसलेल्या स्त्रिया 'बोलत्या' झाल्या, आणि समाजात वर्षांनुवर्षे दबून राहिलेल्या महिलावर्गाला आवाज आहे, याची जाणीव समाजाला होऊ लागली. स्त्रिया केवळ बोलू लागल्या एवढेच नव्हे, तर न पटणाऱ्या बाबींवर ठाम मतप्रदर्शन करून प्रसंगी एकजुटीने संघर्षासही सिद्ध झाल्या. कुटुंबाचा गाडा हाकणे ही सामूहिक जबाबदारी आहे आणि पतीइतकाच पत्नीचादेखील या जबाबदारीतील प्रत्येक पावलावर समान वाटा आहे, हे प्रसंगी पुकारलेल्या लढ्यातून किंवा सिद्ध केलेल्या कर्तबगारीतून स्त्रियांनी दाखवून दिले. या परिवर्तनासाठी स्त्रियांनी बजावलेली भूमिका महत्त्वाची आहे.

व्यापक समाजव्यवस्थेत हा बदल प्रकर्षाने जाणवत असला तरी सामान्य मराठी कुटुंबांमधील 'आई' ही या परिवर्तनाच्या प्रवासात स्वतःला सामावून घेण्याचा अडखळता प्रयत्न करत असते. अजूनही कुटुंबव्यवस्थेच्या जुन्या रूढींविषयीची आत्मीयता तिच्या वागण्याबोलण्यात, व्यवहारांत डोकावते. संध्याकाळी कामावरून घरी परततानाचा प्रवास सुरू करण्याआधी भाजी खरेदी करून, रेल्वेत किंवा बसमध्ये बसायला जागा मिळाली तर प्रवासात शेंगा, पालेभाज्या निवडणारी मराठमोळी स्त्री महानगरांतदेखील अजूनही दिसते. कारण, कुटुंबात परतताना आपली घरातली भूमिका निभावण्याची तिची मानसिकता पूर्वीइतकीच जिवंत आहे. घराबाहेर पडल्यानंतर ही स्त्री हक्कांसाठी कणखरपणे लढू शकते, संघटितपणाने संघर्ष करण्याची तयारीही दाखविते आणि न पटणाऱ्या बाबींवर परखडपणे मतप्रदर्शनही करते. पण संध्याकाळी घरी परतते, तेव्हा मात्र, ती आई, पत्नी आणि गृहिणी असते. संध्याकाळी घरी पोहोचल्यानंतर, दिवसभराच्या कामाचा शीण घालविणाऱ्या विरंगुळ्याचे क्षण तिचे तिनेच शोधलेले असतात. त्या क्षणांमध्ये रमल्यानंतर ती आपल्या घरातल्या भूमिकेत शिरते, हे चित्र अजूनही कित्येक घरांमध्ये दिसते. पुरुषांच्या बरोबरीने नोकरी-व्यवसायाच्या विश्वात वावरणारी प्रत्येक नोकरदार स्त्री घरात किंवा कुटुंबात वावरताना केवळ बदलत्या समाजव्यवस्थेतून आलेल्या आत्मविश्वासाचा किंवा मिळालेल्या हक्कांचा वाटा उचलण्याच्या मानसिकतेतच असते असे दिसत नाही. वाढती महागाई, बदलती जीवनशैली, आणि त्यामुळे कुटुंबाच्या अर्थव्यवस्थेचा डोलारा सांभाळण्यासाठी करावा लागणारा संघर्ष ही आजही मध्यमवर्गीय कुटुंबाची अपरिहार्यताच आहे.

केंद्र सरकारच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयातर्फे कुटुंबातील व्यक्तींच्या वेळेच्या वापरासंबंधीचे एक सर्वेक्षण अलीकडेच पार पडले. त्याचा अहवालही आता प्रसिद्ध झाला असून, रोजगार संबंधित कामांमध्ये महिलांचा सहभाग वाढत असल्याचा निष्कर्ष या अहवालातून समोर आला आहे. विविध दैनंदिन कामांसाठी लोक आपल्या वेळेचा कसा उपयोग करतात, याचे विश्लेषण करणाऱ्या मोजक्या देशांत भारताचाही समावेश आहे. महिला म्हणजे सरकारी योजनांच्या लाभार्थी अशाच नजरेने पाहिले जात असताना, कामाच्या आणि विकासाच्या वाटचालीतील महिलांच्या सहभागाची आता नोंद होऊ लागली आहे. केवळ लाडकी बहीण योजनेसारख्या सरकारी योजनांचे लाभ मिळविण्यातच महिलांना रस नाही. लखपती दीदीसारख्या केंद्र सरकारच्या योजनांच्या माध्यमातून आर्थिक स्वयंपूर्णता साधण्याचा आत्मविश्वासही त्यांनी सिद्ध केला आहे. उद्योगजगतात महिलांनी व्यक्तिगत स्तरावर आणि बचत गटांसारख्या उद्योगांतून संघटितपणे त्यांनी आपल्या कर्तबगारीची क्षितिजे विस्तारली आहेत. संरक्षण दलासारख्या आव्हानात्मक क्षेत्रांतही त्यांच्या कर्तबगारीला वाव मिळू लागला आहे. वर्तमानातील या स्थितीच्या पृष्ठभूमीवरच, ज्या कामाचा मोबदला मिळतो असे काम आणि ज्या कामासाठी मोबदला आकारला जात नाही अशा कामातील महिला व पुरुषांचा सहभाग जाणून घेण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारतर्फे हे सर्वेक्षण करण्यात आले. असे पहिले सर्वेक्षण २०१९ मध्ये झाल्याने, गेल्या पाच वर्षांत महिला आणि पुरुषांमधील कुटुंबाशी संबंधित वेळेच्या व्यवस्थापन आणि उपयोगाबाबतचे मापदंड कसे बदलत गेले, त्याचा एक स्पष्ट आराखडाही या सर्वेक्षणातून समोर आला आहे. त्यानुसार, रोजगार व



संबंधित कामातील पुरुषांचा सहभाग गेल्या पाच वर्षांत सुमारे चार टक्क्यांनी वाढला, तर महिलांचा सहभाग ३.२० टक्क्यांनी वाढला आहे. पाच वर्षांपूर्वी, कुटुंबासाठी घरकाम करणाऱ्या महिला दिवसाकाठी ३१५ मिनिटांचा वेळ व्यतीत करत होत्या, गेल्या पाच वर्षांत या श्रमाचा कालावधी कमी झाला असून आता याच कामकरिता अशा महिला दिवसाकाठी ३०५ मिनिटांचा वेळ देतात, असा निष्कर्ष या पाहणीतून पुढे आला आहे. याचा अर्थ, कुटुंबासाठी करावयाच्या कामाची महिलांची दहा मिनिटे आता वाचली आहेत आणि या दहा मिनिटांचा वापर आराम करणे, करमणुकीसाठी वापरणे, समाजमाध्यमांवर वावरणे किंवा खेळासारख्या विरंगुळ्यात घालविण्यासाठी होऊ लागला आहे. घरातील सदस्यांची, कुटुंबाची काळजी घेण्याची जबाबदारी मुख्यतः महिलांवरच असते. या पाहणीतही त्याला पुष्टी मिळाली आहे. सुमारे ४१ टक्के महिला कुटुंबाची काळजी घेण्याच्या कामात व्यग्र होत्या, तर याच कामातील पुरुषांचा सहभाग केवळ २१ टक्के होता. या कामासाठी महिलांनी दिवसाकाठी १४० मिनिटे दिली, तर पुरुषांनी केवळ ७४ मिनिटे दिली. महिलांवरील या जबाबदारीची परंपरा या सर्वेक्षणातून पुन्हा अधोरेखित झाल्याने, महिलांच्या या कामाची प्रतिष्ठा वाढली पाहिजे. कारण कुटुंबासाठी महिलांनी दिलेल्या वेळामुळे कुटुंबाचा मानसिक विकास होतो, भावी पिढ्यांचे मानसिक संगोपन होते. विकासाच्या या वाटचालीतील हा सहभाग लक्षात घ्यायलाच हवा. महिलांच्या विकासाचा टप्पा आता पार पडला असून विकासाच्या वाटचालीचे नेतृत्व महिलांनी सक्षमपणे उचलले आहे. हे चित्र आश्वासक आहेच, पण एका अस्वस्थ भूतकाळाकडून आश्वस्त भविष्यकाळाकडे महिलांची वाटचाल सुरू झाल्याचे निदर्शकही आहे.

यापूर्वीच्या, गेल्या सुमारे दोन दशकांपासून केल्या गेलेल्या अनेक पाहण्यांतून निष्पन्न झालेल्या निष्कर्षांनुसार, शहरी भागांतील सुमारे २७ टक्के महिला नोकरीसाठी सकाळी घराबाहेर पडत असतात. म्हणजे, साधारणपणे, शहरांत राहणाऱ्या प्रत्येक चार कुटुंबांपैकी एका कुटुंबातील स्त्री नोकरदार असते. अशा वेळी, कुटुंबाचे दररोजचे व्यवस्थान आणि मुलाबाळांची देखभाल हे मोठे आव्हान त्या स्त्रीच्या कुटुंबासमोर असते. या नोकरदार महिलांपैकी सर्वच महिला उच्चपदस्थ नोकरी किंवा उज्ज्वल भविष्यातील संधींची आव्हाने पेलण्यासाठी सरसावलेल्या, उच्चशिक्षित आणि गलेलठ्ठ पगार मिळवणाऱ्या नवश्रीमंत वर्गातीलच आहेत, असे नाही. मुंबईसारख्या महानगरांमधील उपनगरीय रेल्वे स्थानकांकडे जाणाऱ्या शहरी बसगाड्यांच्या थांब्यावर सकाळच्या वेळी लागणाऱ्या रांगा पाहिल्या, की नोकरदार महिलांचे वेगवेगळ्या आर्थिक स्तरांचे चित्र न सांगतादेखील स्पष्ट होऊ शकते. काखोटीला एक साधी पर्स असतानादेखील, हातात एखादी कापडी पिशवी सांभाळत रेल्वेच्या दुसऱ्या वर्गाच्या डब्यातील गर्दीत स्वतःला झोकून देताना जिवावरची कसरत पार पाडत कामाच्या ठिकाणी पोहोचणाऱ्या महिलांचा वर्गदेखील नोकरदार महिलांमध्येच मोडतो. नोकरी ही या महिलांची कौटुंबिक अपरिहार्यता असते. आर्थिक डोलारा सांभाळण्यासाठी घरातील पुरुषाच्या कमाईला जमेल तसा हातभार लावून कुटुंब चालविणे हाच या महिलांच्या 'नोकरदारी'चा अर्थ असतो. अशा महिलांना आपल्या घराची घडी विसकटू न देण्याचेही आव्हान पेलायचेच असते. नोकरी करणाऱ्या या वर्गातील महिलांची आपली कौटुंबिक जबाबदारी झटकण्याची इच्छा नसते किंवा नवऱ्याच्या बरोबरीने काम करत असल्याने घरातील जबाबदारीचा वाटा नाकारण्याची तिची मानसिकता नसते. सामान्यपणे प्रत्येकालाच, आपण जगतो ते जीवन सामान्य वाटत असते. भोवतालच्या श्रीमंतीच्या प्रदर्शनामुळे, दूरचित्रवाणीवर दिसणाऱ्या मालिकांनी रंगविलेल्या कुटुंबजीवनाच्या भपकेबाज चित्रांमुळे आदर्श जीवनाच्या वेगळ्याच कल्पना अनेकांच्या मनात घोळत असतात. स्त्रिया त्याला अपवाद नसतात. त्यातच सकाळी घराबाहेर पडून, सामान्य कमाईसाठी दिवसभर राबणाऱ्या नोकरदार महिला आणि त्यांच्याच आसपास वावरणाऱ्या उच्चभ्रू, उच्चशिक्षित आणि अधिकारामुळे प्राप्त झालेला आत्मविश्वास मिरविणाऱ्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाच्या महिला असे तट नोकरदार महिलांमध्ये आपोआप तयार झालेले असतात. रेल्वेच्या पहिल्या वर्गातून प्रवास करणारी नोकरदार महिला, सेकंड क्लासच्या गर्दीतून लोंबकळत कार्यालय आणि परत घर गाठणारी महिला, भपकेबाज, शोफर ड्रिव्हन कारमधून प्रवास करणारी नोकरदार महिला असे अनेक वर्ग नोकरदार महिलांच्या दुनियेत असल्यामुळे यातील प्रत्येक वर्गाच्या समस्या आणि कुटुंबातील जबाबदाऱ्या हाताळण्याचा दृष्टिकोनही वेगवेगळाच असतो. तरीदेखील, सामान्य कुटुंबातील महिलेसाठी नोकरी हा जगण्याच्या संघर्षांचा अपरिहार्य भाग असल्यामुळे कुटुंबातील जबाबदाऱ्यांचे स्थान इच्छा नसतानासुद्धा दुय्यम ठेवावे लागते. ही खंत अनेक नोकरदार महिलांना सतावतानादेखील दिसते. कामाच्या ठिकाणी होणारा मानसिक ताण आणि नोकरीनिमित्त घराबाहेर राहावे लागल्यामुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य कौटुंबिक समस्यांची चिंता यामुळे अनेक नोकरदार महिलांना रक्तदाब, हृदयदौर्बल्यासारखे विकार जडत असल्याचेही काही पाहणी अहवालांचे निष्कर्ष आहेत. नोकरी ही ज्या स्त्रियांच्या कुटुंबांची गरज असते, त्यांच्या कौटुंबिक आणि आरोग्यविषयक समस्याही वाढत जातात. अशा समस्यांना एकटी नोकरदार स्त्रीच जबाबदार असते का, नोकरी-व्यवसायानिमित्त घराबाहेर पडणाऱ्या पतीचीही समान जबाबदारी असते किंवा नाही, हा अलिकडे एक वादविषय होऊ पाहात आहे. नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या कुटुंबांतील मुलांचे पोषण नीट होत नाही, त्यांच्या आहाराच्या सवयी बदलतात आणि घरातील एकटेपणा घालविण्यासाठी मुलांनी शोधलेल्या बैठ्या पर्यायांमुळे स्थूलपणासारखे विकारही बळावतात, असे एका पाहणीत आढळून आले होते. आर्थिक गरजा भागविण्यासाठी नोकरी करणाऱ्या आणि शैक्षणिक दर्जा उंचावल्यामुळे करीअर म्हणून नोकरी-व्यवसाय करणाऱ्या, अशा दोन्ही गटांतील स्त्रियांच्या मुलांमध्ये असे विकार वाढत असल्याचा निष्कर्ष या पाहणीतून समोर आला होता. नोकरदार महिलांचे घराकडे पुरेसे लक्ष नसल्यामुळे मुलांमधील हे विकार वाढतात, असे या पाहणी अहवालाचे मत आहे. पूर्णवेळ काम करणाऱ्या महिलांच्या तुलनेत, अर्धवेळ काम करणाऱ्या महिलांच्या मुलांमध्ये या विकारांचे प्रमाण कमी असते, तर पूर्णवेळ घरात असलेल्या महिलांच्या मुलांमध्ये ते आणखीनच कमी असते, असे आढळल्यानंतर, नोकरदार महिलांच्या मुलांमध्ये आरोग्याच्या तक्रारी अधिक असल्याचा निष्कर्ष या पाहणीतून काढण्यात आला. या अहवालावर तेव्हा संमिश्र प्रतिक्रियाही उमटल्या. मुलांच्या आरोग्याची जबाबदारी एकट्या स्त्रीची, म्हणजे आईचीच का असावी, वडिलांचीही तितकीच जबाबदारी असायला हवी, असा सूरही उमटू लागला. परंतु, मुलांच्या आरोग्याची जबाबदारी कुणाची असावी हा त्या पाहणीमागील महत्त्वाचा मुद्दाच नव्हता. महिलांनी नोकरीचे क्षेत्र निवडल्यानंतर त्या कुटुंबाच्या आरोग्याची घडी कुठेतरी विसकटते आहे, हे त्या पाहणीतून सामोरे आलेले जुने वास्तव विचारात घेणे आजही आवश्यक ठरले आहे. मुलांच्या आरोग्याची जबाबदारी केवळ आईचीच का, असा सवाल पुढे येऊ लागल्यानंतर, अशा जबाबदारीतील वडिलांचा वाटा हा चर्चेचा स्वतंत्र मुद्दा होऊ शकतो. मुलांचे आरोग्य, शाळा, खाण्यापिण्याच्या सवयी, दैनंदिन जीवनशैली याबाबतच्या सवयींवर पारंपरिक कुटुंबव्यवस्थेच्या संकल्पनेत आईचा प्रभाव असल्यामुळे या पाहणीची दिशा अशी ठरली असावी आणि त्यामुळे कदाचित असा निष्कर्ष काढला गेला असावा. तरीदेखील, या जबाबदाऱ्या केवळ आईच्या किंवा केवळ वडिलांच्या या वादाला तात्पुरते बाजूला ठेवून या समस्येवर विचार करणे अधिक गरजेचे आहे, हे या पाहणीमुळे अधोरेखित झाले आहे. कारण, आरोग्याच्या समस्यांनी ग्रासलेली पुढची पिढी मोठेपणी त्यासाठी नेमके कुणाला जबाबदार धरणार आहे, हे अजून स्पष्ट व्हायचे आहे. 'नोकरदारी' हे या समस्येचे मूळ असेल, तर त्यावरचा तोडगा काय, याचाही विचार आवश्यक आहे. आर्थिक गरजा भागविण्याची निकड आणि कौटुंबिक आरोग्य यापैकी कोणत्या बाबीला प्राधान्य हवे, हेही या निमित्ताने ठरले पाहिजे. नाही तर, जबाबदारीच्या वादात पुढच्या पिढीचे आरोग्य पणाला लागलेले असेल. अस्वस्थ भूतकाळातील या वास्तवाची जाणीव ठेवूनच सक्षमीकरणाची वाटचाल व्हायला हवी.

शनिवारी साजरा झालेल्या आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पूर्वसंध्येस प्रसिद्ध झालेल्या केंद्र सरकारच्या पाहणी अहवालातून पुढे आलेल्या वास्तवाची एक बाजू आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांचे भान सांभाळत भूतकाळाचे सावट पुसून स्वतःसमोरील आव्हाने पेलण्यासाठी सक्षम होऊ पाहणाऱ्या वर्तमानाची दुसरी बाजू यातून महिलांच्या सद्यःस्थितीची दोनही रूपे समाजासमोर आली आहेत. यातील एक रूप आश्वासक आहे. सरकारनेही महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि त्यांना राज्यघटनेने बहाल केलेल्या समान संधींच्या अधिकाराची अंमलबजावणी करण्यासाठी हाती घेतलेल्या अनेक उपक्रमांचा आणि योजनांचा सकारात्मक परिणाम आता देशात दिसू लागला आहे. एका बाजूला सामाजिक प्रथा, परंपरा आणि कौटुंबिक संस्कृतीचे प्रामाणिक पालन आणि दुसरीकडे विकासाच्या वाटचालीत जगासोबत चालण्याची उमेद अशा दोन्ही अनुभवांची शिदोरी महिलांना प्राप्त झाली आहे. एका अस्वस्थ भूतकाळाची सावली आता दूर होऊ पाहात आहे आणि आश्वस्त भविष्याची क्षितिजे महिलांना खुणावू लागली आहेत. या संधीचे सोने करण्यासाठी सरकारसोबत समाजानेही पठडीबाज विचारांच्या चौकटीबाहेर पडण्याची तयारी केली पाहिजे.

dineshgune @gmail.com

## रविवारची पत्रे

### देहदान प्रक्रिया , एक सुखद अनुभव

दि. ६ मार्च रोजी एम्स नागपूर येथे आईचे (वय ८९वर्षे) मरणोत्तर देहदान केले . या आधी देहदान प्रक्रियेबद्दल अनेकदा २०-२५ हजारांचा खर्च, वेळखाऊ प्रक्रिया असं उलटसुलट ऐकायला मिळाल्यामुळे आईची देहदानाची इच्छा योग्य रीतीने पूर्ण होईल का याविषयी मन साशंक होते व करायला धजत नव्हते. पण एम्स येथील ॲनाटॉमी विभागप्रमुखांना अवेळी केलेला फोन ज्या शांततेने आणि पूर्ण सहकार्याच्या आश्वासनाने उत्तरित केला गेला, त्यावरून समाधान झाले व धीर आला. आवश्यक प्रक्रिया, कागदपत्रांची माहिती व यादी व्यवस्थित देऊन ते तयार ठेवण्यास आम्हाला सांगण्यात आले व सोयीची वेळ विचारून त्यावेळेस एम्सची रुग्णवाहिका घरी येईल असे आश्वासन देण्यात आले.

दाराशी अगदी ठरलेल्या वेळी रुग्णवाहिका आली आणि त्यातील कर्मचारी, नम्रपणे आणि शांतपणे आईला नेण्याच्या कामात मदत करते झाले. आईचे पार्थिव सन्मानजनक स्थितीत ठेवतील ना, अशी शंका वारंवार मनात येत होती. पण तिथे गेल्यावर स्वतः विभागप्रमुखांनी सर्व सोपस्कार आपल्या देखत पूर्ण करवून घेतले. मृतात्म्यास श्रद्धांजली , देहदान केल्याबद्दल आभार या गोष्टी पूर्ण गांभीर्याने व नातेवाईकांच्या मनःस्थितीचा पूर्ण आदर करून पार पाडल्यानंतर कागदी प्रक्रिया,... आता इथे मात्र भरपूर वेळ जाईल असे वाटत होते, मनाची तयारीही होती. पण अक्षरशः पंधरा मिनिटांत पूर्ण कागदोपत्री प्रक्रिया संपवून आम्हाला देहदानाचे अधिकृत प्रशस्तिपत्र बसल्याजागी आणून देण्यात आले व आमच्या परतीच्या सोयीची चौकशी करण्यात आली.

हे सर्व झाले ४०-५०मिनिटांत.अगदी निःशुल्क. देहदानाविषयी आपल्याही शंका, गैरसमज दूर करण्यात कामी येईल म्हणून हा सुखद अनुभव शेअर करतोय.

**श्रीकांत दिवाकर सिरपूरकर**/ ९८२२२२५१२४

●●●

### विश्व हिंदू गर्व महाकुंभ पर्व एक अविस्मरणीय क्षण

वेद, शास्त्र, पुराणात कुंभस्नानाचे महत्त्व सांगितले आहे. भारतामध्ये ४ अतिशय पवित्र क्षेत्री हरिद्वार, प्रयाग, त्र्यंबकेश्वर, उज्जैन येथे पूर्ण किंवा अर्ध कुंभाचे आयोजन केले जाते. या वर्षीच्या तीर्थप्रयाग येथील कुंभ हा महाकुंभ म्हणून गणला जातो आहे. असे म्हणतात की कुंभामध्ये स्नान केल्याने सर्व पाप धुतले जातात व मोक्षाचे रस्ते उघडतात व पुण्य लाभते. महाकुंभाचे अनेक व्हिडीओज सोशल मीडियावर बघितले. तुफान गर्दी, कोट्यवधी भाविक अमृत स्नानाकरिता तीर्थप्रयाग येथे येत आहेत. सर्व ट्रेन्स फुल्ल, बसेस फुल्ल, विमानांची तिकिटे दुप्पट, तिप्पट, कार प्रवासाने अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी, तरी पण आम्ही सकारात्मक राहून ट्रेनने जाण्याच्या तारखा ठरवून जाण्या-येण्याचे रिझर्व्हेशन केले. अपेक्षेनुसार वेटिंग तिकीट मिळाले. पण निश्चय पक्का होता की कुठल्याही परिस्थितीत तीर्थप्रयाग येथे जायचेच. जसे जमेल तिथे रात्री काढायच्या व अमृत स्नान करूनच नागपूरला परतायचे. अनेक वर्षांपासून कुंभमध्ये जाण्याची जबरदस्त इच्छा होती. आमचे परिचित नागपूर येथील डॉ. मनोज तत्त्ववादी, विहिंप, नागपूर यांच्यासोबत बोलणे झाले व त्यांनी एका क्षणातच प्रयागराज येथे निवासाची सोय होईल असे सांगितले. आम्ही विचार केला की महाराजांच्या कृपेने निवासाची सोय झाली, आता नागपूरहून प्रयागराज येथे पण जाण्याची सोय महाराज नक्कीच करतील. जाण्याचा दिवस उजाडला. आम्ही नागपूर स्टेशनवर वेटिंग तिकीट घेऊन पोहोचलो... गाडी प्लॅटफॉर्मवर आलीच होती व खचाखच गर्दी, तिकीट परीक्षकाला आम्ही विचारपूस केली. ते म्हणाले, कुंभाला जात आहात का? पण कुठेच जागा मिळणार नाही. जनरलमध्ये अथवा कुठल्याही स्लीपर कोचमध्ये जिथे जागा मिळेल त्या बोगीत चढा. आम्ही जय श्रीराम म्हणत टेनमध्ये चढलो. विचार करायला क्षणभर सुद्धा वेळ नव्हता.



लगेचच गाडी सुटली. आम्ही पण सुखावलो, कुठे तरी उभे राहायला जागा मिळाली. दोन समजूतदार व्यक्तींनी आम्हाला थोडी बसायला जागा दिली. ती महाराजांचीच कृपा होती. दिवसभराचा प्रवास करून गाडी रात्री ११.३० वाजता प्रयाग येथे पोहोचली. प्लॅटफॉर्मवर उतरल्यावर तिथल्या वातावरणात एक वेगळे चैतन्य जाणवले. रात्री १२ वाजता सुद्धा चांगलीच वर्दळ व तुफान गर्दी होती. ऑटो करून आम्ही सांगितलेल्या स्थळी जाण्यास निघालो. एका ठिकाणी शुद्ध शाकाहारी व बिना लसूण-कांद्याच्या भोजनाचा आनंद घेतला व पुढे जाण्यास निघालो.

प्रयागराज येथील स्वच्छ रस्ते, लखलखणारे दिवे, रोषणाई, पुलावरून जाताना कुंभचा संपूर्ण परिसर दिव्यांनी उजळून निघाला होता. अशी प्रचंड सोय एक आध्यात्मिक ओढ व दैवी शक्ती असणारी व्यक्तीच करू शकते, ती व्यक्ती म्हणजे उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ. उत्कृष्ट नियोजन असल्याचे उत्तम उदाहरण होय. आमची जेथे निवासाची सोय केली होती त्या स्थळी आम्ही येऊन पोहोचलो. रुख्मिणी मठ, मुक्तिमार्ग, सेक्टर १६ या ठिकाणी आमची राहण्याची उत्तम सोय होती. प. पू. जगद्गुरू श्री. राजेश्वरानंद माउली सरकार हे रुख्मिणी मठ, कौंडण्यपूरर, अमरावती जिल्हाचे पीठाधीश होय. तेथे अनेक तंबू उभारण्यात आले होते. स्वामीजींचे जवळचे सेवक गिरिधर यांनी आमची व्यवस्थित विचारपूस करून चांगली सोय केली. प्रचंड गर्दी असूनही आमचे त्रिवेणी संगमावर वसंत पंचमीच्या दिवशी छान स्नान झाले. ठिकठिकाणी पिण्याकरिता पाणी, पुरुष-महिलांकरिता स्वतंत्र शौचालय, जाण्या-येण्याकरिता अनेक पादचारी पूल, ठिकठिकाणी अनेक संतांनी मोठमोठे भंडाऱ्यांचे आयोजन केले होते व शासनाने पण ठिकठिकाणी भव्य महाप्रसादाचे आयोजन केले होते. ठिकठिकाणी अनेक प्रख्यात कथाकारांचे रामकथा, शिवपुराण, श्रीमद्भागवत कथा अशा अनेक पौराणिक कथांचे उत्तम आयोजन केले होते. भारतातील ६० कोटी भाविकांनी तीर्थराज प्रयाग येथे महाकुंभात येऊन अमृत स्नान केले. हा आकडा संपूर्ण विश्वात हिंदू शक्ती प्रदर्शनाचा महायोग व महाविक्रम होय. ४८ तासांतले अविस्मरणीय क्षण हृदयात साठवून आम्ही परतीच्या प्रवासाला निघालो. बघतो तर काय पू. ब्रह्मचैतन्य महाराजांच्या व पू. स्वामीजींच्या कृपेने आमचे परतीचे वेटिंग तिकीट कन्फर्म झाले होते.भारत देशने 'राम' रूप में मोदी नाम का पाया हिरा... 'श्याम' रूप में योगी नाम का मोती.

**आनंद पाठक**/ ९९७०६००१२३

●●●

### खरा महाराज, सज्जन, साधू, संत कोण ?

कोणत्याही व्यक्तीच्या पेहराव, पोशाखाकडे बघून किंवा शरीरावरील भगवे वस्त्र, दाढी, जटा, कपाळावरील गंध, तिलक गळ्यातील माळ, हातादंडावरील माळा यावरून कोणालाही खरा महाराज, सज्जन, साधू, संत समजण्याची चूक माणसाने करू नये. याबाबत वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज त्यांच्या एका भजनात प्रबोधन करताना म्हणतात... अंगी नाही ज्ञान म्हणे साधू मला मान, साधू नावानं साधू होत नाही रे, साधू हॉटेलचा चहा पाणी नाही रे ।।धृ।। ज्याला आत्मस्वरूपाचं ज्ञान झाले नाही ती व्यक्ती साधू होऊ शकत नाही. नुसतं साधू नाव ठेवल्याने, म्हटल्याने कोणी साधू होत नाही. कारण साधू काही हॉटेलचा चहापाणी नाही असं तुकडोजी महाराज म्हणतात. याच भजनाच्या पहिल्या कडव्यात तुकडोजी महाराज म्हणतात.. जंगलच्या अस्वलीला मोठमोठ्या जटा । पारधी लंगोटीने त्यागी दिसे मोठा । कुत्र्याच्या श्वानाच्या अंगावर भगव्याची छटा । गाढवाच्या अंगी नाही भस्माचा तोटा । साधू हॉटेलचा चहा पाणी नाही रे.. या पहिल्या कडव्यात तुकडोजी महाराज म्हणतात बाबारे.. जंगलातील अस्वलीच्या अंगावर भरपूर केस असतात. पारध्याच्या अंगावर लंगोटी असते. श्वानाच्या अंगावर भगव्या रंगाच्या छटा असतात. जमिनीवर लोळून लोळून गाढवाचे अंग भरपूर भस्म लागल्यासारखे दिसते. यात प्रबोधन करताना महाराज म्हणतात की एखाद्या व्यक्तीने चेहऱ्यावर दाढी मिशा वाढविल्याने डोक्यावर लांब लांब केस जटा वाढविल्याने, अंगावर कमीत कमी कपडे तसेच भगवे वस्त्र घातल्याने, अंगावर भस्म लावल्याने ती व्यक्ती काही साधू होत नाही. त्या व्यक्तीच्या बाह्य स्वरूपावरून तिला साधू समजू नये. या भजनाच्या दुसऱ्या कडव्यात तुकडोजी महाराज म्हणतात.. साधूचं साधूत्व नाही पंथात । साधूचं साधूत्व नाही तीर्थात। साधूचं साधूत्व नाही वर्णात । जाती पातीत नाही साधूची मात। यात प्रबोधन करताना महाराज म्हणतात की खऱ्या साधूचं साधुत्व हे कोणत्याही पंथात, तीर्थात, वर्णात मर्यादित नसते. साधूचं साधुत्व हे जातिपातीपुरतं मर्यादित नसते. भजनाच्या तिसऱ्या कडव्यात तुकडोजी महाराज म्हणतात.. सत्याचरणाविण साधूत्व नाही। आत्मज्ञानाविण साधूत्व नाही। प्रभु भजनाविण साधूत्व नाही। सेवाभावाविण साधूत्व नाही। तुकड्यादास म्हणे ऐका ही ग्वाही.. यात प्रबोधन करताना महाराज म्हणतात ज्याचं आचरण नेहमी चांगले आहे, जो नेहमी सत्य बोलतो, ज्याला आत्मस्वरूपाचं ज्ञान झाले आहे, जो नेहमी प्रभूचं नामस्मरण भजन करतो, जो तळमळीने समाज प्रबोधन करतो तोच खरा साधू होय अशी ग्वाही वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज भजनातून देतात. मग खरा महाराज, सज्जन, साधू, संत कोण? जो नेहमी ईश्वराचे नामस्मरण भजन करतो, जो सर्व प्राणिमात्रांवर दया, प्रेम करतो, जो जनतेलाच जनार्दन समजून जनतेची सेवा करतो, जो अन्नदान ज्ञानदान करतो, जो परोपकारी कार्य करतो, जो कोणालाही त्रास देत नाही, पात्र नसताना जो सरकारी योजनांचा लाभ घेत नाही, भजन कीर्तन प्रवचन सेवेचा जो मोबदला घेत नाही, घेतलेले कर्ज जो वेळेत परत करतो, देशाच्या विकासासाठी दरवर्षी आयकर लागत असल्यास जो सरकारकडे जमा करतो, रंजले गांजले आंधळे पांगळे गरजूंना जो मदत करतो, मानसिक, शारीरिक, आर्थिक आधार देतो, भुकेलेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी, दुःखी निराश झालेल्यांना जो हिंमत देतो, ज्याला आईवडिलांच्या आशीर्वादामुळे गुरुकृपेने ईश्वराच्या कृपेने आत्मज्ञान झाले आहे, आत्मपरमात्म तत्त्वाचा साक्षात्कार झाला आहे, जो या विश्वाला ईश्वराचे स्वरूप (ब्रह्मस्वरूप) समजतो तीच व्यक्ती खरा महाराज, सज्जन, साधू संत होय.

**अशोक पंडित**/ ९९२२२३६७७३

●●●

### महिला दिनी यांचाही सन्मान होणे गरजेचे

आपण इतिहास जर पाहिला तर त्यात आपल्याला कर्तृत्व गाजवणाऱ्या उदाहरणार्थ झाशीची राणी लक्ष्मीबाई, जिजामाता, राणी चेनम्मा या व यासारख्या अनेक कर्तृत्वशाली महिलांची मांदियाळी पाहायला मिळते. यांनी आपल्या तेजाने इतिहास गाजवलाच नव्हे तर इतिहासात मनाचे स्थानही मिळवले. इतिहासात त्यांची नोंद सुवर्ण अक्षरांनी झाली आहे. भारतीय इतिहास त्यांचे अमूल्य योगदान कधीही विसरणार नाही. झाशीची राणी लक्ष्मीबाई, जिजामाता अशा स्त्रिया केव्हा स्वतःपुरता किंवा एखाद्या विशिष्ट समाजापुरता मर्यादित नव्हत्या. तर त्या समस्त स्त्रीशक्तीच्या प्रतीक म्हणून गौरवल्या गेल्या. खरं तर ही स्त्री शक्ती केवळ या स्त्रियांकरिताच मर्यादित होती का? तर नक्कीच नाही. इतिहासात अशा काही मोजक्याच स्त्रिया आहेत त्यांच्याबद्दल आपल्याला माहीत आहे. परंतु इतिहासात नाव नोंदवल्या गेलेल्या अशाही अनेक स्त्रिया आहेत ज्यांनी इतिहासात घडवण्यात योगदान दिले परंतु इतिहासाने त्यांची नोंद कधीच घेतली नाही. हल्ली आजची स्त्री घर, संसार, मुले याबरोबरच पतीची आर्थिक बाजूही सांभाळते. नोकरी किंवा व्यवसाय व घर अशी तारेवरची कसरत ती लीलया पार पाडते. ही स्त्री सर्वसामान्य माणसाची पत्नी असो वा असामान्य काम करणाऱ्यांची पत्नी असो. कुठल्याही परिस्थितीत तिचे योगदान महत्त्वपूर्णच असते. एखादा ख्यातनाम पुरुष वेगवेगळ्या क्षेत्रांत मोठमोठाली कामे करतो. प्रसिद्धी मिळवतो, पैसा मिळवतो. तेव्हा त्या पुरुषाची स्त्री अभिमानाने त्याच्यासोबत मिरवते तेव्हा तिच्या भाग्याचा सर्वांनाच हेवा वाटतो. परंतु पती कार्यमग्न असताना त्याच्या अनुपस्थितीत तिने सांभाळलेल्या घर, संसाराच्या जबाबदाऱ्या व त्या पूर्ण करताना होणारी तिची मानसिक व शारीरिक ओढाताण मात्र कुणालाच दिसत नाही. मुलांचे शिक्षण सासू-सासरे, त्यांचे आजारपण, त्यांची दुखणी, त्यांची सेवा करणे, एखाद्या मंगल कार्यात समारंभात पतीसोबत मिरवण्याची इच्छा असताना देखील पतीच्या अनुपस्थितीमुळे एकटीने हजर राहावे लागणे. हे केवळ पतीचे कार्य अखंड चालावे, त्यात विघ्न येऊ नये म्हणून स्त्रियांना असल्या हौशी मौजीचाही त्याग करावा लागतो. या प्रकारे का होईना अप्रत्यक्षपणे पतीच्या कार्यात पती सहयोग करणाऱ्या स्त्रियांचे त्याग व कष्ट प्रकाश झोतात येत नाही. किंबहुना त्यांच्या या कार्याचा साधा संदर्भही इतिहासात कुठे आढळत नाहीत. पौराणिक काळातील उदाहरण द्यायचे झाले तर श्रीराम पत्नी सीतामाईचे वनवासातील दुःख सर्वांनाच ज्ञात आहे. परंतु लक्ष्मण पत्नी उर्मिला पती विरहात एकटीच आयोध्येत राहिली. वनवासात जाण्यापूर्वी लक्ष्मणाने उर्मिलावर आई-वडिलांची सेवा करण्याचे दायित्व सोपवले. असे म्हणतात लक्ष्मणाला भाऊ श्रीराम व माता सीतेची सेवा अहोरात्र करायची होती. पण त्याची झोप आडवी यायची. तेव्हा त्यांनी निद्रा देवीला विनंती केली की त्याच्याऐवजी त्याची झोप त्याची पत्नी उर्मिलाला यावी व आपल्या झोपेची जबाबदारी ही त्यांनी स्वतःऐवजी उर्मिलावर सोपविली. तिचा चौदा वर्षाचा कालावधी सासूची सेवा करण्यात व झोपण्यातच गेला. तिला तिचे वैयक्तिक असे आयुष्य उरले नाही. तिच्या या दुःखाची व त्यागाची ओळख जगाला कमीच आहे महाभारत काळात पांडवपत्नी द्रोपदीचे अपमान व कष्ट सर्वांनाच ठावूक आहे पण पांडवाच्या इतर पत्नी जसे युधिष्ठिराची पत्नी देविका, भीमाची पत्नी हिडिंबा व बलांधरा, सहदेवाची पत्नी विजया, पराक्रमी व सर्वश्रेष्ठ धनुर्धारी अर्जुनाची पत्नी चित्रांगदा जिने अर्जुनाशी विवाह करण्यासाठी प्रथम अपत्याचाही त्याग केला. तसेच इतर अर्जुन पत्नी जशी उलुपी, प्रमिला व सुभद्रा पांडवाच्या इतर पद्धतींचा त्याग व त्यांना झालेला पतिविरह याचा महाभारतात कुठेच उल्लेख नाही. अशा अप्रत्यक्षपणे योगदान देणाऱ्या स्त्रियांचा समाज सदैव ऋणी राहील.

**हेमांगी देशपांडे**/ ७३५०८२३७४२

●●●

### अल्पवेळ काम करून जनतेशी करीत असलेली प्रतारणा?

कर्मचाऱ्यांना जेव्हा आठवा वेतन आयोग देणे किंवा तत्सम पगारवाढ करणे अशा बाबी करत असताना ते कर्मचारी खरंच त्या पगाराचा मोबदला देत आहे ना, याची देखील खात्री करून घेणे आवश्यक आहे. आज कार्यालयात मग ते आरोग्य खातं असू दे की इतर कोणतेही, प्रत्येक कार्यालयात काही कर्मचारी खरंच आपल्या कामाशी, आपल्या पगाराशी प्रामाणिक आहेत का? कामाच्या ठिकाणी आल्यावर सकाळी चहा, दुपारी आणि संध्याकाळी चहा, डबा किंवा नाश्ता खाण्यात घालवलेला अत्याधिक वेळ, वरून गप्पागोष्टी त्यातच एखादी फाईल आली तर चिरीमिरीसाठी केलेला आग्रह, अशी दयनीय अवस्था शासकीय कार्यालयात दिसून येते. वरिष्ठ अधिकाऱ्यांची याबाबतची उदासीनता बघवत नाही. डोळ्यासमोर घडत असलेला गैरप्रकार उघड्या डोळ्यांनी पाहणे किंवा त्यात सामील होणे, अशी भूमिका ते ठेवतात. पाच किंवा सहा दिवसांपैकी दोन दिवस कामावर रुजू राहणे, तीन दिवस आपल्या घरी राहणे, वैयक्तिक कामे करणे किंवा सहा वाजेपर्यंत कार्यालयाचा वेळ असेल तर एक दीड वाजता कामे बंद करून घरी येणे, बरेच जण अशाप्रकारे वागतात. त्यामुळे कोणी कोणाला बोलू शकत नाही. ज्या कामासाठी शिपायांची नियुक्ती केली ते साहेबांपेक्षाही वरचढ झालेले दिसून येतात. काम करण्याची त्यांचीही मानसिकता कमी झाल्याचे लक्षात येते. कर्मचाऱ्यांची अशी मानसिकता होण्यामागे काय कारण असावे बरे? कुठलीही कारवाई त्यांच्याविरोधात होत नाही. कदाचित शिक्षेची भीतीसुद्धा कमी झाली असेल. 'मी सेवक' या भूमिकेत न राहता येथील 'मालक' आहे. त्यामुळे जनतेला कसेही हाताळले तरी चालते, अशी मानसिकता त्यांनी करून घेतल्याचे दिसते. माझी सर्व कर्मचाऱ्यांना विनंती आहे की, आपण आपले काम चोख आणि प्रामाणिकपणे करून देशाला पुढे न्यावे. जनतेची लूट करू नये. तळागाळात बोकाळलेला भ्रष्टाचार आपल्या एका कृतीने कमी होऊ शकतो. गरज आहे ती फक्त विचार बदलवण्याची, एक सेवक म्हणून वर्तन करण्याची.

**डॉ. भारती अनिल हेडाऊ**/ ९४२१७७३९९९

●●●

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# कत्तलीसाठी आणलेल्या ३ गोवंशसह ६ क्विंटल हाडे भरलेले वाहन जप्त



**तभा वृत्तसेवा**
**माहुर,दि. ०९ मार्च**

माहूर शहरातील वार्ड क्रमांक १० मधील एका घरात कत्तलीच्या उद्देशाने आणलेले तीन गोवंश आणि हाडे भरलेले वाहन उभे असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यावरुन सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवप्रकाश मुळे यांनी तात्काळ ऍक्शन मोडवर येत पोलीस व होमगार्डसह सदरील जायमोक्यावर पोहचत अचानकपणे धाड टाकून सदरील घरातून तीन गोवंश आणि गोवंशाची हाडे भरलेला टेम्पो असा एकूण ०४ लाख २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून पाच जणांना ताब्यात घेत गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई दि. ०८ मार्च रोजी दुपारी १२.ते ०१वाजताच्या दरम्यान माहूर पोलीसांनी यशस्वीपणे पार पाडली.

गोपनीय सूत्राकडून खात्रीशीर माहिती मिळाल्यावरुन माहूर पोलीस ठाण्याचे सपोनि. शिवप्रकाश मुळे यांनी त्यांचे अधिनस्थ सहकर्मी पोलीस कर्मचारी व गृहरक्षक दलाच्या जवानांसह वार्ड क्रमांक १० येथील एका घरावर छापा मारला असता तेथे कत्तलीच्या उद्देशाने आणलेले तीन बैल गोवंश आणि त्या घरासमोर महिंद्रा पिकअप टेम्पो एमएच ३० बी १९९४ मध्ये तब्बल सहा क्विंटल गोवंशाची हाडे असल्याचे पोलिसांना आढळून आल्याने सदरचे तीन बैल गोवंश आणि गोवंशाच्या हाडांनी भरलेला टेम्पो तातडीने जप्त करून माहूर पोलीस ठाण्यात जमा करण्यात आले. या धाड आणि जप्तीच्या कारवाईत एकूण पाच आरोपींवर महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईत पोहेकाँ. गजानन चौधरी, पोहेकाँ प्रकाश गेडाम, पोहेकाँ परमेश्वर कनकावाड, गजानन जाधव, संग्राम पवार,ज्ञानेश्वर वेलदोडे ,नामदेव इंनकर आणि होमगार्ड संजय चव्हाण,अरविंद राठोड, आकाश गिनगुले, अजय राठोड, पंकज मुरकुटे आदिंचा सहभाग होता. सपोनि शिवप्रकाश मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकाँ. गजानन चौधरी हे या घटनेचा पुढील तपास करत आहेत.

# जागतिक महिला दिनानिमित्त बडूर ग्रामपंचायतीचा अनोखा उपक्रम



**तभा वृत्तसेवा**
**बिलोली,दि. ०९ मार्च**

जागतिक महिला दिनानिमित्त ग्रामपंचायत कार्यालय बडूरच्या वतीने महिला मेळावा व किशोरी हितगुज मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून सुरुवात करण्यात आली. यावेळी ग्रामपंचायतीच्या वतीने मान्यवरांचे स्वागत करून उपस्थित महिलांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमात गावातील विविध स्पर्धेत यश व नोकरी मिळवलेल्या मुलामुलींच्या आईंचा सन्मान करण्यात आला. यावेळी समाजबंध निर्मित 'प पाळीचा' या माहिती पुस्तिकेचे विमोचन व वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरपंच चेतना मोहन जाधव यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष समारोपाच्या भाषणात उपविभागीय पोलीस अधिकारी रफिक शेख यांनी बालविवाह प्रतिबंधासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा,महिला सुरक्षितता आणि महिला सक्षमीकरण या विषयावर विस्तृत असे उपस्थितना मार्गदर्शन केले. तर आरोग्य उपकेंद्राच्या समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.नम्रता खानापुरे यांनी बालविवाह प्रतिबंध,विधवाना सन्मान मिळावा,मुलीचा जन्मदर वाढावा,किशोरवयीन मुलींनी घ्यावयाची काळजी याविषयावर मार्गदर्शन केले तर गौतम भालेराव आणि कमलाकर जमदडे यांनी ही आपले विचार व्यक्त केले.

सामाजिक कार्यकर्ते भीमशाहीर गौतम भालेराव यांचा संविधान जागर पुरस्कार मिळाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते बालाजी यलगंदरे,कमलाकर जमदडे,नामदेव कल्याणकर,रमेश सोमवारे,पो.पा हणमंतराव जाधव पाटील,ग्राम पंचायत सदस्य आनंद पा.जाधव,मुख्याध्यापक साहेबराव कवळे,सहशिक्षक राजू पाटील,प्रबुद्ध दुगाने,अजय तोटावार,सहशिक्षिका पुजा मुदलवार यांच्या समवेत अंगणवाडी कर्मचारी,आरोग्य कर्मचारी,ग्राम पंचायत सेवक व किशोरवयीन मुले-मुली,गावातील महिला व पुरुष हे मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचलन पांडूरंग मामीवार यांनी केले तर आभार गावच्या सरपंच चेतना जाधव यांनी मानले.

## स्वामी विवेकानंद महाविद्यालयात महिला दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**मुक्रमाबाद,दि. ०९ मार्च**

येथील स्वामी विवेकानंद महाविद्यालयात ८ मार्च रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय महिला दिन प्राचार्य विवेक इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. विलास पवार हे उपस्थित होते तर प्रमुख अतिथी म्हणून चंद्रकांत पाटील आणि प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. सूर्यकांत सकनूरे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आर.बी.मादळे यांनी केले. तर प्रास्ताविक डॉ. बाविस्कर रवींद्र यांनी केले. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते डॉ. सूर्यकांत सकनूरे यांनी महिलासंदर्भात असलेल्या कायद्याविषयी उपस्थिताना माहिती दिली. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप डॉ.विलास पवार यांनी केला. या कार्यक्रमास उपस्थितांचे आभार डॉ आर.बी.बाविस्कर यांनी मानले.यशस्वी करण्यासाठी बालाजी सादगीरे, गायकवाड संविधान यांनी परिश्रम घेतले.

## गोदावरी कॉलेज ऑफ बँकिंगमध्ये महिलांची मन की बात!

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०९ मार्च**

जागतिक महिला दिनानिमित्त समाजातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचा सन्मान व त्यांच्या मनातील विविध भावभावनांचे विश्व मुलाखतीच्या माध्यमातून जाणून घेण्याचे काम गोदावरी कॉमर्स,सायन्स अँड टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांनी मन कि बात या आपल्या आगळ्या वेगळ्या कार्यक्रमद्वारे केले .

गोदावरी बी.कॉम. बँकिंग कॉलेजच्या मार्गदर्शक राजश्री पाटील यांच्या संकल्पनेतून व संचालक अजय झरकर यांच्या नियोजनाखाली जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तुकाई प्रतिष्ठानच्या अध्यक्ष कीर्ती तगडपल्लेवार होत्या. या चर्चासत्र व मुलाखत कार्यक्रमात महिलांच्या विविध विषयांवर अत्यंत साधक बाधक चर्चा झाली.विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नावर मान्यवरांनी अत्यंत प्रभावीपणे मनमोकळी उत्तरे दिली .विविध परिसंवादात प्रामुख्याने एन.एस.बी.कॉलेजच्या उपप्राचार्य अर्चना भावनाकर,डॉ मेघश्री देशमुख,एल.आय.सी.च्या विकास अधिकारी मनप्रितकोर कंधारवाले, सहाय्यक शिक्षिका निशा गुडमेवार,पाथवे कॉमर्स अकैडमीच्या डॉ.अनुजा मुधोळकर,प्रा.पूनम लोहना,सहाय्यक पोलीस शिल्पा बलखंडे,आकार शाळा,वसमतचे संचालक रती देशपांडे,हर्जीनदर कोर,अँड.प्रतिमा बंडेवार,जोशी गृहद्योगाच्या प्रमुख राधिका जोशी,अँड. श्वेता गायकवाड,वायब्रँट कॉमर्स अकादमीच्या सोनल सारडा ,प्रो.विद्या दादाराव शिंदे,अँड.सन्मती देशमुख हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### ग्लोरियस प्रायमरी इंग्लिश स्कूलमध्ये जागतिक महिला दिन उत्साहात

**मुदखेड-** येथील ग्लोरियस इंग्लिश मेडियम स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत आज दि ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला शाळेच्या प्रांगणा मध्ये राजमाता,राष्ट्रमाता जिजामाता,पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर,झाशीची राणी लक्ष्मीबाई,क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले,त्यागमूर्ती रमाबाई आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन शाळेच्या मुख्याध्यापीका सौ.ज्योती डांगे व सर्व शिक्षक यांच्या हस्ते करण्यात आले. शाळेतील मुलींनी राजमाता,राष्ट्रमाता माँ जिजाऊ,पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर,झाशीची राणी लक्ष्मीबाई,क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले,त्यागमूर्ती रमाबाई आंबेडकर पहिल्या महिला पंतप्रधान इदिरा गांधी, पहिल्या राष्ट्रपती प्रतिभा ताई पाटील,राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु, तसेच शिक्षण,खेळ,राजकीय, संशोधक,वैज्ञानिक,विचारवंत अशा विविध क्षेत्रात महिला आज कार्यरत असलेल्या व डॉक्टर,इंजिनिअर,शिक्षक, फॅशन डिझिएनर, पायलट, वैज्ञानिक अशा प्रत्येक क्षेत्रात आज महिला कार्य करत आहेत. आशा सर्व महिलांचा सन्मान म्हणून शाळेतील विद्यार्थ्यींनींनी त्यांच्या वेशभूषा धारण करून त्यांच्या प्रती आदरभाव व्यक्त करण्यात आला. या कार्यक्रमाचे सुंदर संचलन शाळेची विद्यार्थ्यींनी आजका मनारा काझी यांनी केले तर शाळेच्या सहशिक्षिका राणी तेलंगे यांनी आभार व्यक्त केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ,सौ.प्रतिभा कांबळे, राणी तेलगे,इफ्रा सुलताना, अनम फतेमा, फरहीन बेगम, श्रीकांत उन्हाळे, विकास हिरे, अरुणा चंद्रे यांनी परिश्रम घेतला होता.

### बाऱ्हाळीत जागतिक महिला दिनानिमित्त महिलांचा सन्मान व सस्नेह मेळावा



**बाऱ्हाळी-** येथील विद्या विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्रीमती विजयाताई भाऊसाहेब देशपांडे यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त महिलांचा सस्नेह मेळावा घेऊन पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ. मालाताई दिलीप पुंडे या होत्या. मुखेड तालुक्यातील बाऱ्हाळी येथे शनिवार दि. ८ मार्च रोजी भाऊसाहेब देशपांडे मंगल कार्यालय येथे जागतिक महिला दिनानिमित्त महिलांचा सस्नेह मेळावा घेण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सौ. मालाताई पुंडे तर प्रमुख व्याख्याते म्हणून सौ. मनदिपकौर सिद्धू नांदेड, सौ. अंजली चौधरी नांदेड, सौ. संध्या मठदेवरु बाऱ्हाळी तर व्यासपीठावर श्रीमती विजयाताई देशपांडे, सरपंच सौ. अंजलीताई देशपांडे, डॉ. दिपाली रॅपनवाड आदी मान्यवर महिला उपस्थित होत्या. प्रथम विद्येची देवता सरस्वतीचे पूजन व दीप प्रज्वलन करून सौ. प्रज्ञा शिरीष लव्हेकर यांच्या स्वागत गीतानंतर कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजक विजयाताई देशपांडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्तावित केले. तदनंतर सौ. मनदिपकौर सिद्धू , सौ. अंजलीताई चौधरी, सौ. संध्या मठदेवरु यांनी आपल्या मनोगतातून महिलांच्या कर्तव्यांची, अधिकाराची व हक्काची जाणीव करून दिली. यावेळी ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच सौ. अंजलीताई राजन देशपांडे यांनी उपस्थित महिलांना अथर्वशीर्ष पुस्तक व गुलाबपुष्प देऊन महिलांचा सन्मान केला. तसेच पतीला यकृत दान केलेल्या महिला सौ. सुप्रियाताई बळवंतराव देशपांडे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. जागतिक महिला दिनानिमित्त नांदेड, मुदखेड, मोहनावती महिला मंडळ मुखेड व बाऱ्हाळीसह अनेक ठिकाणच्या महिलांना निमंत्रित करून महिलांचा सस्नेह मेळावा घेण्यात आल्यामुळे परिसरातून अभिनंदन होत आहे. सस्नेह भोजनानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी सौ. अर्चना देशपांडे सौ. स्नेहलता जोशी, सौ. संध्याताई मुंडकर - गाडवे, सौ. प्रमोदिनी गबाळे - कोटलवार, सौ. प्रज्ञा लव्हेकर, सौ. मीनाताई जोशी, सौ. पद्मिनीताई उमाटे, सौ. पुजाताई उमाटे यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. डॉ. दिपाली रॅपनवाड यांनी केले तर आभार सौ. संध्याताई मुंडकर - गाडवे यांनी मानले.

# बाळासाहेबांचे विचार रूजवण्यासाठी शेवटपर्यंत लढा देऊ :ब्रिजलाल उगवे



**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. ०९ मार्च**

हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे विचार तळागाळातील शेवटच्याघटकापर्यंतपोहोचवण्यासाठी लढवय्ये शिवसैनिक म्हणून आम्ही कुठलीही अपेक्षा न करता शेवटपर्यंत लढा देणार असल्याची प्रतिक्रिया उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना कामगार आघाडीचे जिल्हाप्रमुख ब्रिजलाल उगवे यांनी दिली.

राजकीय क्षेत्रात सध्या घडीला पक्षप्रवेशाचे भूत सर्वच पक्षातील नेते व कार्यकर्ते यांच्या डोक्यावर थैमान घालत असून प्रत्येक जण दुसऱ्या पक्षांच्या उंबरठ्यावर उभा आहे .पण आपण यापूर्वी काय होतो आता कुठे राहावे याचा विसर सोडुन आपनास काहीतरी मिळेल या अपेक्षेने पक्ष प्रवेश होत असल्याची प्रतिक्रिया शिवसेनेचे कामगार जिल्हा प्रमुख ब्रिजलाल उगवे यांनी आपले मत मांडले. आम्ही हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे लढवय्ये शिवसैनिक हिमतीने पक्ष वाढीसाठी लढा देऊ असेही मत मांडले. यावेळी शिवसेनेचे शहर संघटक प्रमोद मैड यांनी पक्ष प्रवेश करण्याबाबत बोलताना हे सर्वच खेळ रात्रीच चालत आहेत. दिवसा हे खेळ मांडण्यासाठी जिगर लागतं असे मत मांडले. यावेळी पुढे बोलताना ब्रिजलाल म्हणाले की सिडको -हडको दक्षिण मतदार संघात बाळासाहेबांचे विचार रुजवण्यासाठी व उद्धव बाळासाहेब यांची शिवसेना पक्ष वाढीसाठी शहर प्रमुख जितू सिंग टाक यांच्या नेतृत्वाखाली माजी शहर प्रमुख निवृत्ती जिंकलवाड, शहर संघटक प्रमोद मैड व सर्व शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते व शिवसैनिक मोठ्या उमेदीने पक्षाचेकार्य शेवटच्या घटकापर्यंत बाळासाहेबांचे विचार पोहोचवण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगीतले.

# संसारात शेवट असतो मात्र प्ररमात्मात शेवट कधीच नसतो: हभप.एकनाथ महाराज उमरजकर

**तभा वृत्तसेवा**
**कंधार,दि. ०९ मार्च**



माणवी जीवनात संतांच्या संगतीत प्रमात्मा सुख मिळते.दुसरीकडे मिळत नाही.त्यामुळे संतांचा सहवास आवश्यक आहे.जो संतांच्या सहवासात येईल, त्यास सुख प्राप्त होते.संतांची भक्ती केल्यामुळे मानवी जीवनातील दुःख नाहीसे होते. म्हणुन संतांच्या सहवासात राहून मानवाने भक्तीचा मार्ग स्विकारला पाहिजे संसारात शेवट असतो मात्र प्रमात्मात शेवट कधी नसतो तो अजीवन असतो असे प्रतिपादन उमरज (धाकटे पंढरपूर) संस्थानचे मठाधिपती ह.भ.प.एकनाथ महाराज उमरजकर यांनी श्री क्षेत्र उमरज येथे काल्याच्या किर्तनात केले.

श्री क्षेत्र उमरज क्षेत्र येथे दिंनाक २७ मार्च पासुन चालु आसलेल्या १०८ कुंडी यज्ञ .विठ्ठल रुकमीणी ,नामदेव महाराज मंदीर कलशारोहण कार्यक्रमा निमित्त चालु भागवत आसलेली भागवतकथा व अखंड हरीनाम सप्ताह ची सांगता दि ६ मार्च रोजी मठाधीपती एकनाथ महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने झाली .पुढे भक्तांना संबोधताना मठाधीपती असे म्हणाले , परमात्मा निर्गुण, निराकार आहे.परमात्मा सर्वांना आनंद देतो.परमात्म्याला पाहिल्यानंतर अंतःकरण शुद्ध होते.आपल्या सुखासाठी परमात्म्याच्या चरणी नतमस्तक व्हा,यामुळे आपणास समाधान व उर्जा मिळते.परमार्थात शेवट कधीच नसतो ,मात्र संसारात शेवट असतो.परमार्थात पूर्णता आहे परंतु संसारात पूर्णता नसते.संसार हा दुःख रुपी आहे.संसारात कोणीही समाधानी नाही.संसारातून दुःखाची निवृती आवश्यक आहे.म्हणून संतांची भक्ती करा जीवनातील दुःख नाहीशी होतील असे लाखों भाविकांना किर्तनाच्या माध्यमातून सांगितले.

यावेळी लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, माजी आ. रोहिदास चव्हाण, माजी आमदार अविनाश घाटे, माजी आ. मोहनअण्णा हंबर्डे, पंढरपूरचे हरिदास महाराज, बालाजी खतगावकर, संभाजी केंद्रे,गंगाधर राठोड, ड.मुक्तेश्वरराव धोंडगे, प्रविण पाटील चिखलीकर, प्रा.डॉ. पुरुषोत्तम धोंडगे, माधवराव पावडे, मदन महाराज, बाबुराव केंद्रे,उत्तम चव्हाण, सत्यनारायण मानसपुरे, भगवान राठोड, दत्ता वाले, मनोहर पाटील भोसीकर, स्वप्निल लुंगारे, शेख शेरुभाई, निलेश गौर, माधवराव पेठकर, प्रा.डॉ. पांडुरंग पांचाळ आर्दीसह अनेकांची उपस्थिती होती.

यावेळी पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.याप्रसंगी लाखो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उमरज ग्रामस्थांसह पंचक्रोशीतील स्वंयेसेवकांनी घेतले परिश्रम घेतले .



नांदेड- शहरातील महाविर चौक येथील खड्डा अनोख्या पद्धतीने मनपाने बुजवला असुन यापेक्षा खड्डाच बरा अशी म्हणण्याची वेळ वाहनधारकांवर आली आहे.

# तामसा येथे सकल मराठा समाजाचे जोडे मारो आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**तामसा,दि. ०९ मार्च**



बीड जिल्ह्यातील मत्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करण्यात आली असून हत्येचा निषेध करीत तामसा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सकल मराठा समाजाच्या वतीने गुरुवारी वाल्मिक कराड, धंनजय मुंडे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या फोटोला जोडे मारून जोडे मारो आंदोलन केले. आंदोलनकर्त्यानी संतोष देशमुख हत्या प्रकारणातील आरोपीला भर चौकात फाशी देण्याची मागणी करणाऱ्या घोषणा देत आंदोलन केले.

यावेळी सरपंच गोविंद पवार, गोपाल पवार, दिलीप कोथळकर, ज्ञानेश्वर कोडगिरावर, दयानंद चव्हाण, रुपेश पाटील, आंनता पवार, पंढरी पवार, अमोल वानखेडे, बालाजी कोल्हे, नंदू पवार, मारोती पवार, पप्पू कदम, अमोल कऱ्हाळे, छावाचे दिनेश पवारसह मोठ्या संख्येने सकल मराठा समाजबांधव आंदोलनात सहभागी झाले होते.

# अनुसूचित जमातींसाठी आरक्षित असलेले वसराम तांडा येथील सरपंच पद आता खुले

**तभा वृत्तसेवा**
**माहुर,दि. ०९ मार्च**

पंचायत (अनुसूचित क्षेत्रांचा विस्तार) कायदा, १९९६ पेसा हा कायदा, अनुसूचित क्षेत्रात राहणाऱ्या आदिवासी समुदायांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी लागू करण्यात आला आहे. हा कायदा, आदिवासींच्या स्वशासनासाठी पारंपारिक ग्रामसभांद्वारे स्वशासन सुनिश्चित करतो.तर पेसा क्षेत्र म्हणजे अनुसूचित क्षेत्रांमध्ये येणारे ते ठिकाण, जिथे पंचायतींचा विस्तार कायदा लागू होतो.सदरील पेसा क्षेत्रा अंतर्गत माहूर तालुक्यातील वसराम तांडा या गावचा समावेश करण्यात आला आहे.

आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे बंजारा बहुल असलेल्या या गावात अनुसूचित जमातीची लोकसंख्या निरंक अर्थात शुन्य आहे.त्यामुळे अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेले सरपंच पद व इतर काही सदस्य पद हे रिक्त राहत असे.महत्वाचे म्हणजे ग्रामपंचायतीला सरपंच नसल्याने अनेक पंचवार्षिक कालावधीपासून गावचे कारभारी प्रशासक होते. परिणामी, गावचा सर्वांगीण विकास खुंटला. सुज्ञ ग्रामस्थांनी निवडणुकीवर सामुहिक बहिष्कार टाकला.परंतू,पेसा क्षेत्रातील अनुसूचित जमाती राखीव आरक्षण शासनाकडून हटवण्यात आले नाही..



मात्र आता भाजपाचे नांदेड जिल्हा उपाध्यक्ष अँड.अविनाश राठोड यांच्या पाठपुराव्याला व ग्रामस्थांच्या मागणीला अखेर यश आले असून, अँड. राठोड यांच्या मागणीपत्राची दखल घेऊन जिल्हाधिकारी नांदेड यांनी वसराम तांडा येथील पेसा कायद्यानुसार पेसा क्षेत्र अंतर्गत अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेले सरपंच पद व इतर काही सदस्यांचे पदांचे आरक्षण उठविले आहे. त्यामुळे तेथील ग्रामपंचायत निवडणुकीचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

९ मार्च १९९० च्या शासन निर्णयाने महाराष्ट्रातील अनेक तालुके आणि गाव पेसा क्षेत्रात समाविष्ट करण्यासाठी यादी प्रसिद्ध करण्यात आले होती त्यात माहूर तालुक्यातील वसराम तांडा गाव समाविष्ट करण्यात आले होते. पेसा क्षेत्रात येत असल्यामुळे ग्रामपंचायतिमधील एकूण सदस्यांपैकी ५० टक्के सदस्य आणि सरपंच पद हे अनुसूचित जमाती (एस. टी.) प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आले होते. परंतु १९८१, २००१ आणि २०११ च्या जनगणणेनुसार वसराम तांड्यातील अनुसूचित जमातीची लोकसंख्या ही शून्य असल्यामुळे ग्रामपंचायतीतील सरपंच पद आणि इतर अनुसूचित जमाती राखीव जागा रिक्त ठेवण्यात येत असत. परिणामी ग्रामपंचायतच स्थापन होत नसल्याने अनेक वर्षांपासून गावाचा कारभार हा प्रशासकामार्फत चालत असल्याने गावचा विकास खुंटला. या गोष्टीची जाणीव झाल्यावर भारतीय जनता पक्षाचे नांदेड जिल्हा उपाध्यक्ष अँड. अविनाश राठोड यांनी या संदर्भात निवडणुक आयोगाला पत्राद्वारे अवगत करून पेसा कायदान्वये पेसा क्षेत्रात असलेले वसराम तांडा येथील अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेले सरपंच व इतर सदस्य पद खुले करण्याची मागणी केली होती.या मागणीची दखल घेत जिल्हाधिकारी, नांदेड यांनी २८ जानेवारी २०२५ रोजी पत्र देऊन तेथील पेसा कायदा नुसार सुरू असलेले आरक्षण आता यापुढे रद्द केले आहे. यामुळे तेथील निवडणुकीचा मार्ग देखील आता मोकळा झाला आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## जननायक संघटनेची नुतन जिल्हा कार्यकारिणी जाहीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ मार्च -**
जननायक संघटना ही सामाजिक कार्याच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या प्रश्नाला न्याय देण्याचे काम गेल्या अनेक वर्षापासून करीत आहेत. या संघटनेची नूतन कार्यकारिणी जननायक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्या सुचनेनुसार नुकतीच जाहीर करण्यात आली असून जननायक संघटनेच्या जिल्हाध्यपदी सूर्यकांतराव शेळके यांची तर जिल्हा कार्याध्यक्षपदी बी.टी.कदम यांची वर्णी लागलेली आहे.

जिल्हा उपाध्यक्षपदी प्रतापराव शिंदे, रविंद्र कांबळे, माधवराव पाटील गोंद्रीकर यांची निवड करण्यात आलेली आहे. महिला आघाडीच्या शहर जिल्हाध्यक्षपदी वनितताई काळे, शहर उपाध्यक्षपदी ज्योतीताई भोकरे, शहर सरचिटणीसपदी सहारा शेख, तर महिला आघाडीच्या ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी अरुणाताई कांदे यांची निवड करण्यात आलेली आहे. तसेच युवा आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी मारुती सूर्यवंशी, युवा लातूर शहराध्यक्षपदी राजेश पवार व युवा कार्याध्यक्षपदी सचिन जाधव यांनी निवड करण्यात आलेली आहे. त्याच्या या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

लातूर तालुकाध्यक्षपदी निळकंठराव पवार यांची निवड जननायक संघटनेची लातूर तालुका कार्यकारिणीही जाहीर करण्यात आली असून जननायक संघटनेच्या लातूर तालुकाध्यक्षपदी निळकंठराव पवार यांची निवड करण्यात आलेली आहे तर लातूर तालुका कार्याध्यक्ष पदी राजाभाऊ मुळे यांची निवड करण्यात आलेली आहे. तर रेणापूर तालुकाध्यक्षपदी अप्पासाहेब पाटील यांची एकमताने निवड करण्यात आलेली आहे व सदस्यामध्ये अनेक पदाधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आलेला आहे.



### संक्षिप्त वृत्त...

## न्या. वराळे यांचे लातूर जिल्हा वकील मंडळाच्या वतीने स्वागत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ मार्च -**
सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री प्रसन्न वराळे लातूर दौऱ्यावर आले असता लातूर जिल्हा वकील मंडळाच्या वतीने शाल , पुष्पहार घालून संविधान प्रत देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी लातूर जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष ॲड. शरद इंगळे,



उपाध्यक्ष ॲड. मनीषा दिवे पाटील, ॲड. आनंद खांडेकर, सचिव ॲड. प्रदिपसिंह गंगणे, ग्रंथालय सचिव ॲड. विजय साबळे, सहसचिव ॲड. तृप्ती इटकरी, ॲड. नरेश कुलकर्णी, कोषाध्यक्ष ॲड. रोहित सोमवंशी, ज्येष्ठ विधीज्ञ बळवंत जाधव, ॲड. आशिष बाजपेयी, ॲड. संजय पांडे, ॲड. वैभव बिराजदार, ॲड. नितीन राठोड, ॲड. ऋषिकेश देशपांडे, ॲड. ओम पेन्सलवार आदीची उपस्थिती होती

## सांस्कृतिक कार्य विभागाचा कृषी संस्कृती महोत्सव यंदा लातूरमध्ये

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ मार्च -**
लातूर शहर हे महाराष्ट्रात सांस्कृतिक शहर म्हणून पुढं येत आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने दिनांक १२ ते १४ मार्च, २०२५ दरम्यान दयानंद सभागृह बार्शी रोड, लातूर येथे सायंकाळी ५:०० ते ८:०० या वेळेत सलग तीन दिवस कृषी संस्कृती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

यात कृषी अर्थात शेती व शेतकऱ्यांच्या जीवणाशी ग्रामीण सांस्कृतिशी निगडीत गीते,नृत्य कविता यांचे सादरीकरण होणार आहे.या महोत्सवामध्ये महाराष्ट्रातील नामवंत प्रसिध्द गायक अभिजीत कोसंबी, प्रज्ञा अन्नम, प्रणाली कदम, प्रसेनजीत कोसंबी, श्रावणी महाजन, चैतन्य कुलकर्णी, विनल देशमुख, कुणाल बराळे, संज्योती जगदाळे, अभिषेक नलवडे, अक्षय घाणेकर,आसावरी बोधणकर यांच्या गायनाचा कार्यक्रम होणार असुन लातूर येथील रंगभूमी कलामंचच्या कलाकरांचा नृत्य अविष्कार लातूरकरांना यावेळी पाहता येणार आहे.तर स्थानिक कवीच्या कवीतांचे सादरीकरण या प्रसंगी होणार आहे. कृषी महोत्सवाचे आयोजन करण्याची संकल्पना सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांची आहे तर सांस्कृतिक विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.या महोत्सवाला विनामुल्य प्रवेश असणार असून रसिकांनी मोठ्या संख्येने कृषी संस्कृती महोत्सवाला उपस्थित राहाण्याचे आवाहन संचालक सांस्कृतिक कार्य संचालनालय विभीशन चवरे, समन्वयक बी. एम. घोलप, निमंत्रण शैलेश गोजमगुंडे, अनिल पुरी,मयुर बनसोडे यांनी केले आहे.

## ठेकेदाराकडून बेदम मारहाण; मजुराचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ मार्च -**
ठेकेदाराकडे केलेल्या कामाचे पैसे मागितल्याचा राग मनात धरून ठेकेदार व त्याच्या सहकाऱ्यांनी मजुरास बेदम मारहाण केल्याने त्यात मजुराचा मृत्यू झाला असून ठेकेदारावर खुनाचा गुन्हा दाखल केल्याशिवाय प्रेत ताब्यात घेणार नाही, अशी भूमिका नातेवाईकांनी घेतल्याने विवेकानंद चौक पोलीस ठाणे परिसरात शनिवारी सायंकाळी उशिरापर्यंत तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.उदगीर येथील तानाजी बाबूराव सोनकांबळे (वय ४०) हा उदगीरचा ठेकेदार मेहराज पटेल याच्याकडे काम करत होता. तानाजी याने पटेल याच्याकडे मजुरीचे पैसे मागितले असता, मेहराज पटेल व त्याच्या तीन सहकाऱ्यांनी लातूरच्या गरूड चौकापासून तानाजीला बेदम मारहाण केल्याची घटना बुधवारी घडली. उपचारासाठी त्याला येथील सर्वोपचार रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान शुक्रवारी त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी गुन्हा नोंद झाला आहे.

## ‘माविम’च्या नवतेजस्विनी महोत्सवाचे थाटात उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ मार्च -**
जागतिक महिला दिन आणि महिला आर्थिक विकास महामंडळाच्या (माविम) ५० व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित करण्यात आलेल्या नवतेजस्विनी महोत्सवाचे पोलीस अधीक्षक सोमय मुंडे आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या अधिकाऱ्यांनी बचतगटांच्या दालनांमध्ये जावून विविध वस्तूंची खरेदी करत या महोत्सवाचे उद्घाटन केले.

उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी जावेद शेख, नाबार्डचे जिल्हा विकास प्रबंधक प्रमोद पाटील, महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वय अधिकारी एम. एस. पटेल, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी चिंतामणी कुटे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

महिलांना सक्षम करण्यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळाने गेल्या ५० वर्षात भरीव कामगिरी केली आहे. बचत गटांच्या चळवळ महिला सक्षमीकरणासाठी उपयुक्त ठरली असून यामाध्यमातून अनेक महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनल्या आहेत. या महिलांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपल्या बचत गटांची उत्पादने जिल्ह्याबाहेरील बाजारपेठेत पाठविण्यासाठी प्रयत्न करावेत. माविमच्या माध्यमातून याबाबत महिलांना प्रशिक्षण दिले जावे, असे उपजिल्हाधिकारी श्रीमती गाठाळ यावेळी म्हणाल्या.

प्रारंभी माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी एम. एस. पटेल यांनी प्रास्ताविकात नवतेजस्विनी महोत्सव आयोजनाचा हेतू विशद केला. तसेच माविमच्या गेल्या ५० वर्षातील वाटचालीची संक्षिप्त माहिती दिली. सूत्रसंचालन उद्धव फड यांनी केले, दीपक टेकाळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी



परमेश्वर इंगळे, हितन कुऱ्हे, किरण तांदळे, अनंत हेरकर, सुजाता तोंडारे, मंगल वाघचौरे, उषा डूमने, सविता पाटील, विजयसिंग इंगळे, मंगेश थोरात, विजय लोंढे, प्रवीण जगताप, वर्षा राउत, दीपक चक्रे, जगदीश केनालवाड व सर्व सहयोगिनी यांनी परिश्रम घेतले.

तीन दिवसीय प्रदर्शनात विविध वस्तूंचे स्टॉल ८ ते १० मार्च या कालावधीत होत असलेल्या नवतेजस्विनी महोत्सवातील प्रदर्शनामध्ये बचत गटातील महिलांनी तयार केलेले घरगुती मसाले, शुद्ध हळद पावडर, विविध प्रकारचे पापड, विविध प्रकारचे लोणचे, शेवया, सांडगे, कुरुडी, लाल व काळे तिखट, हडोळाती चे प्रसिद्ध काळे तिखट, घाण्याचे करडी व सूर्यफूल तेल आदी पदार्थ मिळणार आहेत.

## महानगरपालिकेत महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ मार्च -**
जागतिक महिला दिनानिमित्त आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या मार्गदर्शनात लातूर महानगरपालिकेत महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

मनपा उपायुक्त डॉ.पंजाब खानसोळे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव यांची उपस्थिती होती.उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे, कांचन तावडे, रावसाहेब कोलगणे, सहाय्यक आयुक्त निर्मला माने यांचीही यावेळी उपस्थिती होती. यावेळी प्रमुख व्याख्यात्या म्हणून राजर्षी शाहू महाविद्यालयातील डॉ.स्वाती फेरे यांनी मार्गदर्शन केले. महिलांचे आरोग्य या विषयावर त्यांनी विचार मांडले.या यावेळी डॉ. फेरे यांच्या हस्ते उपस्थित महिला कर्मचाऱ्यांचा रोपटे व पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास नंदकिशोर तापडे, खदीर शेख,मुख्य लेखा परीक्षक कांचन तावडे, पर्यावरण अधिकारी सन्मती मेस्त्री,पवन सुरवसे आदिंची उपस्थिती होती.

## सिद्धेश्वर यात्रेतील पशुप्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ मार्च -**
ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या यात्रा महोत्सवानिमित्त आयोजित पशुप्रदर्शनास उस्फुर्त प्रतिसाद मिळाला.या प्रदर्शनातील विजेत्या पशु पालकांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, बोधनकर डी. यु. श्रीधर शिंदे, नानासाहेब सोनवणे सर्व पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद तसेच देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर, सुरेश गोजमगुंडे,व्यंकटेश हालिंगे विशाल झांबरे, राजेंद्र



पतंगे,माधव बन यांच्या प्रमुख उपस्थितीत पशु प्रदर्शनाचे उद्घाटन संपन्न झाले.

या प्रदर्शनात एक वर्षावरील देवणी नर वळू गटामधून औसा तालुक्यातील हासेगाववाडी येथील सिद्राम सरवदे यांच्या वळूने प्रथम क्रमांक पटकावला.लाल कंधारी मादी गट (गाभण गाय )या गटातून अहमदपूर तालुक्यातील शेनकुड येथील देविदास नरवटे यांच्या गाईने प्रथम क्रमांक पटकावला.

विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. देवणी नर वळू गटासाठी लातूर बाजार समितीच्या वतीने चांदीचा रथ, प्रमाणपत्र,शाल व फेटा देऊन सन्मान करण्यात आला. लाल कंधारी मादी गटातील विजेत्या पशुपालकास देवस्थानच्या वतीने रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देण्यात आले. यावेळी बाजार समितीचे सचिव सतिश भोसले, बाळासाहेब पाटील, व्यंकटेश हालिंगे, विशाल झांबरे, ओम गोपे, महादेव बन, शिवानंद कातले यांची प्रमुख उपस्थिती होती.



## आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते प्राचार्य डी. एन. केंद्रे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ मार्च -**
येथील राजमाता जिजामाता बी. एड. कॉलेजला ‘नॅक’चा ‘ब’ दर्जा मिळाल्याबद्दल संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये आणि सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांचा छत्रपती संभाजीनगर शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे यांनी सत्कार केला.

महाराष्ट्र शिक्षण मंडळ, लातूर संचलित राजमाता जिजामाता बी. एड. कॉलेजची गेल्या १७ वर्षांपूर्वी स्थापना झाली आहे. तेव्हापासून या महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात आपला एक आगळा वेगळा ठसा उमटविला आहे. महाविद्यालयाच्यावतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात, संस्कारक्षम व दर्जेदार शिक्षण दिले जाते. याची दखल घेत या महाविद्यालयाला नुकताच ‘नॅक’चा ‘ब’ दर्जा मिळाला आहे. याबद्दल छत्रपती संभाजीनगर शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे यांनी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये आणि सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी प्राचार्य शुभांगी काळे आदी उपस्थित होते.

## महापूर येथील सर्वरोग तपासणी व उपचार शिबिराला महिलांचा उस्फुर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ मार्च -**
जागतिक महिला दिनानिमित्त विलासराव देशमुख फाऊंडेशनच्या पुढाकारातून व विलासराव देशमुख वैद्यकीय शासकीय महाविद्यालय यांच्या सहकार्यातून लातूर तालुक्यातील महापूर येथे शनिवार दि. ८ मार्च रोजी आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना अंतर्गत सर्वरोग तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या सर्वरोग तपासणी व उपचार शिबिराला महिलांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. महापूर येथे ट्वेंटीवन ग्रीच्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विलासराव देशमुख फाऊंडेशनच्या पुढाकारातून सर्वरोग तपासणी व उपचार शिबिराचे



आयोजन करण्यात आले.

या शिबिरात महिला डॉक्टरांद्वारे महिलांची स्तन विकाराची आयब्रेस्ट स्कॅन मशीनद्वारे मोफत तपासणी करण्यात आली तसेच १८२ महिलांची आरोग्य तपासणी करून त्यांना औषध गोळ्यांचे वाटप करून महिलांना त्यांच्या आरोग्याबद्दल जागरूक करण्यात आले आणि त्यांना मोफत तपासणी आणि उपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. मेघराज चावडा (अध्यक्ष आणि वैद्यकीय समन्वयक) संगीता मोळवणे, डॉ. पूनम राठोड (वैद्यकीय अधिकारी), सई गोरे (अध्यक्ष, दिव्यतेज प्रतिष्ठान), हेमंत लोहारे , डॉ.अनंत सूर्यवंशी, गावचे सरपंच माने, मु.अ. बी.के. भोसले, डी.आर. पवार, संदीप माने, आरोग्य उपकेंद्र महापूरचे कर्मचारी, गजानन बोयणे आणि अन्य कार्यकर्ते, अंगणवाडी मदतनीस, उमेद बचत गटाचे सदस्य यांनी प्रयत्न केले.

## उपायुक्त खानसोळे यांची मनपा शाळेस अचानक भेट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ मार्च -**
लातूर शहर महानगरपालिकेचे उपायुक्त डॉ.पंजाबराव खानसोळे यांनी शनिवारी (दि. ८)महात्मा बसवेश्वर विद्यालय, मनपा शाळा क्रमांक ०६, बसवेश्वर चौक येथे अचानक भेट देऊन शाळेची पाहणी केली. शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठी आवश्यक त्या सुविधा व प्रयत्नांचा आढावा घेण्यासह शाळेच्या अडचणी जाणून घेण्यासाठी त्यांनी ही भेट दिली.

भेटीदरम्यान ४७ विद्यार्थी पटसंख्या असलेल्या या शाळेमध्ये मुख्याध्यापक महेश तोडकर आणि सहशिक्षक सतिश चव्हाण हे विद्यार्थ्यांना शिकवताना आढळले. विशेष म्हणजे शाळेतील संपूर्ण अध्यापन प्रक्रिया डिजिटल आहे. विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षणीय असून शालेय परिसर स्वच्छ व सुसज्ज असल्याचे पाहून उपायुक्त खानसोळे यांनी समाधान व्यक्त केले.



शाळेतील भौतिक सुविधा अधिक कशा वाढवता येतील याबाबत त्यांनी शिक्षकांसोबत चर्चा केली. विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारासंदर्भात माहिती विचारली. दररोज दिल्या जाणाऱ्या मेनूबाबत चौकशी करून शालेय पोषण आहार अधिक चविष्ट व पौष्टिक कसा देता येईल ? याबाबत मार्गदर्शन केले.

उपायुक्त खानसोळे यांनी विद्यार्थ्यांसोबत थेट संवाद साधला. त्यांनी मराठीत वाक्य बोलून दाखवली असता विद्यार्थ्यांनी ती तत्परतेने इंग्रजीत अनुवादित करून सादर केली. खासगी इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळांनाही लाजवेल अशी इंग्रजी भाषेची प्रगती या शाळेत पाहून समाधान वाटते, असे मत उपायुक्तांनी व्यक्त केले.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे उपायुक्त डॉ.पंजाबराव खानसोळे यांच्या प्रयत्नांमुळे संपूर्ण शाळेमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे त्यांनी पुरवलेल्या डिजिटल संचाचा या शाळेत योग्य व परिणामकारक वापर होत असल्याचेही निदर्शनास आले.

डॉ.पंजाबराव खानसोळे यांनी लातूर शहर महानगरपालिका उपायुक्त पदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून महानगरपालिकेच्या शाळांच्या शैक्षणिक गुणवत्ता विकासावर विशेष भर दिला आहे. त्यांच्या प्रयत्नांचे फलितही दिसू लागले असून महानगरपालिका शाळांमध्ये वैशिष्ट्यपूर्ण गुणात्मक बदल होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

कार्यक्रमादरम्यान शाळा क्रमांक सहाच्या विद्यार्थ्यांनी पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय सांस्कृतिक कार्यक्रम स्पर्धेत मिळवलेले पुरस्कार उपायुक्त पंजाबराव खानसोळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

उपायुक्तांनी सर्व शिक्षकांना शाळेची अधिकाधिक गुणवत्तापूर्ण सुधारणा कशी साध्य करता येईल याबाबत मार्गदर्शन केले. शाळा विकासातील अडचणी दूर करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील राहील,असे आश्वासनही त्यांनी दिले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करण्याचे आवाहन करून त्यांनी उपस्थित शिक्षकाना प्रोत्साहित केले.

## राजमाता जिजामाता संकुलात महिलादिन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ मार्च -**
येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात शनिवारी जागतिक महिलादिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये यांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा जायेभाये यांनी पर्यवेक्षिका सुनीता जवळे, प्रा. वैशाली पाटील, प्रा. अनिता किसवे, प्रा. भारती झाडके, शिक्षिका कल्पना नवगिरे आदींसह विद्यार्थिनींना पुष्प देऊन महिलादिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, अश्विनी केंद्रे, वैशाली केंद्रे, राजेंद्र जायेभाये, राजीव मुंढे, विष्णू कराड, शिवकांत वाडीकर, परमेश्वर गित्ते यांच्यासह अन्य प्राध्यापक आदिंची उपस्थिती होती.

तरुण भारत
छोटे उस्ताद

## तुम्हाला माहिती आहे का?

- भारतात मुंबई येथे पहिला महिला दिवस ८ मार्च १९४३ रोजी साजरा करण्यात आला. ८ मार्च १९७१ला पुण्यात एक मोठा मोर्चा काढण्यात आला होता. पुढे १९७५ हे वर्ष युनोने जागतिक महिला वर्ष म्हणून जाहीर केले. बदलत्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीनुसार काही प्रश्नांचे स्वरूप बदलत गेले तशा स्त्री संघटनांच्या मागण्याही बदलत गेल्या. यंदा जागतिक महिला दिनाची संकल्पना एक्सलरेट ॲक्शन म्हणजेच वेगवान कृती अशी आहे.

## अशी पाखरे येती

**निशिकांत मायी** / ९८८११५२४३९

# हसणारं कबुतर



वर्ष १७६० मध्ये प्राणिशास्त्रज्ञ माथुरिन जॅक ब्रिसन यांनी हसणाऱ्या कबुतराचे वर्णन आपल्या संग्रहात समाविष्ट केल्याचे वाचून साहजिक या पक्ष्याविषयीची उत्सुकता वाढली. पक्ष्यांच्या ज्या २४० प्रजातींचे वर्णन पूर्वी ब्रिसनने केले होते, त्यात एक हसणारा कबूतरही होता ज्याला त्याने कोलंबा वंशातील इतर सर्व कबुतरांसोबत गणले होते. हसणारा कबूतर (लाफिंग डव्ह) हे एक लहानसे कबुतर असून, सहाराच्या दक्षिणेस आफ्रिकेतील उष्ण कटिबंधात त्याचे वास्तव्य आहे. मध्य पूर्व आणि भारताच्या पूर्वेस दक्षिण आशिया, पश्चिम ऑस्ट्रेलियाच्या स्थानिक भागातही तो आढळतो. शरीरयष्टीने सडपातळ असलेल्या या हसणारा कबुतराची शेपटी लांब असून पाठ, पंख आणि शेपटी लाल-तपकिरी रंगाची आहे. तर, पंखांमध्ये निळ्या-राखडी छटा आहेत.

लहान पण लांब शेपटी असलेले हे कबुतर कोरड्या अधिवासात आढळून येतात. अनेकदा या कबूतराच्या जोड्या जमिनीवर आपले खाद्य शोधताना दिसतात. हसणारा कबूतर या पक्ष्याची अनेक नावे पक्षिजगतात प्रचलित आहेत. त्यात प्रामुख्याने पाम कबूतर आणि सेनेगल कबूतर आदी नावांचा समावेश असून आशियामध्ये लहान तपकिरी कबूतर हे नावसुद्धा अनेकदा वापरले जात नोंद आहे. साधारणपणे २५ सेंमी लांबीचा हसणारा कबुतर ही एक सामान्य आणि व्यापक प्रजाती आहे. अतिशय चपळ असलेला हसणारा कबूतर खूप वर्षांपूर्वी अरबी समुद्रात जहाजांवर उतरल्याची नोंद आहे. जहाजांवर उतरणारे हे पक्षी नवीन प्रदेशात स्थलांतरित होण्यास प्रवृत्त होतात. सहसा जोडीने किंवा लहान गटांमध्ये विहार करतात. जमिनीवर पडलेल्या बिया, गवत, भाजीपाला तसेच लहान कीटकही ते फस्त करतात. मादी कबुतराचे एक वैशिष्ट्य म्हणजे नराभोवती घुटमळत ती इशाऱ्यानेच त्याला खाद्याची मागणी करते आणि नर ती पूर्ण करतो. त्यांचे घरटे विविध झाडांच्या डहाळ्यांपासून नर-मादी दोघेही मिळून तयार करतात. या घरट्यांमध्ये मादी एका दिवसाच्या अंतराने दोन अंडी घालते. पिल्ले १४ ते १६ दिवसांनी घरटे सोडून विहार करण्यास तयार होतात.

**पक्ष्यांच्या ज्या २४० प्रजातींचे वर्णन पूर्वी ब्रिसनने केले होते, त्यात एक हसणारा कबूतरही होता ज्याला त्याने कोलंबा वंशातील इतर सर्व कबुतरांसोबत गणले होते. हसणारा कबूतर (लाफिंग डव्ह) हे एक लहानसे कबुतर असून, सहाराच्या दक्षिणेस आफ्रिकेतील उष्ण कटिबंधात त्याचे वास्तव्य आहे.**

## Math puzzle

Choose appropriate option for following idiom/phrase.

1) Lion's share -
a-miserly b-greater share of the thing
c-very small item d- no share.

2) Heart and Soul -
a- honestly b- wearily
c- seriously and sincerely d- casually

3) Piece of cake -
a- hard b- very easy

मागील अंकातील म्हणी शोधाचे उत्तर —1. बळी तो कान पिळी 2. पळसाला पाने तीनच 3. गरज सरो वैद्य मरो 4. हात फिरे तेथे लक्ष्मी वसे 5. आधी पोटोबा मग विठोबा 6. जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे

## शब्द ओळखा

आजच्या शब्द ओळखा मध्ये अ पासून सुरु होणारे व र या अक्षरावर संपणारे काही शब्द चौकटीत लपलेले आहेत. संकेताच्या मदतीने ओळखू शकाल हे शब्द?

संकेत :–
1. इंद्रियांना न समजणारा
2. व्यवहाराविरुद्ध वर्तन, धर्माविरुद्ध वागणे
3. सेवक, अनुयायी
4. लाक्षणिक अर्थाने आळशी, एक सर्प प्रकार
5. सत्तेचे स्थान, हक्क, प्रभुत्व
6. नाकातून होणारा उच्चार ना त्याने टिंब
7. अवहेलना, अवज्ञा
8. उत्तराचा अभाव
9. हगवण
10. न आवरता येण्याजोगा

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | अ | | | र |
| २ | अ | | | र |
| ३ | अ | | | र |
| ४ | अ | | | र |
| ५ | अ | | | र |
| ६ | अ | | | र |
| ७ | अ | | | र |
| ८ | अ | | | र |
| ९ | अ | | | र |
| १० | अ | | | र |

## वंडर गर्ल चंदना साहू



**बालमित्रांनो,** माणूस निरंतर शिकत असतो. नवीन माहिती घेत असतानाच जुन्याची उजळणी देखील तितकीच आवश्यक असते. नाही तर पुढे पाठ आणि मागे सपाट, अशी अवस्था होऊ नये म्हणून आपण घेतलेले ज्ञान पक्के व्हावे यासाठी सराव आवश्यक असतो. ?

आजची आपली वंडर गर्ल चंदना ही नृत्याचा सराव लहानपणापासून करते आहे. आज प्रवेशिका पूर्ण ही परीक्षा ती कथ्थकमध्ये संगीता मॅडमकडे धडे घेते आहे.

सेंट उर्सुला गर्ल्स हायस्कूल येथे शिकणारी सातव्या वर्गातली आपली वंडर गर्ल चंदना ही सकाळी नऊ ते तीन यावेळी शाळेत मग, चार ते साडेपाच कथ्थक नृत्याचा सराव, पुढे आठ ते साडेनऊ पुन्हा क्लास असं रात्री साडेअकरा वाजेपर्यंत ती आपल्या सरावांमध्ये व्यस्त असते. चंदनाला नृत्याबरोबरच बॅडमिंटनचीदेखील आवड आहे. बॉलीवूड या नृत्य प्रकारात तिने राष्ट्?ीय स्तरावर प्राविण्य मिळवलं आहे.

**संजय पेंडसे**/९४२२४४३२९५

त्याचं श्रेय ती सुशांत मेश्राम यांना देते. नृत्य क्षेत्रातील कोरिओग्राफर गणेश आचार्य यांचे नृत्य निर्देशन तिला विशेष आवडतं तर शाळेतील संजना मॅडम यांचे इतिहास शिकवणं तिला खूप आवडतं. त्याचप्रमाणे, मुख्याध्यापिका शितल पीटर या नेहमीच प्रोत्साहन देतात. चंदना चौथ्या वर्षापासूनच नृत्यकलेमध्ये प्रशिक्षण घेते आहे.

तिची आईदेखील नृत्य प्रवीण आहे. नृत्य क्षेत्रामध्ये स्वतःला झोकून देऊन सराव करणाऱ्या वंडर गर्ल चंदनाला तरुण भारतचा छोटे उस्ताद शुभेच्छा देतो.



## माठाची गोष्ट

माठ बाई माठ, नदीचा काठ
नदीच्या काठची, चिकण माती

जाऊन बसली, कुंभारा हाती
कुंभार मामाने, दिला आकार

मातीचा माठ, झाला साकार
मातीच्या माठात, रिचवले पाणी

माठाने गायली, पाझर गाणी
पाझर गाण्यात, गोडवा फार

माठातले पाणी, झाले गार गार
गार गार पाणी, प्यायला या..!
मातीची महती, गायला या...!

**-भानुदास धोत्रे**
७९७२६२५०८६

## प्रश्नसंच - ४



तरुण भारतचा अभिनव उपक्रम

# ज्ञानांजली!

**संतश्रेष्ठ** गजानन महाराज यांच्या चरित्राविषयी सविस्तर जाणून घेण्यासाठी श्रीगजानन महाराज अध्ययन समूह, नागपूरच्या सहकार्याने तरुण भारतच्या वतीने, 'ज्ञानांजली' हा अभिनव उपक्रम सुरू आहे. श्री गजानन विजय या ग्रंथावर आधारीत दहा प्रश्न दर शनिवारी आकांक्षा पुरवणीत प्रसिद्ध केले जातील. अचूक उत्तर निवडण्यासाठी चार पर्यायही दिले जातील. ज्ञानांजलीतील सर्व १० प्रश्नांची अचूक उत्तरं देणाऱ्या भाग्यवंत भक्तांची नामावली पुढच्या आकांक्षामध्ये प्रकाशित करू. ही प्रश्नावली तुम्हाला गूगल फॉर्म स्वरूपातच सोडवायची आहे. प्रिंट किंवा हस्तलिखीत स्वरुपात दै.तरुण भारत कार्यालयाकडे ती पाठवू नये. आपली ज्ञानसेवा श्रींच्या चरणी रुजू करण्याची ही सुवर्णसंधी आहे. प्रत्येक शनिवारी गूगल फॉर्म मिळविण्यासाठी 'तरुण भारत नागपूर' या आमच्या व्हॉट्स ॲप चॅनेलला फॉलो करा. अधिक माहितीसाठी सुरेखा देशपांडे ९८२२४४४२४५ या क्रमांकावर संपर्क करा. जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...

१) **कविवरांची ध्येयमूर्ती कोण आहे ?**
अ) लक्ष्मी ब) शारदा क) दुर्गा ड) भवानी
२) **कुकाजी पाटीलाच्या सुनेचे नाव काय?**
अ) लक्ष्मीबाई ब) जानकीबाई क) भागाबाई ड) गंगाबाई
३) **गजानन महाराज व नरसिंगजी महाराज यांच्या भेटीला दासगणू महाराजांनी कशाची उपमा दिली आहे?**
अ) गोदा आणि भागीरथी ब) गंगा आणि यमुना क) गंगा आणि सरस्वती ड) कृष्णा आणि भीमा
४) **अकोल्याच्या सुकदेव पाटलाच्या आईचे नाव काय?**
अ) गुजाबाई ब) बनाबाई क) भागूबाई ड) पार्वतीबाई
५) **बाळकृष्ण रामदासी यांच्या पत्नीचे नाव काय?**
अ) सईबाई ब) सोयराबाई क) येसुबाई ड) पुतळाबाई
६) **सिंदखेडी कोणाचा जन्म झाला होता ?**
अ) येसुबाई ब) पुतळाबाई क) जिजाबाई ड) चंद्राबाई
७) **साळूबाई कोणत्या गावाची होती ?**
अ) वैजापूर ब) खामगाव क) जलंब ड) नांदुरा
८) **लिंगायत वाण्याच्या पत्नीचे नाव काय?**
अ) गंगाबाई ब) चंद्राबाई क) पुतळाबाई ड) जानकीबाई
९) **गजानन महाराजांना 'मी आपली धर्मकन्या' म्हणणारी स्त्री कोण?**
अ) चंदुमुकीन रंभोरू ब) बायजाबाई क) लक्ष्मणकांता ड) माळीण
१०) **कोण आपल्या पतीला घ्यावयास शेगावला आली होती ?**
अ) गंगाबाई ब) बायजा क) भागूबाई ड) अनसूया

### प्रश्नसंच क्र.३ चे भाग्यवान विजेते

भाग्यश्री शर्मा, स्नेहल अवचट, साक्षी फांजे, ओंकार मोटुगडे, अपर्णा जोशी, ज्योती रोजतकर, पुष्पा खेडेकर, रश्मी भालेराव, अतुल चोरघडे, स्वाती पंधे शर्वरी परब, विद्या मोडक, प्रसाद कावळे, स्वाती मुळे, अनघा वाचासुंदर, सुचिता खनगई, शेखर कोतवाल, मीना खेडेकर, अविनाश मेहरे, आरती देशपांडे, रविंद्र टोंगळे, लता जोशी, वसुधा कोरान्ने, आशा सप्रे, प्रभाकर खेडकर, सुवर्णा कुळकर्णी-जोशी, आशा पवार, माधुरी दीक्षित, नरहरी गोडसे, ज्योती रोजतकर, मेघल भार्गव, लीना जोशी, श्रीलेखा देवरस, रवींद्र धांदे, सुजाता कुलकर्णी, रंजना धांदे, मंजुषा साठे, विद्या मोटुगडे,राधिका देशमुख आणि शिवशक्ती साखरे

### मागच्या ज्ञानांजलीतील प्रश्नावलीची उत्तरे!

१) बाळाभाऊंना,२) परशुराम
३) जानकीराम, ४) योगी
५) गजानन महाराज, ६) हिवाळा
७) मूर्तिजापूर, ८) रमणकद्विप
९) दया असू द्यावी, १०) २१ वा

# तुम्हाला 'फोमो' झालाय का?



**डॉ. संगीता पाटील**/९५७९६७८२८६

कोरोना महामारीमुळे शाळा, कॉलेज किंवा जॉबला प्रत्यक्ष जाणे बंद झाले आणि सुरु झाले ऑनलाईनचे जग! डिजिटल स्क्रीन टाईम, झूम मीटिंग असे शब्द आपल्या रोजच्या जीवनाचा भाग झाले. या डिजिटल जगात, विद्यार्थी आपल्या गुरूंचे लेक्चर्स ऑनलाईन अटेंड करू लागले. सिनेतारकांपासून ते अंतराळातील माहिती ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध झाली. पण, प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात. त्याप्रमाणे, सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे, मुलांमध्ये चिडचिड, एकलकोंडेपणा वाढताना दिसतो आहे. आता ओटीटी प्लॅटफॉर्मवर सिरीज उपलब्ध झाल्यामुळे मुलं शिक्षणाकडे दुर्लक्ष करताहेत. अभ्यास करायची इच्छा होत नाही, इंटरेस्ट येत नाही, बोअर होतं अशी करणं देऊन टाळाटाळ करू लागलीत. सतत स्नॅपचॅटवर फोटो टाकलाच नाही मी, मी सुंदर दिसते आहे ना?, मला कोणी लाईक का केले नाही? असे प्रश्न पडायला लागलेत ज्यामुळे मुले 'फोमो' (फियर ऑफ मिसिंग आऊट) या आजाराने ग्रस्त होतायत. आपण कसे आहोत यापेक्षा आपला फोटो किती सुंदर करता येईल? याकडे लक्ष वाढले. मुलांमध्ये लहान वयात एन्झायटी व डिप्रेशन वाढले. मुलांचा स्क्रीन टाईम वाढल्यामुळे निद्रानाश, मूड स्विंग्ज, अभ्यासात लक्ष न लागणे, सतत भूक लागणे या समस्या समोर आल्या. मुलांच्या शारिरीक व मानसिक आरोग्यावर याचा तीव्र परिणाम होतो आहे. डिजिटल स्क्रीन टाईम व सोशल मीडियाचे फायदे व तोटे कळल्यानंतर आता प्रश्न पडतो की, पालकांनी मुलांना सोशल मीडिया वापरू द्यावे की नाही ? तर याचे उत्तर आहे, वापरू द्या. मुलं काय बघतायत, किती वेळ बघतायत याकडे पालकांचे लक्ष असणे आवश्यक आहे. पालकांनी आपल्या पाल्यासोबत बसून सोशल मीडियाचे फायदेतोटे समजावून घेतले तर मुलं या समस्यांपासून दूर राहू शकतील. सोशल मीडियावर जे दिसते ते तसे नसते. तुम्ही आपले प्रायव्हेट फोटो, व्हिडिओ जिथे शेअर करता ते ऑनलाईन प्लॅटफॉर्म जसे की इंस्टाग्राम, कधीही हॅक होऊ शकते. सध्या सायबर फ्रॉड, डिजिटल अरेस्ट, सायबर बुलिंग वाढले आहे. मुलांचे शोषण शोषण होत असल्यामुळे ती डिप्रेशनमध्ये जातात व बोलेनाशी होतात. पालक व पाल्यातील संवादाचा अभाव या आजारांना खत-पाणी तर घालत नाही आहे ना? हा विचार करण्याची वेळ आहे.

# बंटीची बंडखोरी

(भाग ४४)

**प्रीती वडनेरकर** /९८२३९९४७९२



'बंटी, काही म्हण हं पण, महाशिवरात्रीला भगवान शंकराचा आशिर्वाद घेतला, आणि आपले पेपर्स सोपे गेले,' यश म्हणाला.'आशिर्वाद घेतल्यामुळे पेपर्स सोपे गेले असं नाही तर, आपला वर्षभर चांगला अभ्यास झाला होता. टेस्ट सिरीज आणि इतर रिव्हीजनही भरपूर झाल्याने पेपर्स सोपे वाटले आपल्याला! अभ्यास न करता, नुसतं देवदर्शन घेतलं असतं तर अवघड गेले असते पेपर्स,' बंटीनं युक्तिवाद मांडला.'पण बारावी, दहावीच्या बोर्डाच्या परीक्षा फार रेंगाळतात. जाम बोअर होतं. धड मजाही करू शकत नाही, ना धड अभ्यासही करू शकत.' शिरीषनं तक्रारीच्या सुरात म्हटलं.

'शिरीष, बी पॉझिटिव्ह! अरे, परीक्षा कितीही रेंगाळू दे. आपण प्रिपेअर्ड असल्यामुळे इतर ॲक्टिव्हिटीजही करता येतात. दहा मिनिटं योग करण्यामुळे मनावर टेन्शन येत नाही. म्हणजे आपण सगळे, टेन्शन फ्री असतो की नाही?' बंटीनं विचारलं.'अगदी बरोबर! आपण श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी केली. महाशिवरात्रीला महादेवाच्या दर्शनाला जाऊन आलो. अजून काय पाहिजे, शिरीष?' स्वानंदनं विचारलं.

'खरं आहे तुम्ही म्हणताहात ते! माझं म्हणणं इतकंच होतं की, परीक्षा पाच-दहा दिवसात संपली की, जिवाला टोचणी लागत नाही. 'अजून परीक्षा संपायचीये' अशी,' शिरीषनं आपलं मत मांडलं.'दोस्तांनो, ऐका ऐका ऐका... महत्वाची सूचना! येत्या आठ तारखेला म्हणजेच आठ मार्चला जागतिक महिला दिन आहे. त्यानिमित्तानं आपल्याला काही करता येईल का?' यशनं साऱ्यांचचं लक्ष आपल्याकडे वेधलं.'महिला दिन? त्याचं आपल्याशी काय देणं घेणं?' युगनं विचारलं.

'आपल्या काही घेणं देणं नाही, हे खरंय! पण, आपल्या आया, ताया, आजी, आत्या, मावश्या यांच्याशी तरी आहे की नाही?' बंटीनं प्रतिप्रश्न केला.'महिला दिनानिमित्त आपण त्यांचा सत्कार केला, गेम्स घेतले, स्पर्धा घेतल्या तर?' यशनं सुचवलं.'त्या दिवशी, त्यांना घरकामातून सुट्टी द्यायला पाहिजे. म्हणजे सकाळी चहा करायचा आपण, पिण्याचं पाणी आपण भरायचं, स्वयंपाक, आपण आणि बाबांनी मिळून करायचा. वॉशिंग मशीन लावून कपडे आपणच वाळत टाकायचे. घरातल्या देवांची पूजा आपण करायची. सिंकमधे पडलेली भांडी घासायची,' बंटीला थांबवत यश म्हणाला.

'बापरे... केवढी कामं करायची आपण? त्यापेक्षा कामवाल्या बाईकडून किंवा गड्याकडून करून घेऊ या,' शिरीष म्हणाला. 'वा रे वा, सगळी कामं आपण करायची, बच्चमजी,' स्वानंदनं शिरीषचे कान पकडत म्हटलं. 'अर्थातच! आपली आई ही सारी कामं, दररोज आणि बिनबोभाट करत असते. त्याचं काय?' बंटी म्हणाला.'मान्य...आता महिला दिनानिमित्त काय करायचं, त्यासंबंधी बोलू या,' शिरीषनं दोन्ही हात वर करून, सरेंडर झाल्याचं दाखवलं. 'ओके...ठरवू या! महिला दिनाचं आणि सोसायटीतल्या समस्त स्त्रीवर्गाला सरप्राईज देऊ, यात नंदूनं आपलं तोंड उघडलं.

'उद्याचा पेपर संपल्यावर ठरवूयात. चालेल?' बंटीनं सभा संपवली. बीजगणिताचा पेपर अतिशय सोप्पा गेला सगळ्यांना! सेंट परसेंट मार्क्स मिळण्याची खात्री होती, प्रत्येकाला! 'बाबा SS आपण आपल्या सोसायटीत जागतिक महिला दिन साजरा करतोय. काही आयडिया असतील तर सांगा नं प्लीज! मात्र सगळं सिक्रेट! आईला कळू द्यायचं नाही! सरप्राईज...' बंटीनं, जेवणाच्या वेळी आईच्या नकळत बाबांचा सल्ला मागितला.'थांब...जेवण झाल्यावर विचार करून सांगतो,' बाबांनी हळूच सांगितलं.

'हे बघ बंटी, वेगवेगळ्या शर्यती घेता येतील. चमचा-लिंबू शर्यत, तीन पायांची शर्यत! डोळ्यांवर पट्टी बांधून हत्तीला शेपूट काढायची शर्यत! शिवाजी म्हणतोचा खेळ, संगीत खुर्ची, उखाण्यांची शर्यत, रांगोळी स्पर्धा, फराळाचे पदार्थ बनवणे, गाण्यांची स्पर्धा... असे घेऊन त्यातल्या विजेत्यांना बक्षिसं देता येतील. नारी समता मंचच्या गोडबोले मॅडमना अध्यक्ष म्हणून बोलावता येईल,' बाबांनी सांगितलं.

'हो फॅन्टॅस्टिक आयडिया बाबा! आता मी आमच्या ग्रुपच्या मिटिंगमध्ये हे जाहीर करतो आणि शिक्कामोर्तब करून घेतो. आणि बाबा, स्वयंपाक, घरकाम आपल्याला करायचंय त्यादिवशी...त्याचं काय?''हो करू यात नं! वरण, भात, भाजी, पोळ्या यांच्याऐवजी पोहे, सांजा, उपमा असं काहीतरी करू. त्याचा एवढा बाऊ नको करूस. ते एवढं महत्वाचं नाहीये. आईला आराम द्यायचा, हे महत्वाचं आहे,' बाबांनी सांगितलं. बंटी ग्रुप, दादा ग्रुप, बाबा ग्रुप सारे एकत्र येऊन खलबतं करू लागली. लेडीज ग्रुपला मात्र कळतच नव्हतं. पुरूष लोकांची काय कट कारस्थानं चालली आहेत?

सर्वांनी फंड्स जमा केले. आठ तारीख उजाडली. बंटी ग्रुप भल्या पहाटे उठला.

बंटी ग्रुपला आठ तारखेला कोणताच पेपर नव्हता. 'इन्द्रप्रस्थ' सोसायटीच्या प्रत्येक घरात, आई, ताई, आजी... समस्त महिलांना सक्तीनं बसवून, स्वयंपाकघर, पुरूषांनी ताब्यात घेतलं. सकाळीच इडलीवाल्याला बोलावून प्रत्येकानं नाश्त्यासाठी इडली-चटणी त्याच्याकडून घेतली. बाबा लोकांनी चहा, कॉफी केली. 'समस्त महिलांनो ऐका हो ऐका... सर्वांनी तयार होऊन खाली यायचे आहे. आपल्या सोसायटीच्या ग्राउंडवर आज खास तुमच्यासाठी काही गेम्स ठेवले आहेत. आकर्शक बक्षिसे आहेत. तेव्हा त्वरा करा, त्वरा करा, त्वरा करा' बंटीनं लाऊडस्पीकरवरून अनाउंन्समेंट केली.

'अहो पण घरातली कामं, झाडू-पोछा, कपडे-भांडी कोण करणार? कामं तीच टाकून द्यायची का?''

प्रत्येक घरातल्या महिला वर्गाचा, थोडा फक्रार असाच सूर राहिला.

''हो... आज कामं विसरा आणि खाली चला. कामं आम्ही करू संध्याकाळी.'' पुरूश वर्गाची मल्लीनाथी.

हो ना करता करता, समस्त महिला वर्ग ग्राउंडवर जमला. वयाप्रमाणे त्यांचे तीन ग्रुप करण्यात आले. १५ ते ३० एक ग्रुप, ३१ ते ६० दुसरा ग्रुप आणि ६० च्या वर तिसरा ग्रुप. बाबा ग्रुप, आजोबा ग्रुप प्रेक्षकांच्या खुर्च्यांवर स्थानापन्न झाले, बंटी ग्रुप आणि दादा ग्रुप स्वयंसेवक म्हणून कार्यरत झाले.

बंटीने सर्व गेम्सचे नियम आणि अटी, सर्वांना नीट समजावून सांगितले.

प्रथम चमचा लिंबू षर्यत सुरू झाली. प्रथम सर्वात ज्येश्ठ ग्रुप. यात बहुतेक करून सर्वांची लिंब खाली पडत होती. चमच्यात लिंबू धरून धावणं कोणालाच जमत नव्हतं. प्रेक्षकांची हसून हसून पुरेवाट होत होती. जोषी आजी, बंटीच्या आई आणि स्नेहा पंडीत या तिघी तीन ग्रुपमधे विजेत्या ठरल्या.

तीन पायांची षर्यत, हत्तीला षेपूट काढणे, षिवाजी म्हणतो, असे गेम्स झाल्यावर रांगोळी स्पर्धा, उखाण्यांच्या स्पर्धा झाल्या. संगीत खुर्ची खेळात, संगीताच्या तालावरची धावपळ पाहता पाहता सारे पोट धरधरून हसले. जेवणासाठी कॅटरर्सला ऑर्डर दिली होती. खास श्रीखंड पुरीचा बेत होता. 'महिला वर्गाला घरकामातून सुटका' हे ब्रीदवाक्य ठेवून महिला दिन साजरा करायचं स्वप्न साकार होत होतं. संध्याकाळी बक्षीस समारंभ आणि समस्त आईवर्गाचा, त्यांच्या अपत्यांकडून सत्कार असा कार्यक्रम होता. साऱ्या महिला आपल्या खास पेहेरावात हजर झाल्या. सर्व विजेत्यांना बक्षीसं मिळाली. आपापल्या मुलाबाळांकडून, आपला होणारा सत्कार, त्यांनी काढलेले गौरवोद्गार... सारं पाहून आयांचा उर भरून आला. डोळ्यांत अश्रूंनी दाटी केली. सारा प्रेक्षकवर्ग गहिवरला.

नारी समता मंचच्या गोडबोले मॅडमनं,'इन्द्रप्रस्थ'च्या सभासदांचं बंटी ग्रुपचं, दादा ग्रुपचं, तोंडभरून कौतुक केलं.'महिला दिनाला, आईच्या योगदानाची दखल घेऊन, त्यांना त्याची जाणीव करून देणं, यासारखी अमूल्य भेट दुसरी नाही,' असे गौरवोद्गार त्यांनी काढले. टाळ्यांच्या कडकडाटात कृतज्ञतेची पावती मिळाली. बंटीच्या आईनं आपल्या छोटेखानी भाषणात, आपण कृतार्थ झाल्याचं, आपल्या आयुष्याची परिपूर्ती झाल्याचं सांगितलं. महिला दिनाची समाप्ती उत्तम झाली. बंटी ग्रुपनं समाधान व्यक्त केलं.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# घरकुल योजनेत कसलाही गैरप्रकार होता कामा नये

## आ.संदीप क्षीरसागरांकडून प्रशासनाला कडक निर्देश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ मार्च**

सध्या प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना यांसह शासनाच्या विविध घरकुल योजनेची कामे प्रशासकीय स्तरावर सुरु आहेत. या योजनेतील लाभार्थी हे गरजू आणि वंचित असतात. गरजू आणि पात्र लाभार्थ्यांचे घराचे स्वप्न पूर्ण होण्यास कसल्याही प्रकारचा अडथळा होऊ नये, तसेच या योजनांच्या प्रक्रियेत कुठल्याही स्तरावर आर्थिक मागणी अथवा इतर कसलाही गैरप्रकार होऊ नये याची पुरेपूर दक्षता घ्या. तसेच पात्र लाभार्थींना तातडीने घरकुल हप्ता वितरीत करा, असे कडक निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड नगरपालिका, बीड पंचायत समिती व शिरूर कासार पंचायत समिती व बीड नगरपालिका येथील अधिकाऱ्यांना दिले आहेत.

सध्या प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत नवीन उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. त्याबाबत ग्रामपंचायत स्तरावर सध्या प्रस्ताव दाखल करून घेणे सुरू आहे. प्रधानमंत्री आवास योजना शहरीचे ऑनलाईन अर्ज दाखल करून घेण्याची प्रक्रिया झाली आहे. रमाई आवास योजनेचे प्रस्ताव ग्रामपंचायत स्तरावरून दाखल करवून घेऊन पंचायत समितीमार्फत समाजकल्याण विभागाकडे दाखल करण्यात आले आहेत तसेच त्रुटी असलेले प्रस्तावांची पुर्तता करणे सुरू आहे.



बर्याचवेळा या योजनेतील लाभार्थ्यांकडून अधिकारी आर्थिक मागणी करत असल्याच्या तक्रारी येत असतात. जे नागरिक या योजनेचे लाभार्थी आहेत ते सर्व अतिसर्वसामान्य, गरीब आणि वंचित घटकातील असतात. त्यांची अडवणूक करणे, आर्थिक मागणी करणे किंवा इतर कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार या योजनेच्या कार्यवाहीत होता कामा नये. तसेच जे लाभार्थी पात्र आहेत त्यांचे हप्ते तातडीने वितरीत करा अशाप्रकारचे कडक निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड व शिरूर कासार तालुक्याचे गटविकास अधिकारी, बीड नगरपालिकेचे मुख्याधिकारी तसेच इतर संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

बोगसगिरी आणि लाभार्थ्यांची पिळवणूक अजिबात खपवून घेणार नाही

दरम्यान, घरकूल योजनेचा लाभ घेऊन घर न बांधताच अधिकार्यांच्या संगनमताने रक्कम उचलल्याचे गैरप्रकार जिल्ह्यात समोर आले आहेत. असले प्रकार बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रात अजिबात खपवून घेणार नाही. त्यासोबतच लाभार्थ्यांची अधिकार्यांकडून होणारी आर्थिक पिळवणूकही सहन केली जाणार नाही. अशी तंबीही आ.संदीप क्षीरसागरांनी अधिकार्यांना दिली आहे.

बीड तालुक्याने विशेष लक्ष देण्याची गरज, दिरंगाई चालणार नाही

घरकुलाचा पहिला हप्ता सोडविण्यात बीड तालुका मागे पडला आहे. बीड पंचायत समिती अंतर्गत एकूण २९२९ लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरीत करण्यात आलेला नाही. त्यामुळे बीड पंचायत समितीने विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. याबाबतीत दिरंगाई चालणार नाही. यासोबतच घरकूल संदर्भात बीड नगरपालिकेच्याही अनेक तक्रारी नागरिकांमधून होत आहेत. त्याची तातडीने सोडवणू प्रशासनाने करावी. असेही आ.संदीप क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

# जिल्ह्यात जलजीवन योजनेचे अडीचशे कोटी रुपये अडकले

## टक्केवारीचे दिलेले पैसे अडकल्याची चर्चा-ॲड.अजित देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ मार्च**

-- सरकार कडून शेतकऱ्यांची फसवणूक
-- जिल्ह्यातील विकास योजना टप्प झाल्या
-- कामे मंजुरीसाठी पैसे दिल्याची देखील चर्चा
-- हे पैसे परत मिळवण्याच्या अडचणी वाढल्या
-- सरकार आले मात्र जनतेची फसवणूक झाली

लाडकी बहीण योजना राबवून सरकार परत आणण्याचा प्रयत्न झाला. हा प्रयत्न यशस्वी देखील झाला. मात्र विकास कामे मोठ्या प्रमाणात खोळंबली गेली आहेत. त्यामुळे या योजनेच्या नादात सरकार आणून शासनाने जनतेची फसवणूक केल्याचे स्पष्ट दिसते. बीड जिल्ह्यात केवळ जलजीवन योजनेचे जवळपास अडीचशे कोटी रुपये अडकले असून अनेक सुशिक्षित बेकार अभियंते आणि कंत्राटदार व्याज भरत-भरत परेशान आहेत. त्यामुळे ही एक प्रकारची फसवणूक असल्याचा आरोप जन आंदोलनाचे विश्वस्त ड. अजित एम. देशमुख यांनी केला आहे.

राज्य शासनाने लाडकी बहीण योजना निवडणुका जवळ आल्यानंतर राबवली. योजना राबवणे हा सरकारचा अधिकार आहे. मात्र योजनेच्या माध्यमातून सरकार आणून जनतेची फसवणूक करणे, हा अधिकार शासनाला नाही. या योजनेच्या नादात एका-एका महिलेने पंचवीस पंचवीस वेळेला लाभ घेतल्याचे निष्पन्न झाले असले, तरी त्यावर कारवाई होत नाही. पुढील निवडणुकीकडे सरकारचा डोळा आहे. योजना राबवण्याचा नादात निकष पाहिले नाहीत. आता दिलेले लाभही कमी होत आहेत.

जिल्ह्यातील विकास कामे पूर्णपणे खुळंबली गेली आहेत. तर दुसरीकडे अनेकांनी अनेक कामात दिलेली टक्केवारी अडकून पडल्याने अनेक जण परेशान असल्याची चर्चा जनतेत आहे. सामान्य लोक यात भरडले गेले आहेत. तरी देखील पुढाऱ्यांना याचे देणे घेणे नाही.

आठ आठ महिन्यापासून अनेक ठिकाणी जलजिवनची कामे अडकून पडलेली आहेत. त्यांना बिल दिले जात नसल्याच्या तक्रारी होत आहेत. सोलापूर जिल्ह्यात एका कॉन्ट्रॅक्टरने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. अशा बाबी गंभीर आहेत. जलजिवनची अनेक कामे थोड्या प्रमाणात चालू आहेत. मात्र यात गुत्तेदारांचा पैसा अडकून पडला आहे. गुत्तेदारांची कामे कशा पद्धतीने आहेत, हा मुद्दा वेगळा आहे. मात्र अशा प्रकारे त्यांची पिळवणूक करणे, हे कुठल्याही शासन नियमात बसत नाही. त्यामुळे गुत्तेदारांनी देखील शासनाच्या विरोधात पाऊल उचलायला हवे. मात्र तसे होत नाही. एकट्या जलजिवन योजनेचे असे झाले आहे, असे नाही. तर सर्वच विकास कामांना खिळ बसलेली आहे. त्यामुळे नवे सरकार आल्यापासून निधी नसल्याचा बहाणा सांगत विकास कामे खोळंबली आहेत. सामान्य जनतेची यात फसवणूक झालेली आहे. त्यामुळे जनतेने जागे होणे आवश्यक आहे, असेही ड. अजित देशमुख यांनी म्हटले आहे.

# जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्यावतीने ऐरणीवर घाव घालणाऱ्या घिसाडी समाजातील महिलांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**कडा दि.९ मार्च**



भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्या वतीने कडा येथील कष्टकरी आणि ऐरणीवर घाव घालणाऱ्या घिसाडी समाजातील महिलांचा सत्कार करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख हे प्रत्येक वर्षी आगळ्यावेगळ्या पद्धतीने महिला दिन साजरा करतात यापुर्वीही भाजीपाला विकणाऱ्या व बांधकाम मजूर महिलांना सन्मानित करण्यात आले होते. प्रत्येक वर्षी नाविन्यपूर्ण पुर्ण महिला दिन शंकर देशमुख यांच्या वतीने साजरा केला जातो. सौ. गिरीजा देशमुख व सौ. शकुंतला पवळ यांनी सर्व महिलांना हळदीकुंकू लावून तसेच शेला व पुष्पहार देऊन सन्मानित केले. कडा गावातील घिसाडी समाजातील एकुण १५ महिलांचा सन्मान करण्यात आला. शिक्षिका, डॉक्टर, व इतर उच्चशिक्षित महिलांचा सन्मान नेहमी होतो, परंतु देशमुख यांनी पुरुषांबरोबर कष्ट करणाऱ्या व ऐरणीवर घाव घालणाऱ्या आणि मान सन्मानापासुन दुर असणाऱ्या घिसाडी समाजातील महिलांचा सत्कार केला. कडा येथील भारतीय जनता पार्टी कार्यालयात झालेल्या कार्यक्रमास हरिश्चंद्र बोडखे, राजु शिंदे, राजाभाऊ भंडारी, वेदांत देशमुख, महेश कर्डीले, अशोक खंदारे, शास्त्री, सोमनाथ आपरे व इतर उपस्थित होते.

# श्री चिंतेश्वर विद्यालयात जागतिक महिला दिन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ मार्च**

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित श्री चिंतेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात जागतिक महिला दिन संपन्न झाला.याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री प्रदीप जोशी, प्रमुख उपस्थिती म्हणून भा.शि.प्र.संस्था उपाध्यक्षा ज्योतीताई ठाकूर,पोलीस उपनिरीक्षक निशिगंधा खुळे, समाजसेविका उमा औटे,स्थानिक सभासद प्रणिता हिटनाळीकर प्राथमिक अभ्यासप्रूक मंडळ प्रमुख संघनी वक्ते ज्येष्ठ शिक्षिका रेखा मोटे यांची उपस्थिती होती.

भा.शि.प्र.संस्था उपाध्यक्षा ज्योतीताई ठाकूर यांनी विद्यार्थ्यांनिनी शालेय जीवनापासून शिस्तबद्ध व स्व-संरक्षक बनावे असे प्रतिपादन केले.आपण समाजाचे काही तरी देणे करी आहोत या भावनेने समाजासाठी आपण आपले जीवन जगत असतांना समाजाभिमुख कार्य करावे असे उमाताई औटे यांनी सांगितले.आपणावरील जबाबदारी महिलांनी पूर्ण निष्ठेने काम करत पूर्ण करावी असे मत पोलीस उपनिरीक्षक निशिगंधाताई खुळे यांनी व्यक्त केले.कुठलेही काम यशस्वी करण्याची हातोटी महिला भगिनींना अवगत असते त्यामुळे आत्मविश्वास व स्वावलंबनाच्या जोरावर कुटुंब व समाजाच्या मागे महिलांनी उभे ठाकले पाहिजे असे मत प्रणितताई हिटनाळीकर यांनी मांडले.प्रसंगी उपस्थित महिला पालकांनी प्रातिनिधिक स्वरूपात आपलापले स्वानुभव कथन केले.अध्यक्षीय समारोपात प्रदीप जोशी यांनी इतिहासातील महिलांच्या कार्याचा उल्लेख करत सर्व महिला भगिनींना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाचे पद्य गायन विद्या घिगे, प्रास्ताविक रेखा मोटे, सूत्र संचालन सारिका रामदासी तर आभार संघनी वक्ते यांनी मानले.कार्यक्रमाची सांगता कल्याण मंत्राने झाली.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# राजर्षी शाहू कन्या विद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ मार्च**

श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ संचलित राजर्षी शाहू कन्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय व राजमाता इंग्लिश स्कूल तेलगाव रोड बीड यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. ०८ रोजी जागतिक महिला उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष इंजि. बलभीमराव जाहेर पाटील ,संस्थेचे सचिव प्रा.जे.पी. शेळके, प्राचार्य ए.आर. डंबरे, मुख्याध्यापिका श्रीम.कदम एस.डी., प्राचार्या श्रीम आर.डी. लोखंडे, श्रीम.सोनवणे एम.एस.श्रीम. जी.डी. कदम,श्रीम. एस .आर .रसाळ, श्रीम. पी.डी. हिवरेकर श्रीम. मंगल गालफाडे यांची उपस्थिती होती. सुरुवातीला राजमाता जिजाऊ,क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ,इंदिरा गांधी, अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने शाळेतील सर्व शिक्षिकाचा मान्यवरांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजर्षी शाहू कन्या माध्यमिक विद्यालयाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री. जगताप एस.सी. यांनी केले. तसेच यावेळी विविध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी. एल.तिडके यांनी केले तर आभार प्रदर्शन यादव एस.बी. यांनी केले.यावेळी शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# स्वतःचे स्त्रीत्व ओळखा व पुढे जा-सौ.संध्याताई कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ मार्च**

जागतिक महिला दिन हा एकच दिवस महिलांचा नाही तर प्रत्येक दिवसच महिलांचा असतो. आपल्या संस्कृतीत महिला व पुरुष वेगळे घटक नाहीत. जेव्हा एक स्त्री घडते तेव्हा पूर्ण कुटुंब घडते. स्त्री ही प्रेमळ, कोमल ,लाजाळू असते .घराचा स्वर्ग बनवते. परंतु जेव्हा अन्याय अत्याचार छळ होतो तेव्हा मात्र ती रणचंडीकेचे रूप धारण करते पूर्वीपासूनच स्त्रियांची गौरवशाली परंपरा आहे .आजच्या स्त्रीने स्वतःमधील सामर्थ्य ओळखून आपले स्वत्व जपावे असे सहकार भारतीच्या राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य मा. सौ संध्या कुलकर्णी यांनी दीनदयाल शोध संस्थान,कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार द्वारा जन शिक्षण संस्थान बीड येथे जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रमाच्या वेळी आपल्या मार्गदर्शनात सांगितले .

तसेच प्रतिकूल परिस्थितीतही संकटाला तोंड देण्याची क्षमता स्त्रीमध्ये असते हे त्यांनी विविध समर्पक उदाहरणे देऊन स्पष्ट केले. उद्योजिका सौ सविता जैन, सौ हेमा विभूते यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. तसेच जन शिक्षण संस्थानच्या महिला प्रबंध समिती सदस्य, यशोगाथा, प्रशिक्षिका व दीनदयाल शोध संस्थानच्या महिला कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यात आला.




आपले मनोगत व्यक्त करताना उद्योजिका साविज ब्युटी शॉपी च्या सवीता जैन यांनी त्यांच्या व्यवसायाबद्दल माहिती सांगितली. व्यवसाय करताना अनेक अडचणी येतात पण न डगमगता धीराने त्यातून वाट काढावी लागते. तसेच जन शिक्षण संस्थान ही एक उद्योजक तयार करण्याची फॅक्टरी आहे असे त्यांनी सांगितले.हिरकणी हुरडा पार्टीच्या सौ हेमा विभूते यांनी सिझनेबल व्यवसायाबाबत माहिती सांगितली .जिद्द ,चिकाटी, मेहनत या गुणांमुळे व्यवसायाची वाढ होते .व्यवसाय वाढीसाठी माऊथ पब्लिसिटी खूप महत्त्वाची आहे असे त्या म्हणाल्या.

स्त्रीची पूजा भारतामध्ये केली जाते आम्ही जसे घडलो तशा आमच्या कन्या घडतील असे वाटते नोकरी व संसार अशी कसरत करणाऱ्या स्त्री शक्तीचा सन्मान म्हणजे आनंदाचा सण आहे असे जन शिक्षण संस्थान बीडच्या प्रबंध समिती सदस्य डॉ.सत्यभामा चोले यांनी आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात सांगितले. यावेळी यशोगाथांनी आपले मनोगत व्यक्त करताना जन शिक्षण संस्थानचे आभार मानले.

प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना मा.संचालक श्री गंगाधर जी देशमुख म्हणाले की कौशल्य विकास व उद्योगाला प्रेरणा देण्याचे काम जन शिक्षण संस्थान करते. हिरकणी हुरडा पार्टी एक महिला सक्षम पणे सांभाळते .एक शिक्षिका संस्कार वर्ग चालवते. त्यांच्यातील उद्योजकाचा आज आपण सन्मान केला आहे .

या कार्यक्रमासाठी प्रबंध समिती सदस्य मा.सौ लक्ष्मी बोरा मा.सौ आशा कदम मा. विद्याताई सानप ,श्रीमती सुनंदाताई कुलकर्णी ,सौ कमल देशमुख, कार्यक्रम अधिकारी सौ सीमा मनुरकर,डॉ. अंबिका नरवडे, दीनदयाल शोध संस्थानचे कार्यकर्ते, जन शिक्षण संस्थानचे सर्व कार्यकर्ते ,प्रशिक्षिका व प्रशिक्षार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. महिला दिनानिमित्त महिलांची डॉ. अंबिका नरवडे यांनी आरोग्य तपासणी केली .

सौ स्नेहल केवडकर यांनी गीत व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी श्री धर्मराज जाडकर यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले तर सूत्रसंचालन सहाय्यक कार्यक्रम अधिकारी श्री सुदाम पालकर यांनी केले.

कार्यक्रमासाठी बीड तालुक्यासह पाटोदा शिरूर गेवराई माजलगाव धारूर केज अंबाजोगाई इत्यादी तालुक्यातून ३४० प्रशिक्षक प्रशिक्षार्थी, यशोगाथा दीनदयाल शोध संस्थान च्या सर्व महिला कार्यकर्त्या, दीनदयाल शोध संस्थान भिशी गटाच्या महिला कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# केज ते चौफळा झाला जिवघेणा प्रवास

**तभा वृत्तसेवा**
**केजा दि.९ मार्च**

केज तालुक्यातून जीवाचीवाडी येवता लव्हरी कोल्हेवाडी जाणारा रस्ता चि खुप कठीण अवस्था झालेले आहे नागरिकांना करावा लागतो जीवघेणा प्रवास केज विधानसभा आमदार ताई यांचे दुर्लक्ष केज कोल्हेवाडी जिवाची वाडी तुकुचीवाडी येवता लव्हुरी अमदार ताई ला विधानसभा ल खुप मोठ्या मताधिक्याने लिड दिली पण आमदार ताईचे ह्या गावावर खूप दुर्लक्ष पाहायला मिळत आहे केज ते कानडी माळी रस्त्याचे काम मागील सहा महिन्यापासून चालू आहे अजूनही पूर्ण नाही त्या कामावर प्रशासन व राजकीय नेत्याने लक्ष दयावे

कानडी माळी ते चौफळा रस्थाची खुप बिकट अवस्था झालेली आहे तरी अमदार ताई नी लक्ष द्यावे



# बीड जिल्ह्यातील मनरेगा योजने अंतर्गत मधील कुशल देयके लवकरच मिळणार - कुंडलिक खांडे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ मार्च**

मनरेगा योजनेंतर्गत शासनाकडून कामांची संख्या वाढविली जात असताना बीड जिल्ह्यातील सन २०२१ ते २०२५ पर्यंतच्या एकूण ९८४ ग्राम पंचायत मधील वैयक्तीक व सार्वजनिक कुशल देयक थकित असून या संदर्भात सरपंच-उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब यांची भेट घेत सदरील देयके देण्याची विनंती केली. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी तात्काळ या संदर्भात रोहयोचे सचिव यांना आदेशित केले असून मनरेगाचे देयके लवकरच मिळतील असे सरपंच- उपसरपंच संघटनेचे अध्यक्ष कुंडलिक खांडे यांनी कळवले आहे.

केंद्र शासनाने सुवर्ण जयंती रोजगार हमी योजना बंद करून २००८ पासून महात्मा गांधी राष्टलीय रोजगार हमी योजना सुरू केली. २०१० पासून या योजनेची प्रत्यक्षात अंमलबजावणी सुरू झाली.ग्रामीण भागात मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्याबरोबरच वैयक्तिक लाभाच्या योजना तसेच सार्वजनिक मालमत्ता तयार करण्याचा उद्देश समोर ठेऊन ही योजना सुरू करण्यात आली. बीड जिल्ह्यातील एकूण ९८४ ग्राम पंचायत मधील वैयक्तीक व सार्वजनिक कुशल देयक गत ५ वर्षापासून थकित आहेत.त्यामुळे शेतकरी व ९८४ सरपंच अत्यंत अडचणीत आहेत.या संदर्भात सरपंच-उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब यांची भेट घेवून सदरील देयके लवकरच देण्याची विनंती केली. या संदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब यांनी रोजगार हमी योजनेचे सचिव यांना सदरील प्रकरणी त्वरीत कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. सरपंच-उपसरपंच संघटनेचे अध्यक्ष कुंडलिक खांडे यांच्या प्रयत्नांना लवकरच यश येणार असून यामुळे थकित देयकांचा प्रश्न मार्गी लागला आहे.